
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 3220
REFBK-0025441



विजया राजाध्यक्ष

# स्वच्छंद

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 9 DEC 1987 | 20 MAR 1988 |
| 10 JAN 1988 | 20 MAR 1988 |
| 12 MAR 1988 | 17 MAY 1988 |
| 16 MAR 1988 | 25 MAY 1988 |
| 17 JUL 1988 | 5 JUN 1988 |
| 24 JUL 1988 | 8 JUN 1988 |
| 16 APR 1989 | 15 JUN 1988 |
| 19 APR 1989 | 22 JUN 1988 |
| | 3 SEP 1989 |

( कृ. मा. पहा )

१०००-२२-८६

संदर्भ निबंध
३२२८
२५४४१
१५।११।८६

म. ग्रं. सं. ग्रंथालय ठाणे
३२२८
२५४४१
निबंध १५।११।८६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
3229
संदर्भ शाखा

REFBK-0025441

# स्वच्छंद

डिंपल
पब्लिकेशन

विजया राजाध्यक्ष

प्रकाशक /
सौ. नम्रता मुळे
३, कादंबरी सहवास,
नौपाडा, वसई रोड स्टेशन (प. रेल्वे)
जि. ठाणे ४०१ २०२

मुखपृष्ठ /
कमल शेडगे

प्रथमावृत्ती /
१२ जून १९८७

मूल्य ४० रुपये

© विजया राजाध्यक्ष

मुद्रक /
चिंतामण जोशी
तपस्या मुद्रणालय,
मु. पो. नागाव-हटाळे
ता. अलिबाग, जि. रायगड.

अरुण आणि नीता

यांना –

# अ नु क्र म

साभार परतीचे दिवस / ५
आठवणीतील शंकर पाटील / १३
माझे पहिले पुस्तक / २३
काळ्यावरती जरा पांढरे / २७
नसून असलेले केशवराव कोठावळे / ३९
संवाद / ४४
मला प्रभावित करणारे पुस्तक / ५८
स्मरण-विस्मरणाच्या काठावर / ६७
जपानी रमलाची रात्र / ७१
ओंजळीत स्वर तुझेच / ७६
साहित्याचे माझ्या जीवनातील स्थान / ८९
हिरवेगार / ९३
काळ काम वेग / १०४
राग-अनुरागाचे दुपदरी नाते / १०९
स्वगत / १२१

## साभार परतीचे दिवस

तीसबत्तीस वर्षे मागे गेले पाहिजे. ते जमेल की नाही हे सांगता येत नाही; जमले तरी तेव्हाचे सगळे आठवेलच, अशी खात्री देता येत नाही. बरेच काही पुसून गेले आहे. पण आयुष्याला अर्थ देणाऱ्या लेखन या अनुभवासंबंधीचे तपशील पुसून किती पुसले जाणार ? ते मुळी या तीसबत्तीस वर्षांच्या आयुष्यात मिसळूनच गेले आहेत. मी त्यांच्यासकटच जगते आहे.

एक्कावन सालातली गोष्ट. लहर आली आणि लिहू लागले. बघता बघता आठदहा पाने लिहून झाली. त्या मजकुराला शीर्षक दिले, 'कशाला आलास तू माझ्या जीवनात?' आणखी काही दिवसांत पुन्हा असाच एक झटका. त्याचे नाव 'मी एक तरुणी आहे...' ते लिखाण 'स्त्री'कडे पाठवून दिले; तेथे ते छापूनही आले. इतकेच नव्हे तर बऱ्यापैकी मोबदलाही मिळाला. हे माझे वाङ्मयाच्या प्रांतातले 'पहिले पाऊल' (वगैरे). आता आश्चर्य वाटते आणि हसूही येते. त्या वेळी जे काही लिहिले ते मनात मुळीच रुजले नव्हते. ती सगळी शब्दांची रोषणाई होती. तीसबत्तीस वर्षांपूर्वी ती रोषणाई खपवून घेतली जात होती. म्हणून ते लिखाण छापून आले इतकेच.

आणखी अडीचतीन वर्षांनंतर सकाळी अकराच्या सुमारास लिहायला बसले, एकच्या सुमारास थांबले. त्या लिखाणाचे शीर्षक होते, 'आणि त्यांचं जमलं नाही!' ते लिखाण (बहुधा त्या

दिवशीच) 'सत्यकथे'कडे पाठवून दिले. पोस्ट ऑफिस घरापासून खूप दूर होते, पण माझे काका उत्साहाने ते घेऊन गेले. आश्चर्य म्हणजे ते स्वीकारल्याचे पत्र लगेचच आले. पत्र राम पटवर्धनांचे होते. त्यांनी त्या लिखाणाला कथा असे म्हटले होते. आणि मूळचे शीर्षक बदलून 'परीक्षा' असे शीर्षक देत असल्याचे कळवले होते. 'सत्यकथे'त छापून आलेली दुसरी कथा आधी कोल्हापूरच्या 'शिलेदार' या मासिकाच्या खास अंकात प्रसिद्ध झाली होती. तिच्याकडे पटवर्धनांचे लक्ष गेले, आणि त्यांनी ती पुनर्मुद्रित केली. तिचे नाव 'रंगीत तालीम.' या दोन्ही 'विनोदी' कथा होत्या ! त्यांना 'सत्यकथे'त स्थान मिळाले असावे ते त्यांच्या प्रेमाविषयीच्या किंचित सिनिकल दृष्टिकोणामुळे. त्या वेळी भावुकतेला शह देण्याचे प्रयत्न निरनिराळे लेखक, निरनिराळ्या मार्गांनी करत होते. माझाही तशा प्रकारचा प्रयत्न आहे असे भासले असावे.

'स्त्री' व 'सत्यकथा' ही प्रतिष्ठित मासिके. त्यांत नाव दिसल्यावर 'लेखिका' हा शिक्का बसायला कितीसा वेळ लागणार ? त्या वेळी कोल्हापुरात काही मासिके होती. त्या मासिकांच्या संपादकांनी माझी दखल घेतली. लिखाणाची मागणी केली. मीही ते उत्साहाने दिले. तसे मी आमच्या कॉलेजच्या 'राजारामीयन' या मासिकातही लिहिले होते, पण त्याचा वाचकवर्ग मर्यादित. या मासिकांनी प्रसिद्धी दिल्यामुळे वाचकवर्गाचा विस्तार एकदम वाढला ! ते लिखाण अजूनही घरात कोठेतरी पडून आहे. अत्यंत भिकार आहे. त्यामुळे ते काढून पाहावेसे वाटत नाही. पण गंमत अशी की ते कायमचे नष्ट करून टाकावे असेही वाटत नाही !

असे का ? तर ते लिखाण वाईट असले तरी त्याभोवतीचे दिवस सुंदर होते. मित्रमैत्रिणींचे निखळ कौतुक वाट्याला आले होते. काही प्राध्यापकही अपेक्षित असलेले मार्गदर्शन आस्थेने, जिव्हाळ्याने देत होते. टीकेचा सूर अजिबात व्यक्त होत नव्हता असे नाही, पण मुख्यत: मिळत होते ते उत्तेजन. त्यामुळे डोक्यात

वारे वगैरे अजिबात शिरले नव्हते, पण सुख मिळत होते, आत्मविश्वास वाढत होता, व्यक्तिमत्त्व फुलत होते हे निश्चित.

असे होता होता पुण्यामुंबईपर्यंत माझे नाव जाऊन थडकले! 'सत्यकथे'शी सोयरीक जमली होतीच. पंचावन्न साली 'दीपावली' व 'साधना' या दिवाळी अंकांकडूनही आमंत्रणे आली. विजय तेंडुलकर व मंगेश पाडगावकर यांचे हस्ताक्षर प्रथम तेव्हा पाहिले. त्यापुढील वर्षी मुंबईला जाण्याचा योग आला. तेथे तेंडुलकर–पाडगावकर तर भेटलेच; पण इतर काही लेखकही. जणू एक नवे जगच मला खुले झाले होते. एखाद्या लहान मुलासारखे, जेवढे टिपता येईल तेवढे मी टिपून घेत होते.

आणि हो, 'सत्यकथे'ची कचेरीही तेव्हाच पाहिली. बरेचसे लेखक तेथेच तर भेटले. येथूनच माझ्या दोन कथा स्वीकारल्याची पत्रे आली आणि येथूनच माझे नंतरच्या दोनतीन वर्षांतले सटरफटर लेखन 'साभार परत' पाठवले गेले! त्या लिखाणात कथांबरोबरच एकदोन ललितलेख, एखादी एकांकिका असे साहित्यही होते, एवढेच आता त्यासंबंधी आठवते. मी स्वीकाराच्या पत्रांची वाट पाहात असायची आणि पोस्टमन ही जाड पाकिटे हातात आणून द्यायचा. असे निदान सहासात वेळा तरी झाले. खूप वाईट वाटायचे. पण हट्टाला पेटल्यासारखे पुन्हा लेखन चालूच! –ते आजतागायत!

हे त्या सुंदर दिवसांवरचे ओरखडे. त्यातल्या काही जखमाही. पण त्या जखमांतून बरेच दूषित, साकळलेले रक्त वाहून गेले हे एकापरीने बरेच झाले. या 'साभारपरती'च्या अनुभवाने स्वच्छ ठेवले तसे सावधही ठेवले. स्वतःच्या लेखनातले बरे काय, वाईट काय याबद्दल विचार करायची सवय लावली.

त्यातलेच काही विचार. त्या वेळी 'कशाला आलास तू माझ्या जीवनात?'सारखे लिखाण मी कसे काय केले? काही तरी सुचते. मग ते मनात घोळवले जाते, कधीकधी टाचणे असतात आणि मग टप्प्याटप्प्याने ते पूर्ण होते. ही निर्मितिप्रक्रिया आता

सरावाची झाली आहे. त्यावेळी यातले काहीच झाले नाही. एकदम आपले शब्दामागून शब्द ! एकीकडे हे शब्दबंबाळ लिखाण तर दुसरीकडे 'परीक्षा'सारखे विनोदी लिखाण. कशाचा कशाला मेळ नाही. कोणाच्या प्रभावामुळे हे झाले का ? तसेही नाही. तो नवकथेचा काळ होता हेही नीटसे ठाऊक नव्हते. घरात 'सत्यकथा', 'अभिरुची'चे जुने अंक आहेत. मी ते वाचते आहे. माझ्यावर नकळत संस्कार होताहेत असलाही काही प्रकार नाही. जे काही नवे साहित्य वाचले होते ते पाठ्यपुस्तकातून. अरविंद गोखले तेथेच भेटले. त्यांची छापही बराच काळ राहिली. पु. भा. भावेही मनावर काहीतरी जादू करून गेले असावेत. 'कशाला आलास तू माझ्या जीवनात?' प्रकरण त्या जादूतून आलेले ! लगेचच कोणीतरी 'कशाला आलीस तू माझ्या जीवनात ?' हा त्याचा उत्तरार्ध लिहिला आणि जरा नंतर दोन्हीवर, 'अभिरुची'तून 'कशाला आलात तुम्ही दोघे वाङ्मयाच्या प्रांतात ?' ही टीका आली. हे मला प्र. बा. वडेर यांनी सांगितले. मी ते खूप उशिरा वाचले. त्या टीकेत पु. भा. भाव्यांचा उल्लेख होता. त्यात तथ्य होते, हे आता पटते. विनोदी लिखाण सदाशिव आठवले या आमच्या इतिहासाच्या प्राध्यापकांच्या प्रभावामुळे घडलेले ! एखादी कथा य. गो. जोशींच्या वळणाचीही. हे सगळे एकमेकां-पासून किती विलग ! पुढे त्यातले काहीच राहिले नाही. ते मागे राहावे इतके खोलवर गेलेले नव्हतेच.

मग माझी, हे लिखाण चालू असतानाची वाङ्मयीन दैवते होती तरी कोणती ? मुळात, ती होतीच का ? कथेच्या क्षेत्रात कोणी नव्हते. मी फारशा कथा वाचल्याही नव्हत्या. कादंबऱ्या मात्र शाळेत असल्यापासून वाचत होते. त्या फडके–खांडेकरांच्या. दोघेही कोल्हापूरचे हा आणखी एक योगायोग. त्यांना भेटावेसे वाटे. काही काळानंतर तो योग आला. त्या भेटीगाठीतून खूप आनंद मिळत असे. आता प्रश्न असा पडतो की, जे लेखक मला भेटले होते, ज्यांचे साहित्य मी वाचले होते, त्यांचा माझ्या लेखना-

वर प्रभाव कसा नाही ? मला वाङ्मयीन दैवते असलीच, तर ती ही होती. मग मी काय त्यांची नुसती पूजा करत होते ? त्यांच्यापासून काहीच घेत नव्हते ? तपासून पाहिले पाहिजे. सूक्ष्मपणे पाहिले तर थोडा परिणाम जाणवेलही. हे मी दहा-पंधरा वर्षांपूर्वी कबूल केले नसते. आता असे म्हणेन की माझे न जमलेले लिखाण काही वेळा आलंकारिक आहे तर काही वेळा अतिसुबोध. या जुन्या खुणा !

कादंबऱ्यांचे वाचन शाळेच्या दिवसांत केले. कॉलेजात असताना प्रेमाने वाचली ती कविता. ते वाचन मात्र बरेच अद्य-यावत् होते. दिवसातील पुष्कळ क्षण 'सत्यकथे'त वाचलेल्या किंवा संग्रहातून वाचलेल्या कविताभोवतीच भ्रमण करत असा-यचे. कोल्हापूरसारख्या, थोडच्या बाजूला असलेल्या गावात राहूनही नवे संग्रह पाहायला मिळायचे. 'जिप्सी', 'शीळ', 'मेंदी', 'मृद्‌गंध' यांसारखे काही संग्रह त्यांच्या प्रसिद्धीनंतर थोड्याच अवधीत माझ्या हाती येऊ शकले, ते राजाध्यक्षांच्या कृपेमुळे. त्यामुळे त्या कवितांवरील प्रेमाला हे एक वैयक्तिक अंगही ! कवितेवर प्रेम करण्याचे ते वयच होते. शिवाय सुदैवाने माझ्या हातात काही चांगल्या कविता पडल्या. त्या मनात ठसल्या– इतक्या खोलवर कीं अजूनही त्या स्मरणात ताज्या आहेत. नंतर वाचलेले पुष्कळ विसरले. पण फार पूर्वी वाचलेले हे संग्रह मात्र मनात शाबूत आहेत. त्यांनी आयुष्यात केवढे चैतन्य निर्माण केले ?

येथेच माझ्या लेखनाला समीक्षेचा फाटा फुटला. त्या उमाळ्यात कवितेवर एकदोन लेख लिहिले; काही परीक्षणेही लिहिली. या लेखनाच्या शैलीवर राजाध्यक्षांच्या शैलीची छाप होती, हे सांगायला नकोच. त्यांतील काही परीक्षणे 'सत्यकथे'त 'चार कवितासंग्रह' या शीर्षकाखाली एकत्रित प्रसिद्ध झाली. तो लेख वाचल्यावर कोणीतरी नंतरच्या अंकातील एका पत्रात माझ्या शैलीच्या वळणाबद्दल एक चावाही घेतला ! एक परी-क्षण 'मृद्‌गंध'चे होते. विंदा करंदीकरांनी ते पाहिले; आणि

नंतरचे पत्रही. मला आलेले करंदीकरांचे पहिले पत्र या संदर्भातलेच होते. खरे सांगायचे म्हणजे करंदीकरांच्या पत्रामुळेच मला ' सत्यकथे 'तील पत्राबद्दल समजले. त्यामुळे ते आधी वाचल्यामुळे जे वाटले असते ते अजिबात वाटले नाही ! करंदीकरांच्या पत्रात ते सगळे बुडून गेले ! एक मात्र खरे. त्या पत्रलेखकाच्या म्हणण्यात तथ्य होते. पुढे मात्र ती छाप पुसली. मी माझ्या पद्धतीने समीक्षालेखन करू लागले. हे नेमके कधी घडले हेही सांगता येईल. श्री. पु. भागवतांनी मला मी ' मौजे 'साठी ' मेंदी 'चे परीक्षण लिहावे असे सुचवले. हे परीक्षण लिहिताना मला समीक्षालेखनातील माझा सूर सापडला.

माझे त्या वेळचे कवितांचे वाचन माझ्या कथांतही उतरले आहे. ते स्वाभाविक होते. मी कविता लिहीत असते तर ते उघड अनुकरण ठरले असते. कथांमध्ये ते तेवढे स्पष्टपणे जाणवत नाही एवढेच. त्या वेळच्या दहाबारा कथा अशा ' काव्यमय ' शैलीत आहेत ! पण हळूहळू तो प्रभाव कमी होत चालला. मला वाटते, मला ' पुरुष ' या कथेपासून माझा सूर सापडत चालला. त्यानंतरचे सगळंच लेखन उत्तम उतरले असे नाही. पण काय फसले, का फसले, काय जमले, हे कळण्याइतका विवेक आला. मन मधून-मधून त्यासंबंधी विचार करत राहिले.

येथे ' पूर्वार्ध ' संपला.

उत्तरार्ध चालूच आहे. वर्षाकाठी किमान पाचसहा कथा मी लिहिते. कोणत्या वाईट, कोणत्या चांगल्या हे मला ठाऊक असते. पण चांगल्या व वाईट अशा दोन्ही कथा ' माझ्या ' असतात. पूर्वीचे जे काही संस्कार होते त्यांचा मागमूसही आता राहिलेला नाही. कोणाचे मार्गदर्शनही लागत नाही. आता स्वतःचा मार्ग दिसला आहे, आणि त्या मार्गाने कितपत पुढे जाता येईल हे स्वतःच्या कुवतीवर अवलंबून आहे, अशी परिस्थिती आहे. या संदर्भात श्री. पु. भागवतांशी झालेला एक संवाद आठवतो. सात-

आठ वर्षांपूर्वीची गोष्ट. ते मला दिवाळी अंकांच्या मोसमात मी कोठेकोठे लिहिले आहे, हे विचारत होते. मी त्यांना पाचसहा ठिकाणी लिहिले आहे, पण ते वाईट आहे, तुम्ही वाचू नका असे सांगत होते. पूर्वीही 'लिहिलं आहे, पण ते तुम्ही वाचायचं नाही' असे मी सांगितल्याचे त्यांना आठवले असावे. ते पुन्हा एकदा ऐकल्यानंतर भागवत म्हणाले, 'विजयाबाई, आपण असं ठरवू या का की जे मी वाचायचं नाही, असं काही तुम्ही लिहायचंच नाही?'

असे लेखकांच्या कमअस्सल लेखनाला पायबंद घालणारे काही संपादक आहेत. म्हणून माझे 'साभार-परतीचे दिवस' अजूनही संपलेले नाहीत. असे संपादक हवेतच. लेखकाचे नाव झाले की त्याने दिलेले हवे ते छापावे असे होता कामा नये. लेखकाला संपादकाचा धाक वाटला पाहिजे. आपण त्याच्या हाती जे साहित्य देत आहोत ते त्याला आवडेल की नाही अशी चिंता वाटली पाहिजे. निदान स्वत: लेखकाने, साहित्य तेवढे चांगले नसेल तर थोडी अपराधीपणाची भावना मनात बाळगून ते संपादकाला दिले पाहिजे, किंवा स्वत:मधली 'नाही' म्हणण्याची शक्ती वाढवली पाहिजे. हे जमले तर त्याला 'साभार परतीच्या दिवसां'चे भय वाटणार नाही. उलट, मधूनमधून असे झटके मिळाले तर ते बरेच असे वाटेल.

माझे एकदोन अनुभव सांगते. तीनचार वर्षांपूर्वी मी 'मराठवाड्या'कडे, त्यांच्याच मागणीवरून एक कथा पाठवली. कथा बरी होती, उत्तम नव्हती. कथा पोचल्यावर श्री. अनंत भालेराव यांचे पत्र आले. 'तुमच्या नावावर मध्यम दर्जाची कथा प्रसिद्ध होणे बरे नाही. काय करू?' त्यांनी कथा परत पाठवली. हा मला माझा अपमान वाटला नाही. आणखी एकदा 'हंस'च्या संपादकांना मी माझी कथा परत पाठवा असे आपणहून कळविले होते– त्यांनी 'अधिक चांगली कथा लिहून झाली तर पाठवा, नाहीतर हीच छापतो' असा ऑप्शन दिलेला असूनही! आणखी

एकदा, 'सत्यकथे'कडे मी माझी एक दीर्घकथा दिली. ती छापायची असे ठरले होते. तिच्यात काही बदल करावे या हेतूने मी ती परत मागून घेतली. पुन्हा वाचू लागले तेव्हा मला ती आवडेना. शेवटी ती छापू नये असे मीच ठरवले! अजून ती कथा पडून आहे.

नेहमीच एवढे शहाणपण सुचते असे नाही. मध्यम दर्जाचे लेखन प्रसिद्ध होतेच, पण ते मध्यम दर्जाचे होणे याला नाइलाज असतो. कधी मूड नसतो, कधी स्फुलिंग पेटतच नाही—पणमनः-पूर्वकतेचा अभाव नसतो. जे लिहिले आहे ते मनापासून लिहिले आहे, आणि ते तेवढे जमलेले नाही या दोन्ही जाणिवा ज्याला असतात, तो लेखक एका अर्थाने 'साभार परती'च्या म्हणजे उमेदवारीच्या दिवसांतच वावरत असतो. वाङ्‌मयक्षेत्रातली ही उमेदवारी न संपणे हेच आपल्या हिताचे!

माझे आतापर्यंत दहा कथा-संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. आणखी दोन संग्रह तयार आहेत. पण अजूनही, एखादी कथा मी बिनदिक्कतपणे लिहू शकत नाही. जेवढे कष्ट घेतले पाहिजेत, तेवढे घेते. पण नुसते कष्ट पुरत नाहीत. त्यापलिकडचे खूप काही लागते. कधी ते तुमच्या लेखणीत येऊन बसलेले असते व शाईबरोबर वाहात राहाते. कधी ते घडत नाही. ते 'अधिक काहीतरी' तुम्हांला तुमच्याकडे वळवून घेता येत नाही. अशा परिस्थितीत लिहिणे ही तडजोड ठरते. तडजोड वेगळी, आणि मुर्दाडपणा वेगळा!

मला मुर्दाडपणा अजून तरी जमलेला नाही. म्हणूनच मी न जमलेल्या लेखनाबद्दल खंतावत राहाते; आणि म्हणूनच मी मधून मधून चांगलेही लिहू शकते!

म्हणूनच म्हटले की उत्तरार्ध चालूच आहे उत्तरार्धातही 'साभार परती'चे दिवस आहेत. आणि लिखाणावर 'साभार परत' ही चिठ्ठी डकवणारी, पुष्कळ वेळा, मी स्वतःच!

# आठवणीतील शंकर पाटील

तीस वर्षांपूर्वीचे कोल्हापुरातील दिवस. माझे कॉलेज-शिक्षण संपत आले होते. शाळा-कॉलेजात असल्यापासून निर्माण झालेले वाचनाचे वेड आता नुसते वेड राहिले नव्हते. त्यात थोडा डोळसपणा येऊ लागला होता. मी अधूनमधून लिहूही लागले होते; आणि ते लेखन 'सत्यकथे'सारख्या प्रतिष्ठित वाङ्मयीन नियतकालिकात प्रसिद्ध होण्याचे स्वप्न पाहू लागले होते. या तपशिलात तसे नवे काय आहे ? कोणीही आपल्या जडणोघडणीच्या काळाबद्दल जे काही सांगेल तेच हे सगळे आहे. फरक इतकाच की, पुष्कळांच्या बाबतीत. हा जडणीघडणीचा काळ पुढे नीटसा आकारला, त्यातून काही अर्थपूर्ण निष्पन्न झाले असे दिसत नाही. याची विविध कारणे असू शकतात. त्यातील वैयक्तिक कारणे सोडा. पण कोवळ्या मनात फुटलेल्या निर्मितीच्या अंकुराचे पोषण यथायोग्य वातावरणाच्या अभावी न होणे, हे एक महत्त्वाचे कारण असू शकते. हे वातावरण म्हणजे वाङ्मयीन वातावरण. व्यक्तिमत्त्वाचा पूर्णपणे कब्जा घेणारे, वाचन-लेखनाखेरीज इतर सगळे ध्यास नाहीसे करणारे वाङमयीन वातावरण. मला ते वातावरण सुदैवाने मिळाले; आणि म्हणूनच तीस वर्षांपूर्वीचे ते दिवस, माझ्या भावी जीवनाच्या संदर्भात अर्थपूर्ण ठरले. हे वातावरण नेमके कोठे होते ? त्या वेळी कोल्हापुरात साहित्यिक कार्यक्रम फारसे होत नसत. 'नगरवाचनमंदिर' होते, पण त्यात

मला ज्यात रस निर्माण झाला होता ते नवसाहित्य नव्हते. फडके-खांडेकरांसारखे साहित्यप्रभू होते, पण त्यांच्या भेटीगाठी विरळ, आणि त्याही बुजरेपणाने घेतलेल्या. कॉलेजात त्या प्रकारचे वातावरण काही प्रमाणात होते; पण त्याला नाही म्हटले तरी प्रासंगिक स्वरूप होते. पण यापैकी कशाचीच उणीव न भासावी असे वातावरण मला त्या काळातील काही रसिक लेखकांच्या सहवासात मिळाले आणि तेही अगदी माझ्या घरात !

हे लेखक म्हणजे रणजित देसाई, शंकर पाटील, प्रल्हाद वडेर आणि व. ह. पिटके पुरुषोत्तम पाटील काही काळ कोल्हापुरात होते. त्या वेळी तेही आमच्या या वर्तुळात आले, आणि पुढे त्यात एकजीव होऊन गेले. वडेर माझ्या कॉलेजात होते. त्यामुळे माझी-त्यांची तेव्हापासूनची ओळख होती. कदाचित त्यांच्यामुळेच या मंडळींशी ओळखी झाल्या, आणि त्यांचे स्नेहात कधी रूपांतर झाले हे समजलेही नाही ! पुढे वडेर व पुरुषोत्तम पाटील कोल्हापूर सोडून गेले. व. ह. पिटके खूप दूर राहात, त्यामुळे तेही आमच्या गावाबाहेरच्या घरी वारंवार येऊ शकत नसत. रणजित देसाई व शंकर पाटील मात्र नेहमी येत. आमच्या गप्पा रंगत. संध्याकाळ चटकन संपून जाई, आणि अंधार पडल्यावर ही मंडळी उठत तेव्हा मन प्रसन्न व पुढच्या भेटीसाठी उत्सुक असे. खरेच, या भेटीगाठीतून मला किती मिळाले याचा काही हिशेबच मांडता येणार नाही !

या गप्पांत माझी भूमिका अर्थातच श्रोत्याची असे. वडेर, पिटके हे काहीसे अबोल आणि पुरुषोत्तम पाटीलही गप्पिष्ट म्हणावे असे नव्हेत. त्यामुळे या गप्पांचे खरे सूत्रधार दोनच. रणजित देसाई आणि शंकर पाटील ! त्यांची जुगलबंदी चालायची. पुरुषोत्तम पाटलांची कविता आणि माझी एखादी हळवी, भावूक कथा हे चेष्टेचे हुकमी विषय ! पण ही चेष्टा वरवरचीच. ती कधी संपायची आणि गप्पा इतर वाङमयीन विषयाकडे कधी वळायच्या कळायचेही नाही. गप्पांत तऱ्हेतऱ्हेचे विषय; त्यासंबंधी

चर्चा; आणि भैरवी रणजित किंवा पाटील यांच्या एखाद्या कथा-कथनाने. त्यावेळी दोघेही फॉर्मात होते. त्यामुळे त्यांच्या पुढे गाजलेल्या अनेक कथा आम्ही प्रथम ऐकल्या. कधी कधी तर त्यांचा कथाबीज सुचण्यापासून ते कागदावर अंतिम स्वरूपात उतरेपर्यंतचा प्रवासही पाहिला. निर्मितिप्रक्रियेच्या गूढतेची, अद्‌भुततेची अनेक अंगे मला तेव्हापासून जाणवू लागली ... अशी ही माझी त्या काळाची स्मरणे एकमेकात मिसळलेली आहेत.

पण काही वेळा, तसेच काही निमित्त घडले तर, ही स्मरणे परस्परांपासून अलगही होतात, आणि मग त्या वर्तुळातील एकेका व्यक्तीभोवती ती रुंजी घालू लागतात. अलिकडे तसेच घडले. शंकर पाटील नांदेड येथे भरणाऱ्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाल्याचे वाचले आणि मग साहित्यक्षेत्रातील सर्वश्रेष्ठ पदावर विराजमान झालेला हा आपला मित्र त्याच्या उमेदवारीच्या काळात कसा होता, यासंबंधीच्या आठवणी येऊ लागल्या. एकीकडे मन त्याच्या यशाच्या आनंदात मग्न होत असतानाच, दुसरीकडे ते त्याच्या यशाचे विश्लेषणही करू लागले. कुठून कुठे पोचला हा माणूस ! या प्रदीर्घ प्रवासात त्याच्याजवळ कोणती शिदोरी होती ? सुरुवातीला तर हात रिकामेच होते. पट्टणकोडोली या जन्मगावी पाटलांच्या साहित्यिक पिंडधर्माला मानवेल असे काय असणार ? नेहमीचे शिक्षणही सुरळीतपणे मिळणे अवघड. त्यांच्या वडिलांनी नेट धरल्यामुळे चित्र बदलले, आणि पाटील कोल्हापुरात येऊन दाखल झाले. पण तेथे तरी पाटलांसाठी सगळे तयार होते असे थोडेच आहे ? शाळा-कॉलेजातील शिक्षणाचे, तेथील अध्यापकांचे काही संस्कार निश्चितच झाले; ते पाटलांमधील लेखकाच्या घडणीला कारणीभूतही ठरले. पण त अंशतःच. आणखी बरेच काही हवे होते. ते गावातून अन्यत्र मिळाले असे म्हणावे तर तसेही नाही. कारण सुरुवातीला मी ज्या वातावरणाचा उल्लेख केला, तेच वातावरण पाटलांभोवतीही होते. सुसज्ज ग्रंथालय नाही; साहित्यिक कार्यक्रम नाहीत; त्या

निमित्ताने साहित्यिकांचे येणेजाणे नाही. पण आता असे वाटते की पाटलांना मुळी त्या वातावरणाची गरजच नव्हती. कारण ते त्यांच्या आतच लहरत होते. आत कुठेतरी वाचनाची जबरदस्त ओढ होती; निर्मितीची अनावर प्रेरणा होती. ती पाटलांना घडवत होती– म्हणजेच एका अर्थाने पाटील स्वतःला घडवत होते. आणि या घडवण्यात महत्त्वाकांक्षेचा भाग बिलकूल नव्हता. आपले व्यक्तिमत्त्व वाचन व लेखन या दोन मार्गांनीच समृद्ध होऊ शकेल हे त्यांना आतून जाणवले होते. आणि समृद्धीच्या प्राप्तीसाठी पाटील एकाग्रपणे पुढे चालले होते.

त्यांचे हे पुढे जाणे मी त्या काळात जवळून पाहिले. जवळजवळ रोज संध्याकाळी पाटील, कधी मित्रांसमवेत तर कधी एकटे, आमच्या घरी येत. केवळ मीच नव्हे तर आमचे सबंध कुटुंबच या मंडळींची वाट पहात असे. कधीकधी रोज येणाऱ्या माणसांचा थोडा कंटाळा येतो– ती माणसे आपल्याला कितीही आवडणारी असली तरी कंटाळा येतो. गप्पांचे विषय कमी होतात, किंवा संपतात. पाटलांबाबत उलट झाले. त्यांच्यामुळे आमची संध्याकाळ अधिकाधिक रंगू लागली याचे एक कारण म्हणजे पाटलांचे प्रसन्न, दिलखुलास व्यक्तिमत्त्व. त्याला औपचारिकतेचा वासही नाही. त्या वेळी आम्हा सर्वांचेच काही कौटुंबिक, काही वैयक्तिक प्रश्न होते. पण आम्ही त्यांच्याबद्दल कधी बोलल्याचे आठवत नाही. पण त्यासंबंधी न बोलताही त्यांचे दडपण कमी व्हावे, त्यामुळे येणारे औदासीन्य निवळावे असे वातावरण पाटील निर्माण करत. तऱ्हेतऱ्हेच्या विषयांवर खुलून बोलत. पण त्या बोलण्याचा मुख्य भर मात्र साहित्यावरच ! सगळे पुस्तक या केंद्राभोवती फिरणारे.

पाटलांनी खूप वाचले होते–आणि ते वाचतच होते. तेव्हा न पडलेला प्रश्न मला आज पडतो आहे. पाटलांमध्ये वाचनाची ही जबरदस्त ओढ कशी काय निर्माण झाली ? आणि त्यांनी इतकी पुस्तके कुठून मिळवली ? पण हे प्रश्न व्यर्थ आहेत. ज्याला

वाचायचे असते, त्याला पुस्तके आपणहून भेटत असतात. पाटलांना खूप पुस्तके भेटली– आणि त्यांनी ती माझ्याही भेटीला आणली. सुरुवात 'सत्यकथे'च्या किंवा 'मौजे'च्या ताज्या अंकापासून व्हायची. आम्ही गावाबाहेर राहात असू. त्यामुळे गावात खेपा घालून ते अंक आणण्याचे काम पाटील उत्साहाने करत. मग त्या अंकातील मजकुराबद्दल चर्चा. आवडलेली एखादी कथा, एखादी कविता ...पाटील त्यांच्याबद्दल उत्कटतेने बोलत. कथा-कवितेच्या वैभवाचे ते दिवस होते. त्यामुळे उत्कटतेने बोलण्याजोगे खूपच असे. या वाचनातूनच काही नावे मनात ठसली आणि त्या लेखकांचे संग्रह प्रसिद्ध झाले तेव्हा त्यांची देवाणघेवाण होऊ लागली. करंदीकर, पाडगावकर, इंदिराबाई यांच्या कित्येक कवितांवर त्या वेळी जीव ओवाळून टाकला. मर्ढेकरांची कविता तर मनात नेहमीच असायची. आज हे आठवताना दोनतीन गोष्टी नव्याने जाणवतात. त्यांतील एक म्हणजे पाटलांची रसिक, विश्लेषक बुद्धी. ते उत्तम समीक्षा लिहू शकले असते. पण त्यांनी समीक्षा लिहिली नसली तरी त्यांच्या निर्मितिव्यापारात त्यांना समीक्षाबुद्धीने नेहमीच साथ दिली आहे; आपण नेमके काय करत आहोत याचे त्यांना सूक्ष्म भान आहे. त्यामुळेच, आपल्या लेखनाविषयी कुठेही आत्मसमर्थनाचा सूर येऊ न देता, पाटील उत्तम भाष्य करू शकतात ! ही गोष्ट त्यांनी उमेदवारीच्या काळापासूनच कमावलेली आहे. आज जाणवणारी दुसरी गोष्ट म्हणजे पाटलांचा काव्यात्मक पिंड. ते 'ग्रामीण' लिहीत होते. त्या स्वरूपाच्या इंग्रजी-मराठी साहित्याशी त्यांचे लागेबांधे होते– पण त्यांच्या वाचनात नागर, काव्यात्म साहित्यच अधिक होते ! कवितेची त्यांना विशेष आवड. पाटलांच्या ग्रामीण कथेत दिसणारे निसर्गविषयक भान, जीवनाची शोकात्म जाणीव, प्रतिकात्मकता, लयगर्भ भाषा ही वैशिष्ट्ये त्यांच्या या वाङ्मयाभिरुचीशी संबंधित आहेत, असे मला वाटते. पाटलांची ग्रामीण कथा ही 'नवकथा' वाटते, ती त्यामुळेच ! आणखी एक गोष्ट म्हणजे त्यांचे निखळ,

निर्मळ कुतूहल. त्या वेळी आम्ही सगळेच साहित्याच्या मुख्य प्रवाहापासून दूर होतो. कधीतरी वडेर मुंबईला जाऊन येत आणि तेथील साहित्याच्या जगात काय चालले आहे हे सांगत. कधीतरी श्री. पु. भागवतांचे पत्र येई; त्यात काही बातमी असे. आम्ही त्या अनुषंगाने बोलत असू. पण त्यात कुठे 'गॉसिप'चा लवलेशही नसे. पुढे पाटील मोठे झाले; मुख्य प्रवाहात मिसळले त्यांच्याभोवतीचा साहित्याच्या व्यावहारिक अंगांचा गुंता वाढला. पण ते कोणत्याही भोवऱ्यात सापडले नाहीत, स्वत: अविचल राहून भोवती फिरणाऱ्या जगाकडे अलिप्ततेनेच पाहू शकले, याचे कारण कोठेतरी या निर्मळ कुतूहलात असावे. त्यामुळेच त्यांच्या साहित्याच्या एकाग्र साधनेत कोणीही काहीही व्यत्यय आणू शकत नाही. आणखी एक : पुढे विस्तारलेल्या जगात वावरत असतानाही त्यांनी आपल्या पूर्वजीवनाचे 'नंदनवन' मनात सांभाळले. ती निरोगी, कसदार मुळे नेहमीच पाटलांच्या आयुष्याचा वेलविस्तार वाढवत राहिली.

पाटलांच्या इंग्रजी वाचनाबद्दलही सांगितले पाहिजे. त्यांच्या बोलण्यात फ्लॅहार्टी, फॉकनर, स्टाईनबेक, हेमिंग्वे या श्रेष्ठ लेखकांचे उल्लेख नेहमी येत. यात प्रदर्शनवादाचा भाग अजिबात नव्हता. इंग्रजी वाचणे म्हणजे काही तरी जगावेगळे करणं हा आवही नव्हता. किंबहुना त्यांच्या मनात मराठी-इंग्रजी हा भेदच अस्तित्वात नव्हता. ते वाङ्मय या दृष्टीने पाहात होते–त्या वाङ्मयाच्या भाषा वेगळ्या इतकेच ! पण या इंग्रजी वाचनानेच पाटलांचे अधिक पोषण केले असावे. हे पाश्चात्त्य लेखक पाटलांच्या प्रकृतीशी जुळणारे होते. पाटलांमधील घडणाऱ्या लेखकाला त्यांनी अनेक नव्या वाटा दाखविल्या असल्या पाहिजेत. या लेखकांपर्यंत पाटील पोचले याचे श्रेय त्यांच्याइतकेच त्यांच्या वाचनप्रेमी स्नेह्यांनाही दिले पाहिजे. आपल्या मोहन जायदे या मित्राचा पाटील या संदर्भात अगत्याने उल्लेख करतात हे येथे आठवते. या श्रेयाचे आणखी एक वाटेकरी म्हणजे 'सत्यकथे'चे संपादक

श्री. पु. भागवत. त्यांच्यामुळेही पाटलांना नवे वाचण्याची प्रेरणा त्या काळात मिळाली; आणि त्यामुळे पाटलांच्याच शब्दात, त्यांची 'कलादृष्टी' प्रगल्भ झाली. फॉकनर, स्टाइनबेक आदि लेखक पाटलांना आवडणे हे साहजिकच होते. पण सार्त्रसारख्या लेखकांवर पाटलांचे प्रेम जडण्याचे तसे काय कारण होते? सार्त्रच्या 'इंटिमसी'सारख्या कथासंग्रहाबद्दल पाटील किती भारावून जाऊन बोलत हे मला आजही आठवते आहे! पाटलांचा त्या वेळचा आणखी एक फार आवडता लेखक म्हणजे आल्बर्तो मोराविया. त्याची 'बिटर हनिमून' ही कथा पाटलांनी मला जवळ जवळ पाठ असल्यासारखी सांगितली होती. पाटलांच्या वळणाशी न जुळणाऱ्या या वाचनानेही त्यांना पुष्कळ काही दिले आहे, असे मला वाटते. त्या लेखनातील समृद्ध जीवनविषयक जाणीव पाटलांच्या लेखनातही उतरली आहे. अनुभवाला, त्यातील सगळ्या तपशिलांसकट सामोरे जाण्यामधील धीटपणा त्यात उपजत होताच, पण या प्रकारच्या वाचनामुळे तो विकसित झाला. या दृष्टीने मला 'बिटर हनिमून' व पाटलांची 'वेणा' यांच्यात काहीतरी संबंध जाणवतो. 'वेणा'तील तपशीलही– 'बिटर हनिमून' मधील तपशिलांप्रमाणेच–त्यातील अर्थपूर्णतेच्या जाणिवेतून आले आहेत– केवळ धीटपणातून नव्हे!

असे हे उमेदवारीच्या काळातील पाटलांभोवतीचे वातावरण आणि त्या काळात त्यांचे चालू असलेले वाचन. पाटील वाचत होते–आणि समांतरपणे लिहीत होते. त्यांनी निवडलेला अध्यापनाचा व्यवसाय या दोघांना पूरक असाच होता. पुढे ते वेगवेगळ्या क्षेत्रांत गेले. त्या क्षेत्रांचे रूपरंग वेगळे होते– अधिक आकर्षक, झगझगीतही होते. पण पुढेही पाटलांनी लेखनवाचनाला दिलेला अग्रक्रम बदलला नाही. आम्ही भेटत होतो तो तर पाटलांच्या कथालेखनाच्या बहराचा काळ! त्यांच्या अनेक उत्तमोत्तम कथा तेव्हा लिहिल्या जात होत्या. त्या लेखनाचा वेग थक्क करणारा होता. पाटील त्या सुचण्याच्या व लिहिण्याच्या नशेत

असायचे. जवळजवळ दिवसाआड एक कथा ! एक कथा लिहिली जात असताना त्यांच्या मनात निदान आणखी एक कथा घोळत असायची व ती समांतरपणे तयार होत असायची. एकीकडे ती कथा आम्हाला सांगणे, आणि दुसरीकडे लिहून झालेली कथा वाचून दाखवणे हे चक्र, सातत्याने चालू असायचे. कथालेखन दोन टप्प्यांमध्ये : प्रथम ' रफ् ' आणि नंतर ' फेअर '. पक्का खर्डा काही वेळा खूप बदललेला असायचा. याचाच अर्थ या लेखनामागे विचार होता; केवळ स्फूर्तीवर विसंबण्याचा भाबडेपणा नव्हता. पाटलांची शुभ्र, पातळ, बिनआखलेल्या कागदावरील ' फेअर ' कथा मला अजून आठवते. मध्यम आकाराचे वळणदार अक्षर, गडद शाई, लिहितालिहिता तिरप्या झालेल्या ओळी. मग ती कथा ' सत्यकथे 'कडे रवाना व्हायची. तिच्या निमित्ताने झालेल्या पत्रव्यवहाराचीही चर्चा व्हायची. (आम्हाला श्री. पु. भागवतांची पत्रे ही पर्वणी वाटे. आम्ही त्यांचे सामुदायिक वाचन करत असू.) हे नंतरचे. आधीचे कथा सांगणे हेही तितकेच आनंददायक असायचे. पाटील कथा खुलवून सांगत. सांगता सांगता त्यांना खूप सुचे. या अर्थाने, ' सांगणे ' ही त्यांच्या निर्मितिप्रक्रियेतील एक गरजेची गोष्टही होती. पाटलांचे निवेदन व ' कथन ' यांचे खास रंग या एका वस्तुस्थितीतही शोधले पाहिजेत. त्या वेळी हे जाणवले नव्हते. जाणवणे शक्यही नव्हते. पण त्या वेळी ऐकता ऐकता जे जाणवायचे, त्याबद्दल मोकळेपणाने चर्चा व्हायची. पाटलांना ही चर्चा हवी असायची. प्रतिकूल मतप्रदर्शनामुळे ते कधी दुखावल्याचे, चिडल्याचे, आठवत नाही. त्या बाबतीत त्यांची दृष्टी स्वागतशील, अनाग्रही, मोकळी होती.

आमच्या या नित्याच्या भेटीगाठी, चर्चा चालू असताना आमचे एखादे वाङ्मयीन दैवत कोल्हापुरात दाखल व्हायचे. त्यामुळे येणाऱ्या उत्साहाच्या उधाणाला तोडच नव्हती ! श्री. पु. भागवत दोनतीनदा आले. ते पत्रव्यवहारामुळे दूर असूनही जवळ आलेले. त्यांनाही नव्या लेखकांबद्दल अगत्य. त्यामुळे ते असताना व येऊन

गेल्यानंतर आम्हाला फार उल्हसित वाटायचे. एकदा श्री. ना. पेंडसे आले होते. त्यांच्या 'यशोदा' या लघुकादंबरीचे वाचन त्यांनी आमच्या माधव ताम्हणकर या साहित्यप्रेमी मित्राच्या घरी केलेले आठवते. पेंडशांसारखा मोठा लेखक त्याची अप्रसिद्ध कादंबरी आम्हाला वाचून दाखवणार या कल्पनेनेच आम्ही थरारलो होतो! अशा भेटी-गाठीच्या वेळी पाटील आत्मविश्वासाने, विनयाने वागत. संभाषणात, चर्चेत रंग भरत. ते व रणजित असले की इतर कोणाला फारसे काही बोलावेच लागत नसे!

असे ते मंतरलेले दिवस, कसे झर्रकन निघून गेले ते समजलेही नाही. पुढे आम्ही या ना त्या कारणाने पांगलो. पाटील नोकरीनिमित्त बारामतीला गेले. कोल्हापूरला त्यांचे घर असल्यामुळे त्यांच्या खेपा होत व दर खेपेत एखादी तरी फेरी ते आमच्या घरी टाकत. शिवाय आमचा पत्रव्यवहारही होता. माझ्या लग्नामुळे झालेल्या स्थलांतरात ती पत्रे कोठे हरवली कोण जाणे! आता वाटते की ती पत्रे सांभाळायला हवी होती. कारण पाटलांचे पत्रलेखनही सुंदर, शैलीदार असायचे. त्यात अनेक वाङ्मयीन बाबी असायच्या. मुद्दाम 'वाङ्मयीन पत्र' लिहिणे वगैरे नाही. पण आमचे सगळे आयुष्यच जिथे वाङ्मय झाले होते, तेथे आम्ही लिहिणार तरी दुसऱ्या कोणत्या विषयावर? नवकवितेच्या व नवकथेच्या काळात घडणाऱ्या एका गुणी लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा सहजस्फूर्त अविष्कार पाटलांच्या त्या पत्रांत होता.

पुढे पत्रव्यवहार थांबला. भेटीगाठीही विरळ झाल्या. जो तो आपल्या व्यापात गुंतल्यावर हे होणारच. त्यामुळे या दुराव्याबद्दल आमच्यापैकी कोणाच्याच मनात खंत नाही. ही खंत नसण्याचे खरे कारण म्हणजे आम्ही मनाने दुरावलो नसल्याचा विश्वास! त्या मंतरलेल्या दिवसांच्या चिवट मजबूत धाग्याने आम्हाला कायमचे बांधून ठेवले आहे. त्यामुळे आम्ही दुरूनही

एकमेकांचा भाग घेत असतो. एकमेकांच्या व्यथांनी व्यथित होतो, सुखांनी सुखावतो; त्याबद्दल प्रत्यक्ष न बोलता-लिहिताही, मानसिक आधार मिळत राहतो.

नंतरच्या काळात, जरा दुरूनच मी पाटलांचा उत्कर्ष पाहिला आणि त्यामुळे आनंदित झाले. त्यांना मिळालेल्या प्रत्येक मानसन्मानाबद्दल वाचले की माझ्या मनात जुन्या आठवणींची गर्दी उसळते, आणि मला प्रश्न पडतो, आयुष्याच्या इतक्या पुढच्या, यशस्वी टप्प्यावर त्यांना हा उमेदवारीचा काळ आठवत असेल का ? पण कधी पाटील भेटले की कळते, हा प्रश्न व्यर्थ आहे, कारण त्यांच्या संभाषणात या जुन्या आठवणींनाच प्राधान्य असते. त्या भूतकाळाला सोबत घेऊनच ते आपल्या वर्तमानकाळाबद्दल बोलत असतात. याचा अर्थ, खंड पडलेला नाही; मागचे मागे, पुढचे पुढे असे झालेले नाही. आणि तसे झालेले नाही म्हणूनच पाटलांचे व्यक्तिमत्त्व आज इतके संपन्न आहे ! भूतकाळाचे लहानमोठे झरे त्यांच्या आयुष्याच्या मुख्य प्रवाहाला सहजपणे येऊन मिळाले आहेत, आणि तो प्रवाह प्रसन्नपणे वेगाने पुढे वाहतो आहे !

त्यांच्या या प्रवासाला आमच्यासारख्या मित्र-मंडळींनी तीस वर्षांपूर्वीच शुभेच्छा देऊन ठेवल्या आहेत. आज त्या शुभेच्छांचा फक्त पुनरुच्चार करायचा !

## माझे पहिले पुस्तक

६ एप्रिल १९६५. पंधरा वर्षे होऊन गेली, पण त्या दिवसाची अजून स्वच्छ आठवण आहे. त्या वेळी आमच्याकडे टेलिफोन नव्हता. खालच्या मजल्यावर राहणारी माणसे सज्जन होती. ती मधूनमधून त्यांचा टेलिफोन आम्हाला वापरू देत; कधी बाहेरून आमच्यासाठी टेलिफोन आला तर हाक मारत.

त्या दिवशी असाच टेलिफोन आला. कोणाचा असेल हे कुतूहल होते. कारण तसेच काही काम असल्याखेरीज कोणी टेलिफोन करत नसे.

टेलिफोन द. ग. गोडसे यांचा होता. त्यांनी विचारले, 'कधी निघतंय तुमचं पुस्तक ?'

'आज माझ्या आईचा वाढदिवस आहे. एखादी प्रत तरी द्या असं मी भागवतांना म्हटलं होतं. आज संध्याकाळी येतील कदाचित.'

'छे छे—ते शक्यच नाही. अजून कव्हर कुठे छापून झालंय् ?'

मला वाटले, गोडसे सांगत आहेत ते खरे असणारच. माझ्या पहिल्या पुस्तकाला गोडशांचे मुखपृष्ठ असावे अशी माझी एकच इच्छा होती. माझ्या इच्छेला मान देऊन त्यांनी ते तयार केले होतेही. 'काही अडचण असेल त्यामुळे ते छापून झाले नसेल. हरकत नाही. भागवतांकडून काय ते कळेलच.' असा विचार करून मी स्वस्थ बसले. निराशा झाली, पण थोडीशीच. आज संध्याकाळी

श्री. पु. भागवत येत नाहीत असे गृहीत धरून मी वेगळा काही बेत आखू लागले.

आणि काय आश्चर्य ! संध्याकाळी सहाच्या सुमारास भागवत आले. माझा विश्वास बसेना. वाटले, आईला वाढदिवसानिमित्त भेटायला आले असतील. बोलता बोलता आज पुस्तक तयार का होऊ शकले नाही हे सांगतील.

'काय, कसं काय ?' त्यांनी हसून प्रश्न केला.

'ठीक आहे.'

'आई कुठे आहेत ?'

मी आईला बोलावले. ती बाहेर आल्यावर त्यांनी तिला खाली वाकून नमस्कार केला आणि तिच्या हातात बर्फीची पेटी दिली. त्या वेळी आईच्या चेहऱ्यावर उजळलेला आनंद माझ्या अजून डोळ्यांसमोर आहे. मीही त्या आनंदात हरवले होते.

'आणि ही तुमच्या मुलीची भेट ...' असे म्हणून त्यांनी 'अधांतर'ची एक बांधलेली प्रत आईच्या हातात ठेवली.

मला काय घडले हे समजलेच नाही.

काही क्षणांनंतर मी म्हटले, 'आज सकाळी गोडशांचा फोन आला होता ...'

'गोडशांनी चेष्टा केली तुमची !'

म्हणजे ते एक लहानसे कारस्थानच होते तर ! माझा आनंद वाढावा या हेतूने या स्नेह्यांनी ते रचले होते. त्यांचा हेतू साध्य झाला होता. सकाळी वाटलेली निराशा एकदम दूर झाली. जे अपेक्षित नव्हते ते घडले. या सगळ्यामुळे त्या आनंदाला वेगळीच लज्जत आली.

भागवत गेल्यानंतर मी 'अधांतर' हातात घेतले. किती सुबक, देखणे. जणू त्यात द. ग. गोडसे व श्री. पु. भागवत या दोन समृद्ध व्यक्तिमत्त्वांचे अलौकिक रंग मिसळले होते. मला ते पुस्तक एखाद्या तान्ह्या बाळासारखे निरागस वाटले. त्याच्या

निर्मितीत आपला काही वाटा आहे, यावर विश्वास बसेना.

अविश्वास, संभ्रम यातून तो दिवस उलटल्यानंतर थोडीशी बाहेर पडले.

मग थोडी मागे गेले. कसा निघाला हा संग्रह? 'सत्यकथे'-तून आणि इतर मासिकांतून लिहिलेल्या वीसपंचवीस कथा होत्या. त्या एकत्र केल्या पाहिजेत असा एक मोघम विचार मनात होता. पण यापलिकडे काहीच नाही. (नवोदित लेखकांसाठी मार्गदर्शन-केंद्रे त्या वेळी कुठे होती?) भागवतच एकदा म्हणाले, 'विजयाबाई, आपण तुमचा संग्रह करायचा बरं का. माझ्या मनात आहे, कमल देसाई, तारा वनारसे, तुम्ही—सगळ्यांचे संग्रह मी करायचे.'

मी खुलले. याहून अधिक बोलणे झाले नाही. माझ्या कथांची कात्रणे मी भागवतांच्या स्वाधीन केली, इतकेच. भागवत संग्रह काढणार म्हटल्यानंतर माझ्यासारख्या अनभिज्ञ लेखिकेला करण्या-जोगे होते तरी काय?

संग्रह मोठा काढायचा, त्यात तोपर्यंत प्रसिद्ध झालेल्या बहुतेक सगळ्या कथा घ्यायच्या ही कल्पनाही भागवतांचीच.

त्याविषयी मला शंका होती. त्यांतील काही कथा वाईट आहेत हे मला त्या वेळीसुद्धा ठाऊक होते.

भागवत म्हणाले, 'लिहिल्यात ना? आता संग्रहात घ्यायला का कचरता? एखाद्या लेखकाचा विकास कळावा या दृष्टीने त्याचं कमस्सल लेखनही संग्रहात असावं असं मला वाटतं!'

हे मला पटले. आता वाटते, काही कथा वगळल्या असत्या तर बरे झाले असते. टीका थोडी कमी झाली असती. पण एक-प्रकारे झाले ते बरे झाले. एकेकाळी आपण किती वाईट लिहीत होतो याचा कागदोपत्री पुरावा राहिला. एरवी ती कात्रणे कोण काढून वाचणार होते? भागवत म्हणाले ते खरेच होते. मला माझा विकास जाणण्याच्या दृष्टीने त्या निवडीचा उपयोग झाला.

निवड भागवतांची. पुढचे सगळे त्यांचेच. मी काहीच केले नाही. फक्त वाट पाहिली.

६ एप्रिल १९६५ ला वाट पाहाणे संपले. 'अधांतर'

जन्माला आले.

'अधांतर'वर काही परीक्षणे आली. त्यांत थोडी स्तुती, थोडी टीका. काही काळ ती परीक्षणे मी जपून ठेवली होती. आता ती कुठे आहेत हे मला ठाऊक नाही. आता 'अधांतर' सुद्धा माझ्या डोळ्यांसमोर नसते. नंतरच्या संग्रहांचे ओझे अंगावर घेऊन ते तळाशी निमूटपणे बसलेले असते. कधी नजर गेली की ते बाहेर काढावेसे वाटते. त्यातील कथा पुन्हा एकदा शांतपणे वाचाव्यात असा विचार मनात येतो. पण धीर होत नाही.

परवा कधीतरी माझ्या पहिल्या मुलीचे—मुक्ताचे लहानपणीचे फोटो पाहात होते. त्या नादात तिचे सगळेच फोटो पाहिले. काही अगदी अलिकडचे. ते फोटो पाहताना मनात आले, 'ही आपले मूळ रूप न बदलता किती सुंदर वाढली आहे!' माझ्या वाढलेल्या कथेचे असे एखादे छायाचित्र मिळेल का? पण ती वाढली आहे का?

मुक्तावरून आठवण झाली. तिला प्रथम मांडीवर घेतले तेव्हा माझ्या मनात फक्त विस्मय होता. 'अधांतर'च्या वेळी तेच. सहा महिन्यांपूर्वी माझ्या पीएच्. डी.च्या प्रबंधाची बांधलेली प्रत हातात घेतली त्या वेळी तेच. गुणदोष ठाऊक का नसतात? पण हे सगळे आपण निर्माण केलेले आहे, हे विसरता येत नाही—येऊही नये. ती आठवण आपल्याला जिवंत ठेवते.

विस्मय वाटतच राहतो.

आणि म्हणूनच तो पुन्हा एकदा वाटावा असे काहीतरी करण्याची उमेदही.

वाटते, वाढावे, पसरावे, आणि मग एखादा क्षण आपल्याच सावलीत विसावावे.

त्या क्षणावर आपला अधिकार असतो हे मला 'अधांतर'-नंतर कळू लागले. म्हणून वर आठ संग्रहांचे ओझे असले आणि पुढे कदाचित ते वाढणार असले तरी 'अधांतर' हलके, मोकळेच!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ..........
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## काळ्याचवरती
## जरा पांढरे

एखाद्या कवीचे व आपले लागेबांधे कसे जुळून येतात? त्या कवीची एखादी कविता आपल्या वाचनात येते, आणि ती आवडल्यामुळे त्याच्या इतर कविता आपण वाचू लागतो? कोणती कविता? एखादा कवी फार आवडला तरी, या प्रश्नांची उत्तरे देण्याइतके स्वच्छ स्मरण उरलेले असतेच असे नाही. कोणती कविता वाचली किंवा ऐकली ती कोणाच्या तोंडून ऐकली, कोणत्या वयात, मनःस्थितीत ऐकली या गोष्टीवरही त्या कवितेच्या परिणामाचे स्वरूप अवलंबून असते. काही वेळा योगायोगाने तो कवी भेटलेला असतो, त्यानेच ती कविता वाचून दाखविलेली असते. अशा वेळी त्या कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम आणि त्या कवितेचा परिणाम यांची आपल्या मनात सरमिसळ झालेली असते. कधी कवीच्या बाजूने तर कधी कवितेच्या बाजूने असे आपण हेलकावत रहातो. सगळेच हेलकावे कळतात, टिपता येतात असे नाही. हे नाते तसे थोडे गूढ, अगम्यच असते. आयुष्यातील एका सुंदर क्षणी त्या नात्याचा आरंभ झालेला असतो. अभ्रांच्या गर्दीतून अचानकपणे झिरपणाऱ्या किरणासारखा तो क्षण आपले आयुष्य अधूनमधून उजळत असतो. अधूनमधून का, नेहमीच.

ज्यांच्या कवितेने माझे आयुष्य असे सलगपणे उजळून टाकले ते कवी म्हणजे मर्ढेकर. 'सलग जमेना एक भावना' ही ज्या युगाची खंत आहे अशा मर्ढेकरी युगातच मी वाढले. त्या

विसंवादाच्या वणव्यात भरपूर होरपळले. ' जेथे जातो तेथे, मी माझा सांगाती ' ही या युगातील माणसाची एकाकी स्थिती मीही काही प्रमाणात अनुभवली. पण जेव्हाजेव्हा मर्ढेकरांची कविता वाचली तेव्हा तेव्हा हे सगळे, तात्पुरते का होईना, संपले. त्या कवितेने संवाद, सोबत—सगळे दिले. सगळे म्हणजे माझे लहान व्यक्तिमत्त्व जेवढे घेऊ शकले तेवढे सगळे. मी आणखी घेऊ शकले नाही याला त्या कवितेचा इलाज नाही. ती अजूनही ' उभारून वाहे, ' मला ' पालवीत आहे.' मला, सर्वांनाच. ज्यांना मर्ढेकरांना काय म्हणायचे आहे हे जाणून घेण्याची कदर आहे त्या सर्वांना. ही कविता आपली ' दगडी भिवयी ' न चळवता उभ्या राहिलेल्या सनातन, भव्य शिल्पाइतकीच अचल, अबोध आहे. आधी तिचे आमंत्रण स्वीकारले पाहिजे. मग तिच्या मूक सहवासात राहिले पाहिजे; आणि मग ती कधी तरी आपल्याशी बोलू लागेल यावर श्रद्धा ठेवून तिला प्रश्न विचारत राहिले पाहिजे. उत्तरांची वाट पहात थांबले पाहिजे. ठाण मांडून, धरणे धरून बसल्याखेरीज तिला वश करून घेणे शक्य नाही !

सहा वर्षांपूर्वी मी असेच धरणे धरले. निमित्त पीएच्. डी. ही पदवी. ती मिळविण्यासाठी जो प्रबंध लिहावा लागतो, त्यासाठी मी ' मर्ढेकरांची कविता ' हा विषय निश्चित केला. अन्य कोणता विषय मनात नव्हताच. विषय कठीण आहे हे ठाऊक होते. त्या सहा वर्षांत तर ही जाणीव अधिकाधिक स्पष्ट होत गेली. पण मध्येच सोडून देण्याचा, एखादा सोपा, लहान आवाका असलेला विषय निवडण्याचा विचारही मनात आला नाही. थोडेसे ' इरेस पडल्या 'सारखे झाले होते हे खरेच; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे मी मर्ढेकरमय होऊन गेले होते. सहा वर्षे हे काव्यरूपकातील स्फोटक द्रव्य देहमनात बाळगणे ही सोपी गोष्ट नव्हती. कुवत कमी असल्यामुळे दमछाक अधिकच झाली. मर्ढेकर या मनाची गती मला काही केल्या पकडता येईना. पण ती ' गतिधुंदी ' शरीरात घेऊन धावणे यात अपार आनंदही होता.

या धावण्यामुळे माझी गती थोडी तरी वाढली यात शंका नाही. या वाढलेल्या गतीमुळे खूप दूरचे, पलिकडचे असे काही तरी गाठण्याचा निदान प्रयत्न तरी करावा अशी उमेद निर्माण झाली. एक वेगळी गती, एक वेगळी नियती; 'रसद्रव्यांचे ओढे-नाले, वळणे घेतिल जरा वेगळी!' ही उत्कंठा. त्या उत्कंठेत, प्रतीक्षेत काळ फार आनंदात गेला. पदवीला तसे काय महत्त्व? पण त्या पदवीच्या निमित्ताने मिळालेल्या या आनंदाचे मोजमाप करणार?

मी प्रबंध लिहीतच नव्हते; एका फार तरल, फार बुद्धिमान, फार जटिल मनाशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत होते. हा संवाद साधण्यासाठी मी कोणत्याही प्रस्थापित, सर्वमान्य संशोधनपद्धतीचा अवलंब केला नाही. येथे मी एखादे मन जाणण्याच्या माझ्या पद्धतीवर, शैलीवर विसंबले. सुरुवात मर्ढेकरांच्या उपलब्ध असलेल्या कवितांपासून करायची; आणि तो धागा पकडून मागे जायचे असे ठरविले. त्याखेरीज दुसरा काही मार्गच नव्हता. 'मर्ढेकरांची कविता' या संग्रहात एकूण १२८ कविता आहेत. यात त्यांच्या आणखी काही असंग्रहित कवितांची भर टाकता येईल. त्यातील 'शेवटचे फूल' ही कविता मर्ढेकरांचे स्नेही वि. वि. भागवत यांनी 'सत्यकथे'च्या मार्च १९६३ च्या अंकात प्रसिद्ध केली. 'असेल दम तर' ही कविता कोठेच प्रसिद्ध झाली नाही. ती ग. रा. कामत यांना मुखोद्गत असल्यामुळेच उपलब्ध होऊ शकली. 'संगम' ही कविता १९४५ च्या 'दीपावली' वार्षिकात मिळाली. या कविता जमेस धरल्या तरी मर्ढेकरांच्या कवितांची संख्या १३०-३१ च्या वर जात नाही. 'मर्ढेकरांची कविता' या संग्रहाच्या प्रास्ताविकात श्री. पु. भागवत यांनी ज्या 'डायऱ्यां'चा उल्लेख केला आहे त्या मिळाल्या तर हे चित्र कदाचित बदलेलही. पण तोपर्यंत काय? मी त्या डायऱ्या मिळविण्याचा प्रयत्न केला. त्या मिळू शकल्या नाहीत हे केवळ माझेच नव्हे तर मराठी कवितेच्या वाचकांचे दुर्दैव! हा एक कटू, नाउमेद करणारा क्षण होता. तो रेंगाळला असता तर? पण

सुदैवाने तसे झाले नाही. शोध चालू राहिला.

शोधला सुरुवात करण्यापूर्वी मर्ढेकरांची कविता अनेकदा वाचली होती. तिच्यासंबंधी काही भूमिकाही तयार झाली होती. पण तरीही ती काही ठिकाणी चकवत होती. तर काही ठिकाणी अजिबात उकलतच नव्हती. तिच्या अंतरंगाचे दर्शन घडण्यासाठी, मर्ढेकरांच्याच शब्दात 'स्थिर वाटोळ्या तेजा'चा एखादा बिंदू तिच्यावर पडणे आवश्यक होते. जे तेज मर्ढेकरांनी 'सदारंगा'-पाशी मागितले ते मर्ढेकरांशीच मागून त्यांच्याशी एकतर्फी संवाद सुरू केला. मर्ढेकर नात्राच्या एका दिवंगत व्यक्तीशी, तिच्या व्यक्तिमत्त्वाशी व जीवनाशी भावनिक पातळीवर एकरूप होण्याची धडपड सुरू झाली. मर्ढेकरांच्या जीवनासबंधीचे सगळे तपशील गोळा केले की लगेच त्यांच्या 'पिपांत मेले ओल्या उंदिर' सारख्या एखाद्या अवघड कवितेचा अर्थ लागेल अशी भाबडी भावना या धडपडीत मुळीच नव्हती. या तपशिलांची कवितांशी सांधेजोड करण्याचा—म्हणजेच चरित्रात्मक टीकापद्धतीचा अतिरिक्त अवलंब करण्याचा—हेतूही नव्हता. या व्यक्तिमत्त्वाशी व जीवनाशी झालेली ओळख ती कविता वाचण्यासाठी आवश्यक असणारे मानसिक सामर्थ्य देईल, एवढेच वाटत होते.

मर्ढेकरांशी ओळख करून घेण्यासाठी आता एकच मार्ग उरला होता; आणि तो म्हणजे मर्ढेकरांना पाहिलेल्या, वेगवेगळ्या नात्यांनी त्यांच्या कमीअधिक सहवासात आलेल्या काही व्यक्तींना भेटणे, त्या व्यक्ती मर्ढेकरांविषयी जे सांगतील त्यातून मर्ढेकरांची एक सुसंबद्ध प्रतिमा मनाशी जुळविण्याचा प्रयत्न करणे. या दृष्टीने मी जवळ जवळ पन्नास व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या या व्यक्तींत मर्ढेकरांचे कुटुंबीय, काही संपादक–प्रकाशक, काही मित्र, काही साहित्यिक मित्र आणि काही महाविद्यालयातील व आकाशवाणी केंद्रावरील सहकारी यांचा अंतर्भाव होता. या व्यक्तींनी मर्ढेकरांना त्यांच्या आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर पाहिले होते. मर्ढेकरांच्या भगिनी श्रीमती कमलाबाई पाडळीकर यांचा

अपवाद वगळता इतर कुटुंबियांनी प्रामुख्याने मर्ढेकरांच्या बाळपणाविषयी, शालेय व महाविद्यालयीन जीवनाविषयी माहिती सांगितली. कमलाबाई मात्र रेखीवपणे मर्ढेकरांच्या आयुष्याचे एक सलग चित्र माझ्यासमोर उभे केले. इतर कुटुंबियांनी दिलेली माहिती मुळातच अपुरी होती. कारण त्यांचा व मर्ढेकरांचा विशेष निकटचा संवाद नव्हता. या काळात मर्ढेकर कवी नव्हते; आणि असले तरी या मंडळींना ते ठाऊक असण्याची शक्यता नव्हती; पण त्या काळात मर्ढेकरांच्या मनात निर्माण झालेल्या एका व्यक्तीसंबंधीच्या नाजूक भावनेचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेख यापैकी काहींनी केला, आणि तो थेट ' शिशिरागमा 'तील पहिल्या काही प्रेमकवितांशी जाऊन भिडला.

मर्ढेकरांच्या मित्रांचीही त्यांच्या कवितेशी फारशी ओळख नव्हती; पण मर्ढेकरांच्या ' काही कविता ' ज्या काळात लिहिल्या गेल्या त्या काळात मर्ढेकरांच्या मनावर असलेल्या ताणांची त्यांना थोडीफार कल्पना होती. हे ताण मर्ढेकरांच्या व्यावसायिक जीवनात होते तसे त्यांच्या वैयक्तिक जीवनातही. काही ताण इतके वाढले की त्यातून एक फार मोठे वैफल्य मर्ढेकरांच्या वाटचाला आले. त्याबद्दलचे तपशील कळल्यावर आणखी पुढे जाणे आवश्यक होते– अवघड असले तरी आवश्यक होते. म्हणूनच ते काम निर्धाराने केले. मर्ढेकरांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान असलेल्या त्या व्यक्तींची भेट होण्यापूर्वी मनावर केवढे दडपण होते ! पण नंतर हे दडपण दूर झाले, आणि ते काम आपण टाळले नाही याबद्दल समाधान वाटत राहिले. या भेटींमळे मर्ढेकरांच्या अधिक जवळ पोचता आले.

मर्ढेकरांच्या मित्रांप्रमाणेच, त्यांच्या आकाशवाणीवरील सहकाऱ्यांनाही त्यांच्या साहित्यक्षेत्रातील कर्तृत्वाची विशेष कल्पना नव्हती. येथे ज्यांचा अपवाद केला पाहिजे त्यांना मर्ढेकरांचे सहकारी म्हणण्यापेक्षा त्यांचे साहित्यिक मित्र म्हणणे अधिक योग्य होईल. उदाहरणार्थ, कृ. द. दीक्षित. त्यांनी मर्ढेकरांच्या

आकाशवाणीवरील कारकिर्दीविषयी लिहीले आहे, तसेच त्यांच्या साहित्याविषयीही. असे अपवाद वगळता, मर्ढेकरांचे सहकारीही प्रामुख्याने त्यांच्या व्यावसायिक जीवनाविषयीच बोलले. पण त्यातूनही, मर्ढेकरांच्या मनात लपलेल्या दोन वाङ्मयीन महत्त्वाकांक्षांची अस्पष्ट चाहूल लागली. पहिली महत्त्वाकांक्षा नाटककार होण्याची; आणि दुसरी गीतकार होण्याची. हा संदर्भ ध्यानात ठेवल्यामुळे त्यांच्या कवितांचे त्यांच्या संगीतकाशी असलेले नाते अधिक स्पष्टपणे जाणवले. त्यांच्या व्यावसायिक जीवनाची रूपरेषा निश्चित करणारी काही कागदपत्रे कलकत्त्यासारख्या महाराष्ट्रापासून खूप दूर असलेल्या आकाशवाणीच्या केंद्रावर मिळाले हा दुसरा फायदा.

मर्ढेकरांच्या सुरुवातीच्या काळातील संपादक-प्रकाशकांना त्यांच्याविषयी फारसे काही आठवत नव्हते. ते थोडे स्वाभाविकही होते. कारण आवर्जून स्मरण ठेवावे असे काही विशेष मर्ढेकरांनी त्या काळात केले नव्हते. पण या भेटीगाठींमुळे निदान काय उपलब्ध नाही, आणि म्हणून त्याचा शोध घेणे कसे व्यर्थ आहे, एवढे तरी कळले. संपादकांजवळ पत्रे नाहीत, आणि प्रकाशकांजवळ त्या पुस्तकांच्या प्रकाशनासंबंधी झालेला कोणताही पत्रव्यवहार नाही. हा अंधार १९४५ पासून पुढे कमी होऊ लागतो. १९४६ साली पुरुषोत्तम आत्माराम चित्रे मर्ढेकरांचा ' नाठाळ गाथा ' हा संग्रह प्रकाशित करणार होते. त्यांच्याकडून त्या संग्रहाचे हस्तलिखित मिळाले. ' काही कविता 'चे प्रकाशक वा. वि. भट यांच्याकडून त्या पुस्तकावर झालेल्या खटल्यासंबंधीची काही माहिती मिळाली. या खटल्याशी ज्यांचा साक्षात संबंध आला अशी दुसरी व्यक्ती म्हणजे मर्ढेकरांचे वकील व्ही. पी. सराफ. त्यांनी खटल्यासंबंधी सांगितलेल्या आठवणीही महत्त्वाच्या होत्या. या खटल्यासंबंधीचे सर्व कागदपत्र उपलब्ध नसल्यामुळे अशा आठवणींचे महत्त्व अधिकच वाढते. काही कागदपत्र आणि मर्ढेकरांची काही अतिशय सुंदर खाजगी पत्रे उपलब्ध आहेत. याचे

श्रेय सर्वस्वी श्री. पु. भागवत यांच्याकडे जाते. तेच मर्ढेकरांच्या 'आणखी काही कविता 'पासूनच्या पुढील सगळ्या पुस्तकांचे प्रकाशक. त्यांना मर्ढेकरांनी लिहिलेली पत्रे वाचल्यानंतर मर्ढेकरांच्या त्या आठदहा वर्षांतील 'मित्रशून्य,' 'एकाकी ' जीवनाची यथार्थ कल्पना येते. 'आणखी काही कविता 'च्या काळात मर्ढेकरांची मन:स्थिती किती उदास व आत्मविश्वासशून्य होत्ती त्याची त्या पत्रांतून जाणीव झाल्यानंतर त्या कवितांचा एक वेगळाच अन्वयार्थ लागून जातो.

मर्ढेकरांनी मुंबईत असेपर्यंत, म्हणजे, १९४७ पर्यंत, काही साहित्यिक मित्र जोडले होते ! त्यांच्या मुलाखतीमुळे झालेला मुख्य फायदा हा की मर्ढेकरकालीन वातावरणाची त्यामुळे नीट जाणीव झाली. त्यासाठी आणखीही एक गोष्ट उपकारक ठरली. ती म्हणजे मर्ढेकरांच्या काळात प्रकाशित होत असलेल्या वाङ्मयीन व इतर नियतकालिकांचे वाचन. या वातावरणाचे भान असणे दोन कारणांसाठी आवश्यक असते. एक कारण असे की या वाङ्मयीन वातावरणाचे संस्कार एखाद्या अलिप्त वृत्तीच्या लेखकावरही होत असतात; त्यामुळे त्यांच्या काही प्रतिक्रिया ठरत असतात. दुसरे असे की त्यामुळे त्या लेखकाचे विशिष्ट कालखंडातील स्थान निश्चित करणेही सुलभ होते. मर्ढेकरांची कविता इतकी खळबळजनक का ठरली, तिच्यावर इतकी कडक टीका का झाली, ज्यांना ती पटली त्यांनाही तिने धक्का कसा दिला, हे तिला त्या काळाच्या चौकटीत ठेवूनच जाणून घेतले पाहिजे. ही चौकट त्या वाङ्मयीन वातावरणाच्या जाणिवेने पुरविली. या मुलाखतींनी मला त्या काळात नेले.

विविध मुलाखतींतून असे काही ना काही मिळत गेले. ते सगळेच स्वीकारले, ते संपूर्णपणे विश्वसनीय मानले असेही नाही. त्याला मुळातच काही मर्यादा होत्या. एक मोठी मर्यादा म्हणजे ते सगळे स्मरणावर आधारलेले होते. हे स्मरण किमान वीसबावीस वर्षांपूर्वीच्या काळाचे. ते इतके जुने असल्यामुळे साहजिकच

त्यातील काही तपशील हरवले होते. काही विस्कळीत झाले होते. काही कदाचित थोडे अधिक रंगवून सांगितले होते. दुसरी मर्यादा अशी की, यापैकी फार थोडया व्यक्तींच्या मनात मर्ढेकरांची एकसंध प्रतिमा होती. फार थोडयांनी त्यांचे आयुष्य सलगपणे न्याहाळले होते. बाकीच्यांना त्या आयुष्याचे, व्यक्तिमत्त्वाचे काही तुकडे परिचित होते. त्यांचा व मर्ढेकरांचा संबंध मध्येच कुठेतरी सुरू झाला होता. किंवा मध्येच कुठेतरी तुटला होता. या मर्यादांचे भान ठेवणे भाग होते. खरे म्हणजे हे भान मर्ढेकरांसंबंधी लिहिले गेलेले काही लेख वाचतानाही ठेवावे लागले. मर्ढेकरांसंबंधी वाचून, ऐकून जे अंदाज आले ते त्यांच्या कवितेवर लादले नाहीत. ती कविता त्या स्वरूपाचा काही स्वतंत्र प्रत्यय देते का, हे तपासले. जेथे तो आला तेथेच त्याची व या अंदाजांची एकमेकांशी सांगड घातली.

मर्ढेकरांनी जेथे वास्तव्य केले ती ठिकाणे प्रत्यक्ष पहायची असाही एक ध्यास मी घेतला होता. त्यासाठी दूरचे प्रवास करावे लागले. या प्रवासात एरवीही रंजक वाटतील असे पुष्कळ अनुभव आले. एक अनुभव सांगण्याजोगा आहे.

मर्ढेकरांचे बालपण खानदेशात गेले. तेथे त्यांची मुळे रुजली होती; आणि या मुळांकडे परत जाण्याचे स्वप्न ते आयुष्याच्या अखेरच्या दिवसांत पाहात होते. ' केव्हा तरी चांदण्यात; पुन्हा जाईन निर्भय/ गांवाकाठच्या नदीत/ होईन मी जलमय.' या ओळींत तेच स्वप्न उमटले आहे. खानदेशातील जळगाव, धुळे, असोदे, फैजपूर, बहादरपूर, अशा वेगवेगळया गावी मी गेले. बहादरपूर विशेष महत्त्वाचे. तेथे मर्ढेकरांचे शालेय शिक्षण झाले. ' तांबडी माती ' या कादंबरीतील आखाडे त्यांनी तेथेच पाहिले. ' गणपत वाणी ' त्यांना तेथेच भेटला. बहादरपूराने पुष्कळ वर्षे पुरेल अशी शिदोरी मर्ढेकरांना बांधून दिली असली पाहिजे. मोटार चालवत असताना नजर समोर असली तरी समोरच्या आरशात मागचा रस्ताही दिसत असतो, आणि तोही पहावा

लागतो. मर्ढेकर हेच करत होते. भूतकाळाच्या मूक सोबतीने भविष्याला सामोरे जात होते.

मी बहादरपूरला सकाळी दहाच्या सुमारास पोचले. तेथे मर्ढेकरांचे बालमित्र गणेशप्रसाद मिश्र यांना भेटले. त्यांनी बरोबर माणूस दिला. त्याने मर्ढेकरांची शाळा दाखवली; गणपत वाण्याचे आता पडीक अवस्थेत असलेले दुकानही दाखवले. सगळे त्या अगदी लहान परिसरात; एका चिंचोळ्या रस्त्याच्या या किंवा त्या बाजूला. आसपासच्या माणसांना सुगावा लागल्याखेरीज थोडाच राहाणार? एक बाई अर्धापाऊण तास इकडून तिकडे फिरते आहे. कशासाठी?

याच कुतूहलापोटी एका वृद्ध गृहस्थांनी रस्त्याच्या पलिकडून विचारले, 'कोण आलंय रे?'

'मुंबईहून आल्या आहेत माहिती गोळा करण्यासाठी. बाळू मर्ढेकरवर त्यांना एक लेख लिहायचा आहे..'

'मग मी देतो की माहिती! त्यांना घेऊन ये इकडे.'

मी त्यांना वगळले हे त्यांना मुळीच आवडले नव्हते. तेही मर्ढेकरांना ओळखत होते. पण हे मला कसे ठाऊक असणार?

मी रस्ता ओलांडून त्यांच्या घरापर्यंत गेले. घरात शिरताशिरताच त्यांनी मला विचारले, 'कमळीची मुलगी का ग तू?'

कमळी म्हणजे मर्ढेकरांच्या भगिनी कमलाबाई पाडळीकर. त्या गृहस्थांना वाटले की असेच काही तरी नाते असणार. एरवी इतक्या वर्षांनंतर मर्ढेकरांची माहिती कशासाठी? त्यांचा तर्क किती सरळ होता!

पण तो प्रश्न ऐकून मला काय वाटले हे शब्दांत सांगता येणार नाही. मी चक्रावूनच गेले. या कवीचा मी झपाटून जाऊन शोध घेत होते. त्यांचे व माझे नाते मला सापडत नव्हते. आणि या गृहस्थांनी त्या नात्याला असे नेमके रूप दिले होते. मर्ढेकरांच्या रक्ताचा एक थेंब माझ्या वाहिन्यांपर्यंत पोचवला होता. 'तू' म्हणून मला एक सुंदर लहानपण दिले होते. हे सगळेच

किती सुखावणारे होते ! त्या क्षणी मी कितीतरी वर्षे मागे गेले. जेव्हा मी जन्मलेही नव्हते त्या काळात. माझा एक नवा जन्म मी पाहिला. काळाचे अंतर क्षणार्धात फिटले. वाटले, 'इथेच तर आहेत मर्ढेकर ! त्यांना पुष्कळ विचारता येईल ...'

एकरूपत्व साधले की काळ कसा लवचिक होतो यासंबंधीचा आणखीही एक अनुभव आहे. मुंबईतच आलेला. मी प्रा. जी. एस्. दिवाण यांना भेटायला गेले होते. ते मर्ढेकरांचे एल्फिन्स्टन् कॉलेजातील सहकारी आणि तेव्हाचे शेजारीही. दोघेही हिंदू कॉलनीत राहात. रोज संध्याकाळी फिरायला जात. प्रा. दिवाण मर्ढेकरांसंबंधी भारावून जाऊन बोलत होते. मी तशीच भारावून ऐकत होते. घरात दुसरे कोणी नव्हते.

दिवाण म्हणाले, 'मर्ढेकर 'चांदणी व्हिला'तून खारला राहायला गेले अन् आमचा संबंध कमी झाला. जाण्यापूर्वी ते त्यांच्याकडील दोन खुर्च्या आमच्याकडे ठेवून गेले. त्या अजूनही आहेत. तुम्हाला पाहायच्या आहेत ?'

'अर्थातच.'

आम्ही स्वयंपाकघराकडे जाण्यासाठी उठणार, तेवढ्यात एक पंधरासोळा वर्षांचा मुलगा तेथे आला. दिवाणांनी त्याला विचारले, 'काय रे, त्या खुर्च्या मर्ढेकरांनीच दिलेल्या ना ?'

तो काही उत्तर न देता नुसता पहात राहिला. दुसरे काय करणार ? कारण तो दिवाणांचा नातू होता. आपला मुलगाच समोर उभा आहे असे समजून दिवाणांनी त्याला प्रश्न विचारला होता !

हे जेव्हा दिवाणांच्या लक्षात आले तेव्हा ते म्हणाले, 'जुन्या आठवणीत रंगलो. इतकी वर्षं पुढे सरकली आहेत, हेच विसरलो !'

मला तरी ते कुठे आठवत होते? मीही दिवाणांबरोबर मागे गेले होते, हिंदु कॉलनीत राहू लागले होते. न जगलेल्या, पाहिलेल्या काळाचा आणखी एक टप्पा मी त्यावेळी पकडला.

हे सगळे तात्पुरते. एखाद्या क्षणापुरते. मग पुन्हा एकदा मर्ढेकरांच्या कवितेच्या भोवऱ्यात.

पण तो एक भोवरा नव्हता. अनेक भोवरे पोटात सामावून घेऊन तयार झालेले ते एक विवर होते. अज्ञान हा एक भोवरा, अंधार हा दुसरा भोवरा, नातीगोती हा तिसरा. असे अनेक. हे अवघड भोवरे पार करता करता मर्ढेकर किती थकले असले पाहिजेत! भोवरे, फासे, 'भयाणतेचा बुरुज', 'डोळ्यांच्या भिंती'. सगळेच कवी आणि अदृष्ट यांच्यात एक प्रचंड अपारदर्शक काच उभे करणारे. अफाट काळा प्रदेश, हिरवे–लाल कसलेच सिग्नल नाहीत. फक्त दिशाभूल. तरीही दिशा शोधण्याचा हव्यास कमी झाला नाही. 'काळ्यावरती जरा पांढरे' करण्याची महत्त्वाकांक्षा तशीच तरारलेली राहिली. त्या अंधारात तेजाचा एक ठिपका निर्माण करता यावा यासाठी मर्ढेकर तडफडत राहिले. 'पांढऱ्यावरती काळे' करून संपून जाणाऱ्या आम्हा असंख्य अल्पसंतुष्ट जिवांच्या जमान्यात मर्ढेकर नावाचा एक जखमी आत्मा भणंगपणे भडकत राहिला... विज्ञानयुगातला अश्वत्थामा. मर्ढेकरांना अश्वत्थाम्यावर एक दीर्घकाव्य लिहायचे होते म्हणे. ते त्यांचेच आत्मचरित्र होते का?

ज्याला आत्मज्ञान झाले त्याने आत्मचरित्र लिहावे. म्हणून मर्ढेकरांनी ते लिहायला हवे होते. मर्ढेकरांना पुष्कळ गोष्टी कळल्या, एक मात्र कळली नाही. त्यांनी ज्या कागदावर लिहिले तो कागद पांढरा नव्हताच, आणि ज्या शाईने लिहिले ती शाईही काळी नव्हती. आम्हा वाचकांना तेथे अनेक वेळा उलटे रंग दिसतात. कागदाचा काळा रंग तर दिसतोच, पण कधीकधी सुदैवी डोळ्यांना त्यावर उमटलेली पांढरी अक्षरेही दिसतात... मुद्रणशास्त्राच्या भाषेत मर्ढेकरांनी 'रिव्हर्स'मध्येच लिहिले.

इतकी वर्षे मी हे 'काळ्यावरती' केलेले 'जरा पांढरे' वाचण्याचा प्रयत्न केला. यापुढेही करत राहाणार आहे. या धडपडीतून काय निष्पन्न झाले? एक अवजड प्रबंध? एक पदवीचे

भेंडोळे ? नाही. त्याहून फार मोठी अशी एक गोष्ट– इमाने इतबारे 'पांढऱ्यावरती काळे' करते राहणे किती व्यर्थ आहे ही जाणीव !

एका फार तरल, फार बुद्धिमान, फार जटिल मनाशी संवाद साधण्याचा जो प्रामाणिक प्रयत्न केला तो असा फळाला आला ! त्या सनातन भव्य शिल्पापुढे धरणे धरून बसल्यानंतर त्याने हा प्रसाद ओटीत टाकला !

मी कृतज्ञ आहे.

## नसून असलेले
## केशवराव
## कोठावळे

पाच मे. मी गॅलेरीत बसले होते. मनात पुष्कळ काही घोळत होते. माझ्या नेहमीच्या जगण्याशी संबंधित अशा कित्येक आठवणी, कित्येक विचार. त्यामुळे मी एकटी असूनही एकटी नव्हते. ते सगळे मला व्यापून, वेढून बसले होते. त्या व्यग्र मनःस्थितीत असतानाच बातमी ऐकली : 'केशवराव कोठावळे गेले !' जीव फार चुटपुटला. बातमी ऐकण्यापूर्वी मनात जे घोळत होते ते क्षणार्धात वितळले. मनात फक्त तो मृत्यू उरला आणि त्या मृत्यूशी संबंधित असे कित्येक प्रश्न : पुण्यात सध्या 'मॅजेस्टिक गप्पा' चालू आहेत. त्या पुढे चालू राहतील की नाही ? मुंबईतही तोच उपक्रम चालू होणार होता. त्याचे काय होईल ? मॅजेस्टिक प्रकाशनाचा एवढा मोठा पसारा आता कोण सांभाळेल ? ...आणि मुख्य म्हणजे आता 'ललित'चे भवितव्य काय ? कोठावळ्यांचे कुटुंबीय, त्यांचे स्नेही ही जबाबदारी समर्थपणे उचलतीलच. कोठावळ्यांचा कारभार एकखांबी तंबूसारखा कधीच नव्हता. त्यांनी आप्तस्वकीयांना या ना त्या तऱ्हेने त्या कारभारात गुंतवले होते. पण त्या सहभागाला कोठावळ्यांचे वळण होते. ते वळण आता कसे चालू राहणार ? आणि ते वळण गेले तर 'मॅजेस्टिक'चे, 'ललित'चे वेगळेपण कसे जपणार ?

माझ्या मनात अजूनही हे प्रश्न भिरभिरत आहेत. मला या गोष्टीचे आश्चर्य वाटते आहे, आणि एक जाणीवही होते

आहे : काही माणसे आपल्या आयुष्यात, आपल्या नकळत मिसळून गेलेली असतात. त्यांची आपल्या रोजच्या जगण्यात ढवळाढवळ नसते. त्यामुळे उगाचच वाटते की ती आपल्या आयुष्याचा भाग नाहीत. कोठावळ्यांबद्दलही असेच वाटत आले. पण ते काही खरे नाही. मी त्यांच्यात, त्यांच्या व्यापात काही प्रमाणात गुंतलेली होतेच. एरवी असे रिते, उणावल्यासारखे का वाटले असते ? अर्थात ही भावनाही मनाच्या तळाशी बसलेली. रोजच्या व्यवहारांना तिची बाधा नाही. तळाशी राहणे हा काहींचा स्वभाव असतो. तुम्ही त्यांना सामावून घेतलेत तर ! त्याबाबत कोणताही आग्रह न धरता, ते त्यांची चव तुम्हाला देत राहतात ! कोठावळ्यांबाबत कित्येक लेखकांचा अनुभव माझ्यासारखाच असेल. ‘ दूरस्थ कुणी ’ या भूमिकेत ते त्यांच्याही आयुष्यात वावरले असतील. तेच त्यांचे वळण होते !

कोठावळ्यांचा व माझा स्वतंत्रपणे फारसा संबंध आला नाही. मी त्यांना काही वेळा भेटले ती त्यांच्या स्नेह्यांच्या वर्तुळात. एरवी मितभाषी, बाजूला राहणारे कोठावळे त्यांच्या स्नेह्यांच्या वर्तुळातही तसेच वाटत. ते फार मोकळेपणाने, भरभरून बोलल्याचे निदान मला तरी आठवत नाही. त्या वर्तुळात ते फार आनंदात असत एवढे मात्र निश्चित. इतरांच्या गप्पा एकाग्रपणे ऐकत. खळाळून हसत. स्वतः मधूनच एखादे वाक्य बोलत, किंवा एखादा किस्सा सांगत. जे त्या वर्तुळात, तेच कोणत्याही सभासमारंभात. त्यांतील काही सभासमारंभांचे यजमानपद कोठावळ्यांकडेच होते. पण कोठावळे यजमानाच्या भूमिकेत कधीच वावरले नाहीत. ते आलेल्या पाहुण्यांना एकमेकांवर सोपवून मोकळे ! पण यजमान बाजूला असला तरी व्यवस्था चोख. कसलाही गोंधळ नाही, अगत्यात कमतरता नाही. याचे कारण कोठावळ्यांचे ‘ अदृश्य ’ नियंत्रण. या भेटीगाठींत मला जाणवलेली आणखी एक गोष्ट अशी की, कोठावळ्यांमधला संपादक व प्रकाशक, अशा प्रसंगी नेहमी सावध असे. त्या गप्पांतून एखादी

कल्पना मिळाली तर ते ती चटकन उचलत; पण कोणी काही आपणहून सुचवले तर समारंभाच्या उमाळ्यात, चटकन स्वीकारत मात्र नसत. मला वाटते, त्यांचे स्वत:ला काय हवे आणि काय नको यासंबंधीचे एक पक्के गणित होते. तेथे त्यांनी तडजोड केली नाही. स्वत:ला हवे असणारे देणाऱ्या लेखकांनाच त्यांनी जवळ केले. त्यामुळे पुन्हा पुन्हा तीच तीच माणसे, असे थोडे होऊ लागले, पण विशिष्ट ठसा जपायचा म्हटल्यानंतर ते अटळच होत असावे !

आपले लेखक ते अचूक निवडत. एकदा ही निवड केली की मग त्यांना संपादक या नात्याने फारसे काही करण्याची गरज वाटत नसे, असा माझा अनुभव आहे. मी ' ललित 'साठी अधून-मधून लिहिले आहे. ते लिहिण्याआधी, किंवा लिहिल्यानंतर कोठावळ्यांशी त्यासंबंधी कधी चर्चा केल्याचे मला आठवत नाही. त्यांचा एकच कटाक्ष : ते ' ललित 'च्या चौकटीत बसते आहे ना ? मग झाले ! म्हणजे ' ललित 'च्या चौकटीत वेगवेगळ्या स्वरूपातले, शैलीतले साहित्य बसू शकते, हे त्यांना मान्य होते. त्याबद्दलच्या त्यांच्या कल्पना बंदिस्त नव्हत्या. म्हणून तर, ' सत्यकथे 'सारख्या वाङ्मयीन नियतकालिकाला जे उपक्रम हाती घेता आले नाहीत असे अनेक उपक्रम कोठावळ्यांनी पार पाडले. लेखकांमध्ये ' ललित 'ला काय पाहिजे, याचे भान निर्माण केले. वाचकांचे साहित्याबद्दलचे कुतूहल नेहमी जागे राहील असे काही-तरी ' ललित 'मधून त्याला दिले पाहिजे ही स्वत:ची दृष्टी आपल्या लेखकांनाही दिली. ' सत्यकथा ' ज्या काळात वाचकां-पासून दूर जात होती, त्या काळात ' ललित 'सारखे मासिक कोणतेही ललित साहित्य न देताही वाचकांच्या जवळ येण्याचा प्रयत्न करत होते; त्यामुळे वाचक व साहित्य यांच्या परस्पर-संबंधातील एक अनवस्था प्रसंग टळला असे स्पष्टपणे म्हटले पाहिजे; आणि उद्या ' सत्यकथे 'सारखे आणखी एखादे मासिक निघालेच तर त्याला वाचकवर्ग राहील याचे श्रेय नि:शंकपणे ' ललित 'ला दिले पाहिजे. ही वाचकाभिमुख दृष्टी हा कोठाव-

ळयांचा मला जाणवलेला फार मोलाचा विशेष ! ती न ठेवता, तुम्ही कितीही काही चांगले लिहिलेत तरी ते कोठावळयांना नापसंत ! काही वर्षांपूर्वी मी दिवाकर कृष्णांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर एक लेख लिहिला. तो लिहिला कोठावळयांच्याच सूचनेवरून. पण लिहिता लिहिता त्याचे स्वरूपच बदलत गेले. तो दिवाकर कृष्णांच्या कथेविषयीचा समीक्षालेख झाला. यावर कोठावळयांचे भाष्य : 'हे चांगले आहे, पण 'ललित 'मध्ये बसण्यासारखे नाही !' त्यांचे म्हणणे बरोबर होते. याचा अर्थ, ते ठराविक वाटेने झापडे लावल्यासारख गेले का ? मुळीच नाही. त्यांनी काही आव्हानेही स्वीकारली. उदाहरणार्थ, त्यांनी 'ललित' मधून सुरू केलेली 'ललित शिफारस,' 'आजचे समीक्षक' यांसारखी सदरे. एकीकडे ठणठणपाळ आणि दुसरीकडे याप्रकारची सदरे. वाचकाचे साहित्यासंबंधीचे कुतूहल दोन पातळयांवर जागे ठेवण्याचा हा 'गंभीर आणि गमतीदार' प्रयोग होता. त्यामागे एक विशिष्ट संगती होती; आणि पुन्हा त्यासंबंधी कोणताही आव नव्हता !

वाचकाला लेखकाबद्दल काय कळावे, याबद्दल संपादकाचा जसा एक दृष्टिकोन असतो, तसा लेखकाचाही असतो. त्यामुळेच कोठावळयांनी 'ललित'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध केलेल्या एकदोन सदरांत लिहिण्याचे मी नाकारले. इतके वैयक्तिक काही लिहू नये, ही त्या नकारामागची भूमिका. कोठावळयांना ती मी स्पष्टपणे न सांगताच समजली असावी, कारण त्यांनी मुळीच आग्रह धरला नाही, कोणतेही दडपण आणले नाही. सुचवायचे आणि निर्णय लेखकावर सोपवायचा. त्याला हवी तेवढी मुदत द्यायची. स्मरणपत्रे पाठवायची नाहीत. त्याने दिलेले लेखनासंबंधीचे एखादे आश्वासन त्याला पाळता आले नाही तर त्याला त्यातून मोकळे करायचे ! हे सगळे कोठावळयांनी माझ्याबाबत केले आहे. लेखकाला इतके मोकळे ठेवले की त्याचा स्वत:चाच एक अंकुश तयार होतो आणि त्याची टोचणी अधिक परिणामकारक ठरते ! हे नेहमीच घडते असे मी म्हणत नाही. घडत नाहीच. त्यामुळे काही वेळा 'ललित 'मधून मध्यम प्रतीचे साहित्यही आले आहे. लेखकांकडून 'टयूटोरियल 'सारखे लिहून घेणे

वाईट, तसे हेही वाईटच. अशा वेळी कोठावळ्यांमधला लॉटरी-विक्रेता जागा होत असावा. लेखकांकडून लॉटरीची तिकिटे घ्यायची. सगळीच बक्षीस मिळवून देणारी नसतात. काही जातात फुकट. पण म्हणून काय बिघडले ? कोठावळ्यांची संपादन-शैली अशी थोडी उलाढाली करणारी होती ! ही उलाढाल त्यांनी जाणूनबुजून केली, हे आवर्जून सांगितले पाहिजे; आणि लॉटरी लागल्याचेच क्षण ‘ ललित ’च्या आयुष्यात अधिक आले, हेही !

कोठावळ्यांनी ‘ मॅजेस्टिक प्रकाशन ’ही याच संपादकीय दृष्टिकोणातून चालवले असावे. त्यांनी उत्तम लेखकांची पुस्तके प्रसिद्ध केली. त्यांतील प्रत्येक पुस्तक उत्तम आहे का ? मुळीच नाही. पण येथेही कदाचित तीच उलाढालीची वृत्ती; आपले मध्यम पुस्तक या प्रकाशकाने प्रसिद्ध केले आहे, तेव्हा आपले उत्तम पुस्तकही त्यालाच दिले पाहिजे, असे लेखकांना वाटावे, हा छुपा डावही ! म्हणजे त्या लेखकाशी फक्त त्या पुस्तकापुरता संबंध असे नाही. दीर्घमुदतीचा व्यवहार ! माझा ‘ अनोळखी ’ हा कथासंग्रह त्यांनी फार थोड्या अवधीत प्रसिद्ध केला. तो एका विशिष्ट तारखेला प्रसिद्ध व्हावा यामागची माझी भावना त्यांनी जाणली, कारण त्यांच्याही मनात तीच भावना होती. पण संग्रह स्वीकारताना ते म्हणाले, ‘ कथासंग्रह फारसे खपत नाहीत. तरीही मी तुमचा संग्रह प्रसिद्ध करतो आहे, कारण तुम्ही पुढेमागे कादंबरी लिहिलीत तर ती मला द्यावीत अशी माझी अपेक्षा आहे ! ’ अगत्य आणि व्यवसाय यांचा असा हा विलक्षण मिलाफ !

अनेक नवे उपक्रम पार पाडून कोठावळे निघून गेले आहेत. उत्तम प्रतीचे रंजन कसे करावे, त्यातून प्रगल्भ अभिरुची कशी जोपासावी याचा नमुना त्यांनी घालून दिला आहे. त्याच नमुन्यात फेरबदल करण्याचे स्वातंत्र्य कसे देता-घेता येते हेही त्यांनीच दाखवून दिले आहे. अवतीभवती पुष्कळ स्नेही, हितचिंतक निर्माण करून ठेवले आहेत. आणि कोठावळे बाजूला उभेच आहेत. त्यांचे ते अदृश्य नियंत्रणही असणार आहे. मग शंका कशाला ? त्यांच्या मागे सगळे काही सुरळीत चालेल, असेच आपण मानू या !



३२२९
निबंध २९४४९

## संवाद

आमच्या कॉलेजच्या ग्रंथालयासाठी काही नवी पुस्तके घ्यायची होती. बाँबे बुक डेपो आणि मॅजेस्टिक बुक स्टॉल यांच्याकडून आलेले पुस्तकांचे गठ्ठे सोडून मी बसले होते. काही पुस्तके आधी वाचली होती– निदान पाहिली होती; काही अजिबात पाहण्यात आली नव्हती. प्राथमिक निवड करावी या हेतूने मी न पाहिलेल्या पुस्तकांवरून नजर फिरवत होते. त्यातली काही आपोआप बाजूला सारली. ती ग्रंथालयात असण्याचे काही कारणच नव्हते! बाजूला सारलेल्या पुस्तकांचा ढीग अधिककाधिक उंच होत असताना, माझा हात ज्या पुस्तकावर पडला, त्याचे नाव होते 'हँगओव्हर!' राखी रंगाचे मुखपृष्ठ. मधोमध मस्तकाला प्राधान्य असलेला काळचा रंगाचा चेहरा. मस्तक काळे; चेहरा राखी-काळा; डोळे नसलेला. ओठ विलग असूनही मूक वाटणारा. मुखपृष्ठाच्या तळाशी हँडटाइप सेट अक्षरांत लेखकाचे नाव: अच्युत बर्वे.

ते नाव वाचले, आणि मी समोरच्या इतर पुस्तकांचे अस्तित्व विसरले!

बर्व्यांचे हे पुस्तक केव्हा निघाले? मी पान उलटून प्रसिद्धीची तारीख बघितली: फेब्रुवारी १९८३. 'सुखदा' जुलै १९८१ चे आहे. त्यानंतरचे हे पहिलेच का? की दरम्यान आणखी एखादे पुस्तक प्रसिद्ध झाले? खात्रीपूर्वक सांगता येईना.

खात्री एकाच गोष्टीची होती : हे बर्व्यांचे शेवटचेच पुस्तक. आणखी काही जुने पडून असले तर ठाऊक नाही; पण नवे काही लिहायला बर्वे हयात नाहीत !

नंतर कितीतरी वेळ माझ्या मनात बर्व्यांचा मृत्यू घुमत राहिला. त्या नादात खूप जुने, मागचे काही आठवू लागले. खूप स्वैर; न लिहिलेले, न बोललेले. कधीतरी मी आणि बर्वे ते बोलणार होतो; कधीतरी मी त्यासंबंधी लिहिणार होते. सगळे राहूनच गेले.

'हँगओव्हर'च्या मुखपृष्ठावर विलग ओठ; 'सुखदा'-च्या मुखपृष्ठावर मिटलेले ओठ. पण ओठांच्या विलगपणाशी किंवा मिटलेपणाशी संवादाचा काय संबंध आहे ? कधी विलग ओठ बोलत नाहीत, काही मिटले ओठ बोलतात. का, हा प्रश्न इथे विचारायचा नसतो. कारण नसतेच. किंवा असले तरी आपल्याला समजण्यासारखे नसते.

'सुखदा' लिहिणाऱ्या बर्व्यांना हे चांगले ठाऊक होते.

'सुखदा'नंतर, बर्व्यांचा माझ्याप्रमाणे आणखी कितीजणांशी संवाद राहून गेला ? अचानक, अकारण आलेल्या मृत्यूने किती विलग ओठ तसेच मूक राहिले ?

तो बर्व्यांच्या आयुष्यातील सर्वांत अधिक विदारक अनुभव होता. त्याने मृत्यूनंतरही बर्व्यांची पाठ सोडली नाही का ?

बर्व्यांची पुस्तके एकूण किती हे मला निश्चितपणे सांगता येणार नाही. पण त्यांतली बहुतेक पुस्तके मी वाचलेली आहेत. काही माझ्या संग्रही आहेत. एखादे परीक्षणासाठी आलेले, एकदोन विकत घेतलेली. 'सुखदा' हे तर खुद्द बर्व्यांनीच दिले आहे.

दीनानाथ दलालांनी बर्व्यांचा 'झोका' हा संग्रह माझ्याकडे परीक्षणासाठी दिला होता. 'दीपावली' या वार्षिकाचे मासिकात रूपांतर झाले त्यावेळची ही गोष्ट आहे. ते परीक्षण 'दीपावली'त छापून आले. मी काय लिहिले होते, हे मला नीटसे आठवत नाही. पण जे लिहिले होते ते फारसे प्रशंसापर

मात्र नव्हत.

ते वाचून बर्व्यांना काय वाटले, कोण जाणे.

बर्व्यांची आणि माझी त्या वेळी ओळख तरी होती का ? तेही आठवत नाही.

एक मात्र स्वच्छपणे जाणवते. पुन्हा पुन्हा जाणवते. त्यानंतर बर्वे जेव्हा जेव्हा भेटले तेव्हा तेव्हा अगदी मोकळेपणाने वागले. मला ओशाळे, अस्वस्थ वाटावे असे काहीही त्यांनी केले नाही. माझ्या बाजूनेही तोच मोकळेपणा होता. कारण मी जे लिहिले होते त्यात प्रांजळपणा होता. कोणताही आव, आकस नव्हता. लेखकाला दुखवावे असे स्वप्नातही नव्हते. तसे घडले असते तर मला वाईट वाटले असते.

पण बर्वे दुखावले गेले नाहीत. अकारण धुमसत राहिले नाहीत. त्यामुळे त्यांच्या-माझ्यात जरासुद्धा ताण उरला नाही.

ज्या काही उडत्या, ओझरत्या भेटीगाठी झाल्या त्या अतिशय खुल्या, अनौपचारिक. त्या भेटीगाठींत आम्ही काय बोलायचो ? फारसे महत्त्वाचे काही नाही. गिरगावातल्या, जेथे भंडारी पद्धतीचे उत्तम मटण मिळते अशा एका दुकानाबद्दल त्यांचे व राजाध्यक्षांचे बोलणे चालायचे. ' एकदा जाऊ या ' बर्वे आग्रहाने म्हणायचे. पुढेपुढे ' ते राहूनच गेले ' असे म्हणू लागले. आम्ही एकमेकांना घरी येण्याबद्दल आमंत्रण द्यायचो. पण तेही राहूनच गेले. बर्वे या तऱ्हेच्या ' सामाजिक जीवना ' त फारसे कधीच रमले नाहीत, हे पुढे कळले. कळल्यावर बरे वाटले.

बर्वे भेटले की नेहमीच बरे वाटायचे.

बर्वे साहित्यिक सभासमारंभात कधी दिसायचे नाहीत. फक्त एकदाच दिसले. १९७४ च्या एप्रिल-मे महिन्यात, सिडनहॅम कॉलेजात, शासनाने उत्कृष्ट ठरवलेल्या पुस्तकांना पारितोषिके देण्याचा तो समारंभ होता. उत्कृष्ट पुस्तकांत माझ्या ' विदेही ' आणि बर्व्यांच्या ' पाठमोरी ' या कथासंग्रहांचा समावेश होता. बर्वे मंगलाबाईंसह आले होते. ते आमच्या पुढच्याच रांगेत बसलेले

असल्यामुळे आमचे अधूनमधून संभाषण चालले होते. बर्वे आनंदात होते. तो आनंद किती निरागस होत ! त्या आनंदामुळे इतरांचे भान सुटले नव्हते. एखादा 'मानकरी' जवळ आला की बर्वे त्याचे मनापासून अभिनंदन करत. जणू आपण येथे फक्त एक प्रेक्षक म्हणून आलो आहो अशा स्वरात ! ते स्वतःच्या जागेवरून उठलेही नाहीत; मग मिरवणे दूरच. साधे, सहज वागणे.

त्या समारंभाच्या ज्या काही आठवणी माझ्याजवळ उरल्या आहेत, त्यांतील एक : बर्व्यांचे हे सौजन्य; आणि दुसरी मंगलाबाईंचे रूप. ते रूप बर्व्यांच्या वागण्याइतकेच सिग्ध, खानदानी होते.

बर्वे लग्नसमारंभात मात्र पुष्कळ वेळा भेटायचे. 'वनिता समाजा'त लग्न असले की 'इथे जवळच राहतो मी. आत्ता येता का ?' असा आग्रह करायचे. ते कधीच जमले नाही. शेवटचे भेटले तेही 'वनिता समाज'मध्ये झालेल्या एका लग्नातच. त्या वेळीही त्यांचा तोच आग्रह, आणि आमच्या त्याच अडचणी.

एक भेट सरदारगृहात झाली होती. तो प्रसंग लग्नाचा होता, की दुसरा कसला ? आठवत नाही. जेवण होते. आम्ही बराच वेळ एकत्र होतो.

मला शुभदाबद्दल प्रथम त्या वेळी कळले.

'माझी एक मुलगी मुकी आहे. आर्टस् स्कूलमध्ये शिकली आहे. आम्ही तिला जिद्दीनं वाढवलं. आता तिचं लग्नही ठरलं आहे. तुम्ही आलं पाहिजे.' बर्वे म्हणाले.

त्या लग्नाला आम्ही जाऊ शकलो नाही. मला वाटते, आम्ही त्या वेळी मुंबईबाहेर होतो.

पण तेव्हापासून शुभदा माझ्या मनात रेंगाळत राहिली. शुभदाचे आईवडील आणि मी यांच्यात काहीतरी नाते आहे असे मला वाटत राहिले.

नाते आहेच.

माझा चुलतभाऊ शुभदासारखाच मुका आहे; एक आत्या

बावडी आहे. दोन लहानपणीच वारलेल्या आत्या मुक्या होत्या. त्यांतल्या एकीचा तर घरात अजूनही 'मुकी' असाच उल्लेख होतो. हे मुकेपण आमच्या घराभोवती माझ्या लहानपणापासून घिरट्या घालते आहे.

माझ्या चुलतभावाचे- बाबाचे–दुर्दैव माझ्यात रुतूनच बसले आहे. आत कुठेतरी ते मुकेपणाने वावरत असते, क्लेश देत असते. माझी सदसद्विवेकबुद्धी ते क्लेश आनंदाने स्वीकारते.

म्हणूनच शुभदा मनात रेंगाळत राहिली.

तेव्हापासून मी बर्व्यांचा फक्त लेखक म्हणून कधीच विचार करू शकले नाही.

बर्वे : मुकेपणाने दुःख सोसणारा एक माणूस.

माझ्या मनात त्यांची हीच प्रतिमा होती.

इतरांच्या मनात बर्व्यांची कोणती प्रतिमा होती ? बर्व्यांचे आणि आमचे काही स्नेही एक होते. पण आमचे कधी बर्व्यांविद्दल बोलणे होत नसे. याची दोन कारणे असावीत. त्यांतील एक उघडच आहे : सामाजिक गप्पांचा किंवा चर्चेचा विषय व्हावे असे बर्व्यांच्या व्यक्तिमत्त्वात काहीही नव्हते. हा माणूस इतका निर्लेप, इतका एकटा होता की गप्पांचे खाद्य म्हणून त्याला वापरण्याचा विचारही कोणाच्या मनात आला नाही. जाहिरातीच्या व्यापारी, गुंतागुंतीच्या जगात राहून–आणि तेही अत्युच्च पदावर राहून–बर्व्यांनी हे साधले, ही एक विलक्षण गोष्ट आहे ! दुसरे कारण तितकेच महत्त्वाचे आहे. काही माणसे जो स्नेह देतात, तो इतका एकाग्र, इतका वैयक्तिक असतो की त्यात कोणाला सहभागी करून घेणे अशक्यच असते. बर्व्यांनी या प्रकारचा स्नेह दिला. त्यामुळेच बर्वे या माणसाप्रमाणेच बर्वे या नावाचेही कधी अभिसरण झाले नाही. मराठी लेखकांपैकी फार थोड्यांना आपले वैयक्तिकपण इतके विनासायास जपता आले आहे.

लेखक म्हणूनही त्यांच्याविषयी फारशी चर्चा झाल्याचे ऐकिवात नाही. व्यावसायिक जीवनातील मोक्याच्या जागेचा

त्यांनी वाङ्मयीन जीवनात फायदा उठवला नाही. त्यांच्या लेखी ती दोन जगे वेगवेगळी राहिली. व्यावसायिक अनुभवांचा लेखनासाठी उपयोग करून घेतला; पण लेखनाशी संबंधित असलेल्या व्यवहारासाठी कधीही नाही !

त्या व्यवहारात बर्वे ओढले गेले ते दुसऱ्या टोकाकडून. 'आपले बर्वे आहेत ना तिथं' असे म्हणून कितीजणांनी त्यांच्याकडून जाहिराती मिळवल्या असतील, निदान शब्द टाकला असेल ! मीही आमच्या कॉलेजच्या एखाद्या स्मरणिकेसाठी त्यांच्याकडून एकदोन छोट्या जाहिराती हक्काने मागितल्या होत्या; आणि मला त्या मिळाल्या होत्या.

हा हक्क मला का वाटला ?

याचेही उत्तर बर्व्यांच्या व्यक्तिमत्त्वात शोधावे लागले. नेहमी देणाऱ्या टोकाला राहणारी माणसे घेणाऱ्याला एक प्रकारचे अबोल आश्वासन देत असतात का ?

तसे असेल. फार वेळा न भेटणाऱ्या काही माणसांबद्दल एक निर्मळ स्नेहभाव वाटतो. तो बर्व्यांबद्दल माझ्या मनात होता हेही खरे आहे.

बर्व्यांचे 'शिल्पी'मधले स्थान किती महत्त्वाचे आहे, हे मात्र मला परवापरवापर्यंत ठाऊक नव्हते ! आमच्या कॉलेजचे दोनतीन विद्यार्थी पुढे 'शिल्पी'त नोकरीला लागले. ते कधी भेटायला आले की मी बर्व्यांचे नाव घेत असे. ते विचारत, 'डु यू नो हिम वेल् ?' मी उत्तर देत असे : 'येस्'. हे खरे होते आणि नव्हते. त्यात बढाईचा भाग मात्र नव्हता.

पुढे कळले की बर्वे 'शिल्पी'चे चीफ एक्झिक्युटिव्ह होते. माझे विद्यार्थी त्यांचा इतक्या आदराने का उल्लेख करत, याचा उलगडा त्या वेळी झाला ! आपल्या वरिष्ठाबद्दल 'ही इज सच् अ फाइन पर्सन !' असे उद्गारइतक्या उत्स्फूर्तपणे निघालेले मी क्वचितच ऐकले आहेत ! बर्वे हा मराठी माणूस असल्यामुळे, या प्रतिक्रियेला माझ्या लेखी अधिक महत्त्व आहे.

माणूस बर्वे. लेखक बर्वे. अधिकारी बर्वे : तिघांबद्दल तोंडातून निघालेले किंवा न निघालेले उद्‌गार एकच : ‘ ही इज सच् अ फाइन पर्सन ! ’

असे हे विरळ, संदिग्ध पण विश्वासाचे नाते. त्या विश्वासापोटी, दोन वर्षापूर्वी मी बर्व्यांना एका कामासाठी फोन केला. माझी मुलगी मुक्ता नुकतीच परदेशातून परतली होती. नोकरीच्या शोधात होती. तिची इतर क्वॉलीफिकेशन्स उत्तम होतीच, पण ‘ मास कम्युनिकेशन्स ’ची पदविका मिळविल्यामुळे ती एखाद्या जाहिरात कंपनीत काम करायलाही लायक होती. त्यामुळेही बर्व्यांना फोन करताना संकोच वाटला नाही.

आणि त्यांनी तिच्यासाठी जे केले ते किती सुसंस्कृतपणे केले ! कोणतेही आढेवेढे नाहीत, कोणताही गाजावाजा नाही.

त्या करण्यामागे केवळ कर्तव्यबुद्धी नव्हती. कारण मुक्ताची नोकरी सुरू झाल्यावर एकदोन महिन्यांनी बर्व्यांचा आपणहून फोन आला, ‘ विजयाबाई, मी लक्ष ठेवून आहे; मुक्ताचं चांगलं चाललं आहे. ’ पुढे एकदा मंगलाबाईंनी हेच, इतक्याच अगत्याने सांगितले.

या सुसंस्कृतपणामुळे, अगत्यामुळे, मनावर दडपण राहिले नाही.

आज माझ्या मनात आहे ती एक सुंदर, मोकळी कृतज्ञता.

ही कृतज्ञता आणखीही एका कारणासाठी आहे : ते दिवस त्रासाचे होते. राजाध्यक्षांच्या आजारपणामुळे मन काळजीने ग्रासलेले होते. काही कटू अनुभवांच्या वाळवंटातून जात असताना ही हिरवळ फार सुखद वाटली.

बर्वेही त्या वेळी आजारी होते. असंख्य इंजेक्शने घेऊन कंटाळले होते. फारसे घराबाहेर पडत नव्हते.

फोनवरूनच एकमेकांची चौकशी आम्ही करत होतो. दिलासा देत होतो.

हे जरा नंतर. त्या आधी मी ‘ सुखदा ’ची जाहिरात

पाहात असे. जाहिरातीमुळे कादंबरीच्या विषयाची आधीच कल्पना आलेली होती; आणि तो विषय असल्यामुळेच कादंबरी वाचण्याची उत्सुकताही होती. ‘ सुखदा ’ ही अक्षरे पाहताना माझ्या मनात ‘ बाबा ’ ही अक्षरे जुळत. मी बाबाला विसरून ‘ सुखदा ’चा विचार करू शकले नाही. पण ही भावना मी अगदी माझ्यापुरती ठेवली. इतरांजवळ बोलले नाही. माझ्या वृद्ध काका–काकूंना मी या कादंबरीबद्दल अजून सांगितलेले नाही. कदाचित कधीच सांगणार नाही.

‘ सुखदा ’ वाचताना माझे मन त्या जुन्या दुःखाने ठणकत होते. हाच ठणका मी पूर्वी एकदा सोसला होता.

फार वर्षांपूर्वी ‘ इंडो जॅपनीज असोसिएशन ’तर्फे रीगलला ‘ हॅपीनेस ऑफ अस अलोन ’ हा जपानी चित्रपट दाखवला गेला. त्यात दोन मुक्या तरुण–तरुणींची कथा आहे. त्यांनी शब्दाशिवाय साधलेला कधी केविलवाणा, कधी उत्स्फूर्त, कधी मुक्त संवाद त्या चित्रपटात किती विलक्षण रीतीने दाखवला आहे ! त्यावर आधारलेल्या ‘ कोशिश ’ या हिंदी चित्रपटात त्या अनुभवाच्या फक्त काही छटा उतरल्या आहेत.

हे थोडासा कलात्मक दृष्टीचा वास असलेले विधान मी आज करू शकते आहे. ते दोन्ही चित्रपट पहात असताना मला दिसत होत्या त्या खुणा, हातवारे. त्या वेळी मी रडलेच, पण नंतर कित्येक दिवस मला वाटत राहिले, की आपण कोणाशी बोलू नये; शक्य असेल तर ऐकूही नये.

किती विचित्र इच्छा असतात ! तात्पुरत्या–पण त्या वेळेपुरत्या किती खऱ्या !

‘ सुखदा ’ वाचताना गुंतत गेले. अलिकडे फार थोडी पुस्तके सलगपणे वाचून होतात. ही कादंबरी एकदा हातात घेतली ती खाली ठेवलीच नाही. वैयक्तिक संदर्भ तर होताच. पण कादंबरी वाचताना तो आपोआप तळाशी जाऊन बसला. कादंबरी वेगळ्या कारणांसाठी आवडू लागली. वाचून संपल्यावर मनात विचार

आला, ' या कादंबरीवर लिहिलं पाहिजे. '

हे वाटणे कितीही खरे, तीव्र असले तरी ताबडतोब काही लिहिणे शक्यच नव्हते. पण त्या आवेगात मी बर्व्यांना एक पत्र मात्र लिहून टाकले. यामागे कोणताही उपचार नव्हता. बर्व्यांनी ते पुस्तक भेट म्हणून दिले नसते तरीही मी त्यांना पत्र लिहिलेच असते.

पुस्तकांबद्दलच्या प्रतिक्रिया पत्राने कळवणे मला जमत नाही. पण त्या वेळी हे घडले खरे.

मी या प्रकारची पत्रे लिहू शकत नाही, त्याप्रमाणे या प्रकारची पत्रे ठेवतही नाही. बर्व्यांचे पत्र मात्र मी अजून जपून ठेवले आहे. त्या पत्रातील ' सुखदा 'शी संबंधित भाग असा :

' हे माझ्या मुलीच्या बाबतीतले माझे आत्मचरित्र नाही. कारण ' सुखदा ' लिहिताना मी पुष्कळ Liberty घेतली आहे. स्वतःचे, तसेच अशा मुला–मुलींच्या आई-वडिलांचे अनुभव तसेच काही कल्पनेने चिंतारलेले असे हे चित्रण आहे. मात्र कादंबरीतली सुखदा व तिचे आईवडील ही वस्तुस्थिती आहे. जिद्द ही या लिखणाची नायक वा नायिका व्हावी अशी माझी अपेक्षा होती. '

माझ्या या कादंबरीबाबत काही शंका होत्या; आणि मी त्या बर्व्यांना कळवल्या होत्या. ' मी उद्या ८ दिवसांकरिता गावी जात आहे. आल्यावर तुम्हाला फोन करीन. तुमच्या शंकांची यथाशक्ती उत्तरे द्यायचा प्रयत्न करीन, ' असेही या पत्रात बर्व्यांनी लिहिले आहे.

बर्व्यांचे पत्र मी तसेच बाजूला ठेवले. आपण जे काही लिहावेसे वाटते ते लिहून टाकू, आणि नंतर सावकाशपणे बर्व्यांशी बोलू, असे ठरवले. त्या दृष्टीने पुन्हा एकदा कादंबरी वाचायला आणि टिपणे करायला सुरवात केली.

हे परीक्षण मी ' सत्यकथे 'साठी लिहिणार होते. ही गोष्ट बर्व्यांना विशेष आनंद देऊन गेली होती. याचा अर्थ, त्यांचे

' सत्यकथे ' शी काही भावनिक लागेबांधे निश्चितच होते. ' सत्यकथे 'त न लिहिणाऱ्या लेखकांचे ' सत्यकथे 'विषयी काही पूर्वग्रह असायचे. पण बर्वे हा पूर्वग्रहांच्या दडपणाखाली वावरणारा माणूस नव्हता.

मी कादंबरी पुन्हा एकदा वाचायला सुरुवात केली. ती वाचताना मला माझे लहानपण आठवू लागले. एकत्र कुटुंबात वाढलेली आम्ही चुलत– आते– मामे भावंडे. नातेसंबंधातील ताण, संवादातील अडचणी– हे सगळे पुष्कळ नंतर ऐकले. आम्ही ते काही अनुभवलेच नाही. एकमेकांशी– विशेषत: बाबाशी– आमचे सहज, मोकळे नाते होते. आम्ही खुणांनी त्याच्याशी बोलत असू, एकत्र खेळत असू; कधी आंबे पाडायला, तर क्वचित कधी एखाद्या सिनेमाला जात असू. बाबा माझ्या आतेभावाबरोबर शाळेतसुद्धा जात असे ! त्याला ड्रॉइंग शिकवायला एक मास्तर येत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे बाबा चांगले ड्रॉइंग करू लागला. दुसऱ्या एका मास्तरांनी तर त्याचे आयुष्यच बदलून टाकले ! त्यांचे नाव लेले मास्तर. ते रंगूनहून आले होते. बहिऱ्या-मुक्या मुलांना शिक्षण देण्याचा त्यांना अनुभव होता. त्यांनी बाबाला उच्चार करायला शिकवले. प्रत्येक व्यंजनाच्या उच्चारासाठी एक खूण निश्चित केली. त्यांनी सुरुवातीला त्याला ' प ' हे अक्षर शिकवले, आणि प ची बाराखडी. तेथेही स्वतंत्र खुणा. त्यामुळे बाबाशी आम्ही अक्षरन् अक्षर (खुणा करत) बोलू लागलो. ढोबळ खुणांची गरज उरली नाही. आम्ही ' पपा ' मास्तरांच्या आसपास असू. त्यामुळे त्यांनी बाबाला बोलायला, लिहायला, वाचायला कसे शिकवले हे मी अगदी जवळून पाहिले आहे. त्याने ते सगळे फार लवकर आत्मसात केले. आपला मुकेपणा त्याने कुठच्या कुठे फेकून दिला. तो लिहू-वाचू लागला–इंग्रजीसुद्धा; एकटा फिरू लागला. आता तर नोकरी करून चांगले कमावूही लागला !

कितीतरी आठवणी. त्या वेळी वाटले, हे सगळे सहज घडले.

आता मागे वळून पाहताना वाटते, सहजपणे घडलेले असणे कसे शक्य आहे ? न जाणवलेले कितीतरी ताण या घटनेत असणार होतेच.

ते सगळे ताण ' सुखदा ' वाचताना जाणवू लागले. पुष्कळ नवनवे तपशील आठवू लागले. ' सुखदा 'च्या आई-वडिलांच्या जागी बाबाचे आईवडील दिसू लागले ...

बर्व्यांनी लिहिले होते ते खरेच आहे : जिद्द हीच या शोक-नाटचात नायक किंवा नायिका असते ! असे काही दुर्दैव वाटचाला आले की फणा काढून ती त्याच्याशी मुकाबला करायला उभी राहते ! लहान लहान दुःखे माणसाला हतबल करतात; मोठे दुःख त्याला एक विलक्षण, अननुभूत बळ देऊन जाते !

एकीकडे मी सुखदा वाचत होते, टिपणे करत होते; आणि दुसरीकडे मला जुन्या आठवणी येत होत्या. त्यामुळे दुसऱ्या वाचनातही ओळन् ओळ टिपली जात होती.

ही सविस्तर टिपणे या क्षणी माझ्यासमोर आहेत.

त्यांच्या आधारे मी ' सुखदा 'वर लिहिणार होते.

काय लिहिणार होते ?

...ते सगळे आता लिहिण्यात अर्थ नाही. पण माझ्या त्या टिपणांतले काही त्रोटक प्रश्न हेच त्या परीक्षणाला आकार देणार होते. ते असे टिपले होते :

मला हे परीक्षण ' पत्र ' या रूपात लिहावेसे वाटते आहे का ? कादंबरी वाचल्यानंतर ' संवाद ' या अनुभवाचे मोल कळले आहे म्हणून आणि तो संवाद पत्रातूनच अधिक प्रत्यक्ष होईल म्हणून ?

या कादंबरीतला अनुभव बर्व्यांनी ' कलात्मक ' केलेला नाही. हा लेखक म्हणून त्यांनी घेतलेला एक धाडसाचा निर्णय आहे ... त्यामुळे इतरांना अर्थपूर्ण न वाटणारे तपशील आले असतील. पण येथे इतरांचा विचार नाहीच. तो अनुभव घेणाऱ्याच्या दृष्टीने प्रत्येक तपशील अर्थपूर्ण आहे.

हे लेखन ' आत्मचरित्रात्मक ' तर खरेच. काही खरी नावे जशीच्या तशी दिली आहेत; काही बदलली आहेत. हे केवळ व्यावहारिक अडचणी सोडविण्यासाठी केले, की ते जसेच्या तसे आठवणे क्लेशकारक झाले असते म्हणून ?

मुख्य म्हणजे लेखकाने स्वत:चे नाव का बदलले आहे ? आपण अगदी वेगळे काही लिहीत आहो, आणि ते वाचण्यासाठी, वाचकांच्या मनात आपली लेखक म्हणून जी प्रतिमा आहे ती संपूर्णपणे पुसली जावी ही अपेक्षा यामागे आहे.

नुसते नाव बदलले नाही. स्वत:ची लेखक ही करियर येथे अजिबात वगळली आहे का ? लेखक म्हणून वाचकासमोर येणे नकोच, म्हणून ?

यामुळे एक चांगली गोष्ट झाली. लेखक ही भूमिका घेतली असती तर ज वाङ्यीन पवित्रे आले असते तेही टळले.

पण एक तोटाही झाला का ? सुखदा कलावंत आहे. निवेदक हाही कलावंत दाखवला असता तर कलावंताचा कलावंताशी संवाद असा एक दृष्टिकोण स्वीकारता आला असता ? त्यामुळे कादंबरीतील ' संवाद ' या आशयसूत्राला आणखी एक परिमाण आले असते ?

आत्माविष्काराची खूप उत्कट अशी निकड या कादंबरीमागे आहे. तिने या कादबरीला खरेपणा दिला आहे.

माझ्या टिपणांच्या भारुडात लपलेली ही काही विधाने. काही प्रश्न आज मला स्वत:ला ती विस्कळीत वाटतात. त्यातून काय निर्माण झाले असते, याचा अंदाज करता येत नाही.

याच भारुडात आणखी एक प्रश्न होता : मला शुभदाला भेटावेसे वाटते आहे का ? एक व्यक्ती म्हणून ? व्यक्तिरेखा म्हणून !

या इच्छेमागे कदाचित जुन्या आठवणी होत्या, कदाचित कादंबरीच्या वाचनानंतर माझीही आत्माविष्काराची संवादाची

निकड वाढली होती. मी शुभदाला भेटले असते तर काय झाले असते ?

येथे मात्र मला अंदाज करावा लागला नाही. ती भेट घडलीच !

पण किती विचित्र परिस्थितीत ! मला बर्व्यांचे घर पहायचे होते– 'सुखदा 'मधील त्या घराचे कित्येक तपशील आठवत पहायचे होते; 'सुखदा 'बद्दलच्या काही शंका विचारायच्या होत्या. शुभदाला भेटायचे होते. 'सुखदा ' दुसऱ्यांदा वाचून पूर्ण होताच मी हे सगळे करणार होते.

त्या वेळी मला मंगलाबाई भेटल्या. दुसऱ्या दिवशी त्यांनी मला त्यांचे 'अन्नपूर्णा ' हे पुस्तक भेट म्हणून पाठवले. दोन्ही वेळा –एकदा समक्ष, आणि दुसऱ्यांदा फोनवरून–मी त्यांना सांगितले, 'लवकरच तुमच्याकडे येतो.'

बर्वे थोडेसे आजारी आहेत असे मंगलाबाईंच्या बोलण्यात आले. पण तेवढेच.

'सुखदा 'ची फक्त काही पाने वाचायची राहिली होती. आठदहा दिवस मी नियमितपणे वाचून ती संपवत आणली होती. त्या दिवशी मात्र असे काही व्यत्यय येत गेले की उरलेली पाने वाचणे अशक्यच झाले. रुखरुख राहिली.

आणि हा खंड ज्या दिवशी पडला त्याच दिवशी संध्याकाळी कळले की बर्वे गेले ! त्या वेळी काय वाटले हे शब्दांत सांगणे अशक्य आहे.

आम्हाला बातमी थोडी उशिराच कळली होती. आम्ही लगबगीने त्यांच्या घरी धावलो. स्वतःला निग्रहाने सावरणाऱ्या, पण मधूनच कोसळणाऱ्या मंगलाबाई मला पाहताच म्हणाल्या, 'यायला फार उशीर केलात हो ...'

खरेच, फार उशीर झाला होता.

माणसांच्या गर्दीत, खिन्न, बेचैन मनःस्थितीत माझी नजर शुभदाला शोधत होती ...

सगळेजण ' नमस्कार ' या खुणेने बव्र्यांचा शेवटचा निरोप घेत होते. शब्द संपले होते.

शब्द एकाच व्यक्तीजवळ होते. ती शेवटचा निरोप घेताना अस्फुट स्वरात म्हणाली, ' बाबा... बाबा...'

ते आक्रंदन शुभदाचे होते ! तिचे बव्र्यांशीच बोलून झाले नव्हते. तिला कितीतरी बोलायचे होते—बव्र्यांशीच नव्हे, सगळ्यांशी. म्हणून आमच्याजवळ खुणा होत्या, आणि तिच्याजवळ शब्द होते.

त्या देखण्या, समंजस, गुणी मुलीला कसे समजवायचे ?

मी शुभदाजवळ गेले, आणि भराभर खुणा करून तिला काहीकाही सांगत राहिले. तिचे आप्तस्वकीयही तिच्याजवळ होतेच. आम्ही सुचेल त्या मार्गाने तिच्याशी बोलत होतो....

बोलत होतो !

दूर कुठेतरी अंधारात समुद्राची गाज ऐकू येत होती. मन अधिकच उदास झाले होते...

घरी परतताना मला प्रश्न पडला होता, मी कोणाशी बोलले ?

शुभदाशी ? की बाबाशी ?

की बव्र्यांशी ?

की स्वतःशीच ?

## मला प्रभावित करणारे पुस्तक : चेंजिग : लिव्ह उल्मन

लिव्ह उल्मन या जगविख्यात नॉर्वेजियन अभिनेत्रीचे नाव मी वारंवार ऐकले होते. तिचे तीनचार चित्रपटही पाहिले होते. तिच्या विलक्षण तरल, संवेदनशील अभिनयाने मला भारावून टाकले होते. तो पाहताना मनात आले होते, हे सगळे दैवी आहे; आणि इंगमार बर्गमनसारख्या अत्यंत बुद्धिमान, कल्पक दिक्दर्शकाने त्याचे सोने केले आहे ! त्या दोघांमधील नाजूक स्नेहाबद्दलही ऐकले-वाचले होते. या सगळ्यामुळे लिव्ह उल्मन हा माझ्या प्रेमाचा, कुतूहलाचा विषय बनला होता. तिच्याशी संवाद साधण्याची ओढ मनात निर्माण झाली होती. पण ते कसे शक्य होते ? तिची भेट तर शक्यच नव्हती; तिचे सगळे चित्रपट, सगळी नाटके पाहून, त्यातून तिचा शोध घेणे हेही शक्य नव्हते. हे कळत असूनही मी हळहळत होते. एकदा मी माझ्या मनाची समजूत करून घेतली ' हे सगळे कशासाठी पाहायला हवे ? तिचा 'ऑटम सोनाटा' सारखा एखादा चित्रपट पाहिला तरी पुरे आहे. सगळी लिव्ह उल्मन त्यात एकवटली आहे. तिच्या मनातले सगळे तरंग त्या भूमिकेत प्रतिबिंबित झाले आहेत. तिचे एकटेपण, तिची दडपणे, तिच्या खंती, तिचा आनंद– सगळे. या चित्रपटात ती मुलीची भूमिका करते. त्या भूमिकेत ती आहेच, पण आईच्या भूमिकेतही ती थोडीशी आहे. हा आई-मुलीच्या नातेसंबंधाचे विलक्षण चित्रण करणारा चित्रपट पुन्हापुन्हा पाहात राहू या, आणि लिव्ह उल्मनचा

शोध घेत राहूया...

आणि मनाची ही समजूत पटवत असतानाच लिव्ह उल्मनचे ‘ चेंजिग ’ हे पुस्तक योगायोगाने माझ्या हाती आले. त्या वेळी मला झालेला आनंद कोणत्या शब्दांत सांगू ? एकतर तिचे असे एखादे पुस्तक आहे हे मला आधी ठाऊक नव्हते. ते अनपेक्षितपण मिळाल्यामुळे माझ्या आनंदातली थरारी वाढली होती; आणि दुसरे म्हणजे, मला जी लिव्ह उल्मन भेटायला हवी आहे ती मला या पुस्तकातून मनसोक्त भेटणार आहे अशी मला आतून खात्री वाटत होती पुस्तक वाचण्यापूर्वीच वाटत होते, तिचा अभिनय जेवढा नितळ, पारदर्शक आहे तेवढेच तिचे लिहिणेही पारदर्शक असणार. त्यात कोणतेही पवित्रे, सोंगेढोंगे असणे शक्यच नाही; आणि त्या लेखनाला तिने उगाच वाङ्मयीन रंग फासलेले असणेही शक्य नाही. कारण तिला काही लेखिका म्हणून मिरव-वण्याची इच्छा नाही; तिला फक्त स्वत:विषयी बोलायचे आहे, संवाद साधायचा आहे.

आतून खात्री होती, पण साशंकताही होती. मोठमोठी माण-सेही काही वेळा किती निराशा करतात ! त्यांना स्वत:ला शब्दांत पकडताच येत नाही. ते जे लिहितात ते काही वेळा किती वेगळे, किती गैरलागू असते ! त्यांच्यातला माणूस त्यांना सापडतच नाही. तसे तर या पुस्तकाबाबत होणार नाही ? मी आधी वाच-लेल्या काही निराशाजनक आत्मचरित्रांमुळे मी अशी साशंक झाले होते. पण काही सुखाचे अनुभवही होते. लक्ष्मीबाईंची ‘ स्मृतिचित्रे, ’ सीमॉन द बोव्हारचे चार खंडी आत्मचरित्र ... ‘ चेंजिग ’ही तसेच असेल ..

या विश्वासाने पुस्तक उघडले, आणि पाहिले पान वाचत असतानाच त्याचा अनोखा सूर मनात भिनू लागला. लक्षात आले की हे रूढ अर्थाने आत्मचरित्र नाही; ‘ आठवणी ’ हेही त्याचे स्वरूप नाही. त्याचा घाट फार वेगळा, लवचिक आहे. येथे स्वत:च्या आयुष्याविषयी खूप तपशीलवार असे काही सांगायचे नाही, ते

टाळायचेही नाही. फक्त स्वतःच्या व्यक्तिमत्त्वातील गाभ्याशी, मर्माशी येऊन भिडणारे तपशील वेचायचे आहेत. मुख्यतः स्वतः-विषयी, स्वतःमधील बदलाविषयी लिहायचे आहे. त्याचा आराखडा मनात तयार नाही. भूतकाळाकडून वर्तमानकाळाकडे, आणि वर्त-मानकाळाकडून भूतकाळाकडे असा उलटसुलट प्रवास चालू आहे. त्या अनुभवाबद्दल लिहितालिहिता मध्येच त्या लेखनाच्या प्रक्रिये-विषयीही काही सांगितले जाते आहे. सगळेच फार स्वाभाविक आहे. काय लिहायचे आहे हे मनात स्पष्ट आहे. ते लिहिताना येणाऱ्या अडथळ्यांची जाणीव आहे आणि त्यांच्यावर मात कर-ण्याची जिद्द आहे. लिव्ह उल्मनमधली कलावंत ही आव्हाने नम्रतेने आणि ईर्ष्येनेही स्वीकारते आहे... हे जाणवले आणि मी प्रभावित झाले. माझ्यातल्या लेखकाला या सगळ्यात कुठेतरी एक भक्कम आधार सापडला. असे वाटले की कोणीतरी ही विलक्षण, अशक्यप्राय गोष्ट साध्य करून दाखवत्ये आहे. याचा अर्थ निर्मितीला उज्वल भवितव्य आहे! कधीतरी त्या उज्जवल-तेचा एखादा किरण आपाल्यलाही लाभेल, तो आपल्यालाही त्या साफल्याचा सीमेपाशी नेऊन पोचवेल...! 'चेंजिंग'ने मला ही आत्मविश्वासाची भावना दिली; या अर्थाने माझ्यावर प्रभाव टाकला. पूर्णतेच्या दर्शनामुळे पडणारा हा प्रभाव होता.

पण माझ्यातल्या लेखकापेक्षाही माझ्यातल्या स्त्रीवर या पुस्तकाने अधिक प्रभाव टाकला. याचे कारण असे की लिव्ह उल्-मननेही हे पुस्तक लिहिताना आपले स्त्रीपण शोधण्याचा प्रयत्नच अधिक केला आहे. ती लेखिका आहे तो केवळ अनुषंगाने; अभि-नेत्री आहे तीही अनुषंगाने. या सगळ्याआधी ती माणूस आहे, स्त्री आहे आणि त्याविषयी लिहिणे हेच तिचे मुख्य उद्दिष्ट आहे. पुस्तकाच्या सुरवातीला ती म्हणते—

'I want to write about love-about being a human being-about loneliness-about being a woman.' सरळसोट आत्मचरित्र लिहिणे हा मुळी तिचा हेतूच

नाही. प्रसिद्धीच्या झोतातली लिव्ह उल्मन तिला पुन्हा एकदा येथे उभी करायची नाही. त्या झोताचा तिला उबग आला आहे; आणि म्हणूनच तिला स्वत:च्या कोषात शिरायचे आहे. ही गोष्ट खरे म्हणजे किती अवघड ! पण लिव्ह उल्मनला ती सहजपणे साधली आहे.

स्वत:च्या कोषात शिरून ती मुक्तपणे लिहिते; स्वत:बरोबर वाचकांनाही त्या कोषात घेऊन जाते. तिचे भावजीवन, त्या जीवनातील नाजूक, त्याचप्रमाणे कसोटीचे क्षण, या जीवनात जडलेले नातेसंबंध, या सगळ्यासंबंधीचे तिचे चिंतन, यामध्ये आपण झपाट्याने गुंतू लागतो. या सगळ्याशी असलेला आपला अदृश्य लागाबांधा आपल्याला उमगू लागतो. वाटते, ती जे आयुष्य जगली, ते जगताना तिला जे अनुभव आले, जे प्रश्न पडले, ते आपलेही आहेत. तिचे आयुष्य वेगळे, मोठे आहे, आणि तरीही त्यात सामान्य आयुष्याकडे धावणारे अनेक स्रोत आहेत. म्हणूनच हे आयुष्य एखाद्या बेटासारखे मुळीच नाही.

लिव्ह उल्मनचे बालपण ऑस्लो या शहरात गेले. ती ज्या कुटुंबात वाढली ते कुटुंब प्रतिष्ठित होते. परंपरा वगैरे गोष्टी मानणारे. अशा कुटुंबाच्या दृष्टीने लिव्हने चित्रपट-नाटकांत काम करणे हा एक मोठा धक्काच होता. त्यामुळे अडथळे आणण्याचा प्रयत्न झाला. लिव्हने त्याविषयी खुल्या वृत्तीने लिहिले आहे. त्यात कोठेही कडवटपणा नाही. 'आपण किती सोसले !' हा आर्त नाही. हे कडवट प्रसंग तिने सहजपणे मनाबाहेर ठेवले आहेत, आणि म्हणून काही सुखाच्या आठवणी तिला जपता आल्या आहेत. या प्रामुख्याने तिच्या आईच्या व आजीच्या आठवणी आहेत. 'चेंजिंग'-मध्ये त्या पावसाच्या अगदी हलक्या सरीसारख्या येतात, आणि पुस्तकाला एक वेगळीच प्रसन्नता देतात. त्या वाचताना, आपल्यालाही वैयक्तिक आठवणी येतात. लिव्हच्या आई–आजीत आपण आपली आई–आजी पाहू लागतो. तपशील वेगळे असले तरी जिव्हाळा तोच असतो. विशेष म्हणजे या आठवणीत हलकेपणा नाही, एक-

प्रकारची तटस्थता आहे. आपली आजी आपल्याला ओळखेनाशी झाल्यावर आपण तिला भेटायला जायचे बंद केले हे लिव्हने मोकळेपणाने लिहिले आहे, पण त्याच्या पाठोपाठचे वाक्य 'Grandma died and nothing was ever the same' हे आहे. स्वतःच्या मनाची गतिमान आंदोलने लिव्हची भाषा किती सामर्थ्याने पकडू शकते याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

कौटुंबिक नातेसंबंधांविषयी मोकळेपणाने, प्रांजळपणाने लिहिणे एकवेळ सोपे आहे; पण हाच प्रांजळपणा लिव्ह आपल्या पहिल्या नवऱ्याविषयी, आणि इंगमार बर्गमनविषयी लिहितानाही दाखवते. आणि हे सोपे नाही! हे दोन गुंतागुंतीचे, नाजूक संबंध तिने किती समंजसपणे उलगडले आहेत! आणखी कोणी ते सनसनाटी केले असते. आत्मचरित्रात तर ते तसे सनसनाटी होण्याचा धोका फारच असतो. लिव्हच्या पुस्तकात ते सनसनाटी होत नाही याची दोनतीन कारणे असावीत: एक म्हणजे तिच्या वृत्तीमधील अलिप्तता; दुसरे म्हणजे तिची विश्लेषक बुद्धी. या बुद्धीमुळे ती कोणत्याही अनुभवाच्या तपशिलांपेक्षाही त्या अनुभवाच्या व्यक्तिमत्त्वावर होणाऱ्या परिणामाला अधिक महत्व देते. त्यात होणारे बदल हेरण्यासाठी अधिक उत्सुक असते. म्हणजेच, लिहिताना तिचा रोख इतरांवर असत नाही तर तो नेहमीच स्वत:वर असतो— आणि स्वत:वर म्हणजे स्वतःमधल्या बदलावर. ती हे बदल एकसारखे टिपत आली आहे. विशेषत बर्गमनबरोबर राहू लागल्यावर आणि त्याची साथसंगत सोडल्यानंतर झालेले, होऊ घातलेले बदल तिला फार चांगले समजले आहेत. ते शोधण्यात ती इतकी गुंतली आहे की बर्गमनबरोबरच्या आयुष्याचे भारूड सांगण्याची तिला आवश्यकताच वाटलेली नाही. जेवढे सांगितले तेवढे पुष्कळ आहे, असा विश्वास आहे. आणि हे खरे आहे. पुस्तकाच्या शेवटच्या भागात तिने उभा केलेला कलावंत बर्गमन पाहिल्यावर वाचकालाही त्याचे पूर्ण दर्शन घडल्याचे समाधान मिळते. लिव्हची ही जगण्याची, आणि त्याबद्दल लिहिण्याची वेगळी दृष्टी वाचकालाही

एक नवी जाणीव देऊन जाते.

लिव्हने बर्गमनप्रमाणेच स्वत:मधल्या कलावंताचाही अत्यंत संवेदनाक्षमतेने शोध घेतला आहे. तिच्या या कलाजीवनाचे तपशील पुस्तकात अधूनमधून येतातच, पण पुस्तकातला एक मोठा तुकडा तिच्या रोजनिशीने व्यापलेला आहे; आणि शेवटचा भाग ती एका चित्रपटात काम करत असताना, तिने रेखाटलेल्या तिच्या आयुष्यातील एकतीस दिवसांच्या टिपणांचा आहे. ही रोजनिशी व ही टिपणे तिचे कलाजीवन ती कसे जगते आहे, त्यासंबंधीची तिची प्रतिक्रिया काय आहे याची कल्पना देतात. तिने जशी आपल्या मातृभाषेतील चित्रपटांत आणि नाटकांत कामे केली, तशी ती हॉलिवुडमध्येही नटी म्हणून चमकली. पण तिला खरा ओढ आपल्या मायदेशाचीच आहे. हॉलिवुडमध्ये ती रमत नाही. नॉर्वेजियन भाषेत नोरा उभी केल्यानंतर इंग्रजीत ती उभी करणे तिला कठीण जाते. इंग्रजीत तिच्या सगळ्या छटा येत नाहीत असेही वाटते. या एकाच गोष्टीतून तिला आपल्या मुळांचे कसे पक्के भान आहे हे कळते. दौरे चालू असले तरी मायदेशाच्या, घराच्या आठवणी पुन्हा पुन्हा येतात. हॉलिवुडमध्ये प्रसिद्धीच्या झगझगाटात तिला फार असुरक्षित वाटते. या संदर्भात एक गमतीचा अनुभव तिने सांगितलेला आहे. मुलाखती, छायाचित्रे वगैरे प्रकार एकसारखे चालू असतात. त्याचे दडपण असते. कधी तिच्या घरात चित्रीकरण होते. हेही तिला आवडत नाही. जे वैयक्तिक आहे ते उघडे झाल्यासारखे वाटते. तिने लिहिले आहे, ‘They photographed my home and my child, and my books- and thereby created an insecurity in me, which they left behind.’

पण यातले काही नाकारताही येत नाही. ही प्रसिद्धी स्वत:शी संवाद साधण्याच्या प्रक्रियेच्या आड येते आहे असे वाटते, आणि मग संघर्ष चालू होतो. भोवताल आणि स्वत:. पण या संघर्षात लिव्हचाच विजय झाला आहे. आपले ‘मीपण’ कायम

राखण्यात तिने यश मिळवले आहे.

कलावंत म्हणून लिव्हचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे विविध भूमिका करताना तिचा अखंड प्रयत्न स्वत:ला समजून घेणे हाच आहे. तिच्या 'डॉल्स हाउस'मधल्या नोराच्या भूमिकेबद्दल तिने लिहिले आहे, 'This is perhaps the last time I will play Nora and I want to devote myself to her. Through her try to discover where I stand as a woman today.'

स्वत:मधल्या स्त्रीचा शोध. या स्त्रीला प्रयोगानंतरची स्वत:ची इतरांनी केलेली स्तुती भुलवू शकात नाही– सगळेच पोकळ वाटते–आणि आत कुठेतरी घराच्या, मुलीच्या आठवणी होत राहतात; स्वत:ची ओढाताण, कोंडी जाणवत राहते. लिव्हला असेही वाटत का ही कोंडी केवळ तिच्याच नव्हे तर अवघ्या स्त्रीजातीच्याच वाटयाला आली आहे. यातून किती जणींना मुक्त होता येते ? लिव्हला या मुक्तीचा, तिच्या पोटी लपलेल्या सुखाचा ध्यास आहे, आणि ते दुर्मिळ आहे याची जाणीव आहे एके ठिकाणी ती म्हणते, 'I wonder how many Noras there are in the world who would like to go, but never dare. And if they go- where ? Is it important to know- or is it the actual step through the door that counts ?'

लिव्हचे हे प्रश्न फार महत्त्वाचे आहेत. एक स्त्री म्हणून मला ते भिडले; कट्टर, एकांतिक स्त्रीमुक्तिवादी भूमिका न घेताही स्त्रीच्या जीवनातील कोंडीचा, कारुण्याचा कसा विचार करता येतो, हे कळले. लिव्हला स्त्री असणे आवडते. त्या अस्तित्वाची शक्तिस्थाने तिला ठाऊक आहेत ; पण त्यावर पडलेली विषमतेची छायाही तिने पाहिली आहे. येथेच द्वंद्वाला सुरवात झाली आहे. हे आंतरिक द्वंद्व आहे. त्याचे लिव्हने सार्वजनिक वादात रूपांतर केलेले नाही. या आंतरिक द्वंद्वाचा अनुभव आज माझ्यासारख्या इतर असंख्य स्त्रिया घेत आहेत. आम्ही सर्वांनीच लिव्हने स्त्री-पुरुष

यांच्याबद्दलच्या विषम दृष्टिकोणाबद्दल लिहिलेला तुकडा वाचण्याजोगा आहे. पुरुषाला प्रत्येक गोष्टीत प्राधान्य मिळते, आणि स्त्रीला प्रत्येक गोष्टीतगौण भूमिका वठवावी लागते, प्रत्येक ठिकाणी जुळवून घ्यावे लागते. वेगवेगळ्या जबाबदाऱ्या स्वीकाराव्या लागतात. लिव्हने याबद्दलची आपली नापसंती, आपला निषेध नोंदवला आहे. पण तेवढे करून ती थांबत नाही. ती या प्रश्नाकडे, या परिस्थितीकडे समंजसपणेपाहते. ती म्हणते,आम्हाला प्रश्न पडतात, ते सोडवावे लागतात, तसे पुरुषांनाही प्रश्न पडतच असतात. मग आमच्यात तट का ? आम्ही एकमेकांना समजून का घेऊ नये ? ‘ We are together with our problems. We are not dangerous or threatening to each other-not in the moment we feel we need each other ’ हे पुरुषालाही का समजू नये ? त्याने स्त्रीला सर्व तऱ्हेने वापरण्याचा अट्टहास सोडून का देऊ नये ? स्त्रीच्या जाणिवेवरही याचे दडपण येते. तिला एकट राहणे कमीपणाचे वाटते. कारण एकटचा, अविवाहित स्त्रीला समाज कमी लेखत असतो. लिव्ह म्हणते, दुकटे असताना एकटे वाटण्यापेक्षा एकटे असताना एकटे वाटणे हे कमी भयंकर ! पतिपत्नींनी एकमेकांना चेंगरून टाकण्याचा प्रयत्न न करता, एकमेकांना मोकळेपणाने वाढू दिले, त्या वाढण्यातला आनंद अनुभवला तरच दुकटेपणाला खरा अर्थ हे सांगून तिने लिहिले आहे, ‘ Perhaps maturing is also to let others be. To allow myself to be what I am.’ लिव्हने आयुष्यभर सर्वात आधिक कदर या स्वयंपूर्ण अस्तित्वाची केली आहे; आणि म्हणूनच या पुस्तकाच्या केंद्रस्थानीही तिचे हे स्वयंपूर्ण अस्तित्वच आहे.

या पुस्तकाला आणखीही एक केंद्र आहे. आणि ते म्हणजे लिव्हची मुलगी लिन. तिलाच हे पुस्तक लिव्हने अर्पण केले आहे. मला हे फार अर्थपूर्ण वाटते. तो नुसता उपचार वाटत नाही. कोणताही अभुभव घेत असताना, कोणत्याही संघर्षातून जात असताना लिव्ह पुन्हापुन्हा लिनकडे आली आहे. इतकी ती तिच्यात

गुंतलेली आहे. आपण व लिन यांचा नातेसंबंध तिने फार कसून शोधला आहे. आणि लिनविषयी विचार करताना तिच्या मनात कायम एक खंतीची, अपराधाची भावना आहे. म्हणून आपले जे कर्तव्य आहे, ते पार पाडण्यात आपल्या हातून काही कसूर तर होत नाही ना, हा प्रश्न तिला एकसारखा पडला आहे मुलीच्या भवितव्याबद्दलच्या काळजीने भीतीने तिला काही वेळा ग्रासले आहे. भीती कशाची ? तर ही मोठी झाल्यावर हिच्यातलं चैतन्य स्वातंत्र्य कदाचित संपेल, ती एका प्रचंड रहाटात भरडली जाऊ लागेल याची. पण हे सगळे असूनही लिव्ह व लिन यांच्यात एक फार चांगला संवाद आहे या पुस्तकाला लिहिलेल्या समारोपात या संवादाला जणू पूर्णता आली आहे. हे लिव्हने लिनला उद्देशून लिहिलेले मनोगत आहे. आपल्या खंती, अपराधाची भावना व्यक्त करूनही लिनशी आपला असलेला संबंध किती निकटचा आहे, हे ती सांगते. आयुष्यभर आपली धडपड कशासाठी चाललेली होती, याबद्दल लिव्हला वाटते: Through the yers I have struggled with my profession Tried to find out who I am and 'why I am'

लिव्ह उलमनचे 'चेंजिंग' हे पुस्तक वाचताना तिला या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत असे वाटते; आणि मग तेच प्रश्न पडलेल्या माझ्यासारख्या एखाद्या स्त्रीला, कोणाला तरी ही उत्तरे मिळू शकतात, या जाणिवेतच एक फार मोठा आधार सापडतो. वाटते, जीवनाच्या या वाहत्या प्रवाहात आपणही लिव्ह-प्रमाणेच अखंडपणे बदलत राहावे आणि अखेर कुठेतरी आपल्या-मधल्या 'स्थायी'पणाला भिडावे. तसे कधीतरी घडेल या विचारानेच मी फार सुखावते. थरारून जाते !

मराठी ग्रंथालय ठाणे
3226
ग्रं. क्र. 24487
दि. 22-12-1998
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# स्मरण-विस्मरणाच्या काठावर

सुमारे तीस वर्षांपूर्वीचा काळ. ते माझे कविता नादावून वाचण्याचे वय होते. सुदैवाने चांगली कविता लिहिली जात होती आणि ती 'सत्यकथे'सारख्या मासिकातून किंवा संग्रहांतून वाचता वाचता स्मरणात ठसत होती. ना. घ. देशपांडे, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, इंदिराबाई अशा कित्येक कवींच्या कविता त्या काळात मनाने जपून ठेवल्या. शिवाय गोविंदाग्रज, बालकवी, कुसुमाग्रज, बोरकर, अनिल यांच्यासारखे त्या काळात प्रस्थापित झालेले कवीही मनात वास्तव्य करून होतेच. त्या वेळी मुखोद्गत झालेल्या कविता आजही आठवतात. अलीकडे नवे काही वाचलेले स्मरणात राहतेच असे नाही. त्याला वेगवेगळी कारणे आहेत. स्मरणशक्ती क्षीण होत चालली आहे हे त्यांतील एक कारण. पण ही क्षीण स्मरणशक्तीही त्या जुन्या कवितांबाबत सहसा दगा देत नाही. काही वेळा मात्र वेगळे घडते. आठवते, पण ते मुळाबर-हुकूम असत नाही. शब्द थोडे मागेपुढे झालेले असतात. असे का झाले हेही उमगते—पण ते मागून. मग प्रश्न पडतो, हे स्मरण की विस्मरण ?

दोन कवितांनी हा प्रश्न माझ्यापुढे उभा केला. त्यांतील पहिली गोविंदाग्रजांची 'प्रेम आणि मरण.' माझी फार आवडती कविता, पण तिच्या बाबतीतच एक मजेशीर अनुभव नुकताच आला. तो प्रसंग सांगण्याजोगा आहे. श्री. पु. भागवतांचा फोन

आला. त्यांनी विचारले, 'प्रेम आणि मरण'च्या शेवटच्या ओळी आठवतात? तो योग; खरा हटयोग; प्रीतिचा योग; लागला ज्याला.. पुढे काय?' मी चटकन उत्तर दिले, 'लागते मरावे त्याला हे असे.' भागवत म्हणाले, 'नाही. ती ओळ वेगळी आहे.'

वेगळी? चौथ्या कडव्यात तीच ओळ आहे. फक्त एक शब्द वेगळा. 'लागते मरावे त्याला'ऐवजी 'लागते जगावे त्याला.' बरोबरच आहे! तो 'गगनातील चंचल बालेसाठी' तळमळणारा वृक्ष आहे. तिच्या भेटीचा ध्यास त्याला जाळतो आहे. त्यामुळे त्याला टवटवी येत नाही; त्याचे पान हलत नाही, त्याच्या कळ्या फुलत नाहीत.. पण शेवटी तर ती 'बाला' भेटते आणि मग दुभंगून खाली पडतानाही त्याच्या अंगावर हर्षाच्या लहरी येतात, पाने फडफडून हसतात; आणि त्याच्या कळ्या कायमच्या खुलतात.. त्याच्या या भाग्याचा हेवा करत कवी म्हणतो, 'लागते मरावे त्याला, हे असे!' 'हे असे'मध्ये कीव नाही; हेवा आहे, अभिमान आहे– कारण त्या मरणात गोविंदाग्रजांच्या प्रेमविषयक तत्त्वज्ञानाची सरशी आहे. माझे स्पष्टीकरण तयार होते...

पण भागवत म्हणाले म्हणून ती कविता पुन्हा वाचली. शेवटची ओळ खरेच वेगळी होती. 'लागते मरावे त्याला' नाही तर 'लाभते मरणही त्याला' असे तिच्यातील पहिले तीन शब्द आहेत. शेवटचे दोन शब्द तेच. या 'लाभते'ने कवितेला किती उत्तुंग पातळीवर नेऊन ठेवले आहे! गोविंदाग्रज तो 'लाभ' मानतात. जणू दैवी लाभ. 'लागते मरावे त्याला' या शब्दक्रमात एकप्रकारचा 'व्यवहार' आहे; पण 'लाभते मरणही त्याला' या शब्दांत तो व्यवहार पुसून जातो. ते मरण हा जणू एक वर वाटतो. या संदर्भात पुढील 'हे असे'च्या अर्थछटाही बदलतात.

हे सगळे उमगत असूनही माझ्या मनात चुकीची ओळ कशी ठसली? केवळ चौथ्या कडव्यातील त्या प्रकारच्या ओळीशी असलेल्या साहचर्यामुळे! कदाचित 'लागते जगावे त्याला, हे

असे ' ही ओळ मीच रचून टाकली ! आपण कविता वाचत असताना पुष्कळ वेळा असे करतो. पण कवीची जातिवंत ओळ वेगळीच असते ! 'काव्य कराया जित्या जिवाचे जातिवंत जगणेच हवे' असे गोविंदाग्रजांनी लिहिले, ते काही खोटे नाही.

दुसरी कविता ना. घ. देशपांडे यांची. 'तुझ्यासाठी' तीही मला फार आवडणारी कविता. 'प्रेम आणि मरण' च्या मानाने खूपच लहान– फक्त १५ ओळींची; आणि त्या ओळीही एक किंवा दोन शब्दांच्या. शिवाय त्या कवितेचे 'गीत' झालेले. यशवंत देवांची सुंदर चाल. ते सूर पेलणारा कृष्णा कल्ले यांचा मोकळा आवाज... ना. घं. च्या कवितेतील प्रेयसीला साजेसा. ते गीत मला इतके आवडले की पुढे पुढे माझ्या मनात त्या कवितेऐवजी ते गीतच लहरत राहिले.

त्यामुळेच घोटाळा झाला. कवितेच्या पहिल्या ओळी

तुझ्यासाठी कितिदा,
तुझ्यासाठी रे
मी दुहेरी बांधल्या
खूणगाठी रे

अशा आहेत. देवांनी गीतरूप देताना 'तुझ्यासाठी' हा पहिला शब्द 'तुझ्याचसाठी' असा बदलून घेतला आहे. एकच अक्षर मध्ये घुसले. पण त्यामुळे कवितेचा एकूण सूरच किती बदलून गेला ! 'तुझ्याचसाठी'- म्हणजे कदाचित तुझ्या आग्रहाखातर... 'तुझ्याचसाठी 'मध्ये आपण प्रेमाखातर किती त्याग केला, किती धोके पत्करले हे थोडे ठासून सांगितले आहे... गीताच्या प्रभावामुळे माझ्या मनात ' तुझ्याचसाठी ' हाच शब्द राहिला.

पण पुढे केव्हातरी. भागवतांशीच बोलताना लक्षात आले की कवितेतला शब्द 'तुझ्यासाठी' हा आहे. आणि तोच ना. घ. च्या प्रेयसीच्या स्वभावाला अनुरूप आहे. ती ठासून काही सांगत नाही. जे करते ते सहजपणे, मुक्तपणे; ठरवून, इतर कोणाच्या आग्रहाखातर नव्हे, तर स्वयंप्रेरणेने; ती जे काही करते ते ती इतरांना

सांगतही नाही– जणू स्वतःलाच सांगते, असा एक 'स्वगता'चा सूरही कवितेत आहे. 'च' हे अक्षर तो सूर घालवून देते. त्या अक्षरामुळे आग्रह येतो, अधोरेखन येते. ना. घं. च्या कवितेतील प्रेयसीशीच काय, त्यांच्या एकूण कवितेशीच तो आग्रह विसंगत वाटतो. कारण ना. घं. च्या कवितेचा स्वभाव निगर्वी (unassuming) आहे. कवितेच्या पहिल्या कडव्यानंतरच्या स्वरबद्ध रूपात देवांनी तो स्वभाव ओळखलाही आहे.

मग पहिल्याच शब्दात हा बदल का? चालीची गरज म्हणून? पण 'तुझ्यासाठी' हा शब्दही त्या चालीत सहज बसतो. 'च' हे अक्षर नसले तरी चालीचे वजन बिनसत नाही. तेव्हा 'चाल' हे त्या बदलाचे कारण नाही. खरे कारण कवितेचे भाव-गीतात रूपांतर हे. भावगीत म्हटले की त्यात थोडा स्पष्टपणा आला. त्याचा भर सूक्ष्मतेपेक्षा सुगमतेवर अधिक. 'तुझ्याचसाठी' या शब्दामुळे वाचकांसाठी, पुढील आशय सुगम होऊन जातो.–गीतात 'च' हे अक्षर नसते तरी चालीचे वजन बिनसले नसते, त्याप्रमाणे कवितेत 'च' हे अक्षर असते तरी छंदाला, लयीला बाधा आला नसती. पण ना. घं. नी ते अक्षर नाही घातले! कारण ते आधी कवी– आणि नंतर गीतकार आहेत! त्यामुळे संवादापेक्षा स्वगतावर त्यांचा अधिक भर आहे. ना. घं. ची अवघी कविता हेच एक स्वगत आहे. हे ठाऊक असूनही माझ्या डोक्यात मात्र, 'तुझ्याचसाठी' हाच शब्द ठसलेला!

या प्रकाराला काय म्हणायचे? स्मरण की विस्मरण? माझ्या मनात अशी किती स्मरणे-विस्मरणे दडलेली असतील? कोण जाणे! पुष्कळ कविता, पुष्कळ ओळी मनात 'तळ्यातल्या साउल्यां'सारख्या लपलेल्या आहेत. असा एखादा खडा फेकल्या-खेरीज त्या सावल्या दिसणार नाहीत– आणि त्या सावल्यांचे मूळ असलेल्या आकृतीही! आपण किती कविता शोषून घेतली आहे, याचे मोजमाप ठेवणारे 'गणकयंत्र' अजून सुदैवाने उपलब्ध नाही. नसोच. स्मरण-विस्मरणाच्या काठावर लवलेली कवितेची फांदी मनात अशीच झुलत राहो!

# जपानी रमलाची रात्र

मी गेली तीस-पस्तीस वर्षे कविता वाचते आहे. प्रथम वाचू लागले तेव्हाचा काळ हा कवितेच्या बहराचा काळ होता. तो बहर सत्यकथा व अभिरुची यांसारख्या कवितेला अग्रक्रम देणाऱ्या मासिकांतून पाहायला मिळत असे. कवींची नुसती नावे वाचूनही डोळे निवत. त्यांच्या कविता अवर्णनीय आनंद देत. त्या आनंदाचे स्वरूप काय, हा प्रश्न त्या वेळी पडला नव्हता. कवितेचा आशय, आकृतिबंध, भाषा या घटकांची सुस्पष्ट जाणीव नव्हती. पण या अज्ञानाचा कवितेच्या आस्वादात व्यत्यय येत नव्हता. कविता आतपर्यंत पोचायची, आणि तेथेच काही काळ रेंगाळत राहायची. त्या वेळी वाचलेल्या व सहजपणे पाठ झालेल्या काही कविता अजून आठवतात. मधल्या काळात मराठी कविता पुष्कळ बदलली, माझी आवडनिवडही काही प्रमाणात बदलली. पण त्या कवितांनी दिलेला आनंद अबाधित आहे.

'जपानी रमलाची रात्र' ही बा. भ बोरकरांची कविता मला दीर्घकाळ आनंद देत आली आहे ती जेव्हा प्रथम वाचली तेव्हा कितीशी समजली असेल ? नंतरच्या असंख्य वाचनांमुळे तरी तिचा पूर्ण अर्थबोध झाला का ? तिच्या सौंदर्याचा सर्वांगीण प्रत्यय आला का ? ते अशक्यच असते. कितीही प्रयत्न केला तरी अंधुक जागा उरतातच; आणि हे ठाऊक असूनही प्रयत्न चालू राहतोच. हा प्रयत्न एकांतात, मूकपणे कविता वाचणारा वाचक

करत नाही, तर आपल्या आनंदात इतरांना सहभागी करू इच्छिणारा वाचक करतो. त्यासाठीच कवितेची समीक्षा लिहीली जाते आणि कवितेचे अध्यापनही केले जाते. मी मधल्या काळात या दोन्ही गोष्टी केल्या. त्यांची कविता कळायला मदत झाली यात काहीच शंका नाही. तोच हेतू होता. त्यामुळे या दोन्ही गोष्टींनी, निदान माझ्या बाबतीत तरी, व्यावसायिक रूप सहसा घेतले नाही. काही वेळा सक्ती झाली, कंटाळा आला हे खरे. पण असे प्रसंग अपवादात्मक होते. बहुतेक वेळा आनंदच मिळाला. हा आनंद कवितेच्या अंतरंगात शिरण्याचा आनंद होता.

काव्यविषयक लेखनापेक्षाही, अध्यापनातून हा आनंद अधिक मिळाला हे कबूल केले पाहिजे. लेखनाच्या वेळी ज्याच्याशी संवाद साधायचा तो वाचक प्रत्यक्षपणे डोळ्यासमोर नसतो. अध्यापनाच्या वेळी मात्र, श्रोता दिसतो. तो श्रोता विद्यार्थी असतो हे महत्त्वाचे. त्याचे मन कोवळे, संस्कारक्षम असते. कवितेला सन्मुख होण्याची त्याची प्रक्रिया नुकती कुठे चालू झालेली असते. त्याचे कवितेशी जडत असलेले हे नाते अध्यापकाला दृढ करायचे असते. शिवाय ही कविता परीक्षेला नेमलेली असते. त्यामुळे आस्वादाबरोबरच अभ्यासही साधण्याची जबाबदारी येऊन पडते. अगदी खरे सांगायचे तर ही तारेवरची कसरत आहे पण मी ती अनेक वेळा केली आहे, आणि आनंदाने. पण प्रत्येक वेळी दडपण आल्याखेरीज राहिले नाही. एकीकडे कवितेला न्याय द्यायचा—आणि दुसरीकडे विद्यार्थ्यांना—हे सोपे नाहीच. पण ते साधले तर फलदायी मात्र नक्कीच आहे. एखादी कविता समजावून सांगत असताना, स्वतःलाही ती अधिक समजण्याची शक्यता निर्माण होते—या दृष्टीने फलदायी. फळ नेहमीच पदरात पडते असे नाही पुष्कळ वेळा अपयशही येते—आणि त्याचे दुःख होते पण एखाद्या वेळी मिळणारे यश, निर्मितीच्या आनंदाशी तुलना करावी इतका निखळ आनंद देऊन जाते ! 'जपानी रमलाची रात्र' शिकवताना हा आनंद मिळाला.

ती आठवण सांगण्याजोगी आहे. मला वाटते, ही कविता मी इंटरच्या वर्गाला शिकवली. इंटरला नेमलेल्या पुस्तकात पुष्कळ चांगल्या कविता होत्या. त्यांतली ही एक. सगळ्याच चांगल्या कविता शिकवता येतात असे नाही. त्या दृष्टीने केशवसुत हा कवी छान. कोणत्याही पातळीवर आत्मविश्वासाने शिकवता येतो. मर्ढेकरांच्या बाबतीत थोडी वेगळी गोष्ट आहे. सोपे करावे लागते पण ते अगदीच अशक्य नसते. जेथे एखादी कविता पूर्णपणे समजत नाही, तेव्हा तसा कबुलीजबाब देणे हेही विद्यार्थ्यांना आवडते. काही वेळा त्यांना चर्चेसाठी प्रवृत्त करता येते. कवितेच्या शोधासाठी केलेला हा सहप्रवासही वेगळा अनुभव देऊन जातो. पण काही कवितांबाबत तो सहप्रवास कठीण वाटतो. ना. घ. देशपांड्यांच्या 'घरदिव्यात मंद तरी' या कवितेतील अनुभवात एखाद्या कोवळ्या विद्यार्थ्याला कसे सहभागी करून घ्यायचे? विंदा करंदीकरांच्या 'पोसवलेली केळ म्हणाली' ही एकटेपणी वाचायची कविता वर्गात कशी हाताळायची? 'जपानी रमलाची रात्र 'बाबतही थाडीफार ती अडचण होतीच. पण त्या अनुभवाचे स्वरूप, कवितेतील प्रतिमा– काही वेळा तपशिलांनाच मिळालेले प्रतिमारूप, याबद्दल सांगता येण्याजोगे होते. ते कसे सांगायचे याबद्दल मी विचार केला. वर्ग चांगला होता. हुशार, काव्यप्रेमी विद्यार्थी होते. त्यामुळे त्यांना समाधान देईल असे शिकवण्याची ईर्षा होती. विद्यार्थीही उत्सुक होते. 'बाई, ही कविता कधी घेणार?' असे विचारत होते. त्या विद्यार्थ्यांशीही माझे नाते होते. त्यामुळे त्यांची निराशा होऊ नये असे फार वाटत होते.

चाळीस-पंचेचाळीस विद्यार्थ्यांचा वर्ग. अगदी शांत. त्यांच्या चेहऱ्यावर उत्सुकता. त्या शांततेचा व उत्सुकतेचाच माझ्या मनावर ताण आला. एकदा सूर लागला की काळजी नाही. पण सूर लागलाच नाही तर? शिकवण्याचा दृष्टीने कविता खूप बारकाईने वाचली आहे. काही गोष्टी नव्याने जाणवल्या आहेत. एक ओळ मात्र उलगडलेली नाही. ती तेथे का, हे कळले नाही. ऐन

वेळी काही सुचेल या आशेवर विसंबून आहे. पण सुचलेच नाही तर ? . . . एकीकडे मी कविता शिकवायला सुरुवात केली होती, आणि दुसरीकडे हे विचार घोळत होते. ‘ तुझे विजेचे चांदपाखरू दीपराग गात...’ त्या जपानी स्त्रीच्या– गेशेच्या दिवाणखान्याचे देखणे नेपथ्य उभे करणाऱ्या पहिल्या काही ओळी... त्या तपशिलांना असलेल्या ऐंद्रियतेचा स्पर्श... त्यातून व्यक्त होणारी कवीची मीलनोत्सुक भाववृत्ती .. हे सगळे उलगडून सांगताना मी रंगल. कुंडीतील माड, धूप, भिंतीवरची ‘ विचित्र रेशिमचित्रे, ’ पियानो, म्यूसची कवने... या सगळ्या प्रतिमारूपातील तपशिलांमुळे निर्माण झालेले वातावरण वर्गातही तरंगू लागले.

आणि मी धाड्कन त्या न उलगडलेल्या ओळीवर आदळले : काही काळ विसरलेला प्रश्न पुन्हा उभा राहिला. या ओळीचे कवितेतील स्थान कोणते ? ‘ जळत उसासत होते त्यांसह अंतरात काही ’–त्यांसह म्हणजे ‘ म्यूसेच्या कवनांसह . . . या जळण्या–उसासण्याचा संबंध आधीच्या ओळींशीही आहे. या पार्श्वभूमीवर तो ‘ चिमणा लोकरी श्वान ’ सहजपणे येतो का ?

जळत उसासत होते त्यांसह अंतरात काही
होता चिमणा श्वान लोकरी घोटाळत पायी.

आधीचे तपशील अचेतन आहेत. फक्त हाच तपशील सचेतन आहे. का ?

मी क्षणभर गांगरले. या ओळीचा नेमका संदर्भ समजत नाही असे सांगून मोकळे व्हावे का ? तेही पटेना. आपण आव्हान स्वीकारावे असे वाटले. आणि मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांची निराशा करण्याचे जिवावर आले. आणि त्या मन:स्थितीत काय घडले कोणास ठाऊक ! मानसिक बांध फुटला, आणि मी क्षणार्धात पलिकडे गेले. त्या क्षणी मी बोलत होते. आणि ऐकतही होते.

‘ श्वाना ’चा उल्लेख वरकरणी विसंगत वाटेल, पण तो तसा नाही. कवीच्या भावनेला मिळालेले ते मूर्त रूप आहे. ही अत्यंत नाजूक भावना आहे. ‘ चिमणा ’ व ‘ लोकरी ’ या विशे-

षणांतून ती यथार्थपणे व्यक्त होते. त्या तंद्रीतही श्वानाचे पायात घोटाळणे जाणवते, कारण स्पर्श ही संवेदना अत्यंत तीव्र झाली आहे. म्हणून पुढील ओळीत येणाऱ्या स्पर्शसुखाच्या अनुभवाचा संदर्भ 'होता चिमणा श्वान घोटाळीत पायी' या ओळीत मिळतो. आणखी असे की, कवीच्या अचेतन विश्वाकडून सचेतन विश्वाकडे होणाऱ्या प्रवासाचा हा आरंभ आहे. श्वान हा त्या दोन विश्वांमधला जणू दुवा . . . सगळे हळूहळू सजीव होऊ लागते, 'ती' येते– आणि 'निजलेला' पियानोही जागून उठतो. त्याच्या कानशिलाच्या तारा झणाणतात.

स्पर्शे तुझिया आणि पियानो थरारला सारा
मजसम त्याच्या कानशिलाच्या झणाणल्या तारा.

शरीराला जाग येते, अतीव सुखाचा अनुभव येतो– आणि तो अनुभव घेताना पुन्हा एकदा अद्‌भुताचे दर्शन होऊ लागते. . . 'अवयव गमले चपल चिवट की मयवनिचे नेत्र'. आधी अद्‌भुत– नंतर अदभुत; आणि दोन अद्‌भुतांच्यामध्ये हा ऐंद्रीय अनुभव ...

मला बोलता बोलता असे बरेच काही सुचत होते. आता ते नीटसे आठवतही नाही. एका ओळीचा वेध घेताना तिच्या भोवतीचे बरेच काही मनात आकारले आणि ते विद्यार्थ्यांना सांगितले– त्यांना समजेल अशा शब्दांत.

काही दिवसांनी 'जपानी रमलाची रात्र' पुन्हा वाचली. काही नवी वलये तिच्या भोवती रेंगाळताना दिसली. प्रश्न पडला, कविता शिकवण्याचा प्रसंग आला नसता तर ही वलये दिसली असती का ? ती अचानक उमटली की, सुप्त मनात होतीच ?– असली, तरी विद्यार्थी हीच त्यांना जाग आणणारी शक्ती होती, यात शंकाच नाही.

# ओंजळीत
# स्वर
# तुझेच

सव्वीस ऑगस्ट.

मी संध्याकाळी सातच्या सुमारास व्ही. टी. वरून सुटणाऱ्या नागपूर मेलमधील एका फर्स्टक्लासच्या डब्यात बसले होते. माझ्याबरोबर दूरदर्शनचा 'प्रतिभा आणि प्रतिमा' हा कार्यक्रम सादर करणाऱ्या विजया जोगळेकर-धुमाळे होत्या. त्यांचे सहाय्यक विकास कुशाळकर कल्याणला चढणार होते. सकाळी अकोल्याला उतारायचे, आणि तेथे शूटिंगची सामग्री घेऊन आलेल्या गाडीतून मेहकरला जायचे असा आमचा बेत होता. विजयाबाईंनी ती सगळी व्यवस्था केली होती. गाडी दूरदर्शनच्या नागपूर केन्द्राकडून येणार होती. नागपूरचे छायाचित्रकार व इतर तंत्रज्ञ आमच्या सनवेत असणार होते. 'सकाळी सहाला अकोला येईल. ही मंडळी गाडी घेऊन स्टेशनवर येतीलच. आपण लगेच निघू. नऊापर्यंत मेहकरला पोचू...' आम्ही एकमेकींना सांगत होतो. मेहकरला आम्ही एका कामानिमित्त चाललो होतो. फार महत्त्वाचे, काही वर्षांपूर्वीच करायला हवे होते असे काम– आणि ते म्हणजे, 'प्रतिभा आणि प्रतिमा'साठी ना. घं. देशपांडे यांची मुलाखत चित्रित करणे. ते इतके लांबले होते की आता ते खरोखर च होणार आहे, यावर माझा विश्वासच बसत नव्हता! मनात थोडी धाकधूकही होती. ना. घं. आता थकले आहेत. आजारी असतात. आपण जाऊ तेव्हा त्यांची प्रकृती ठीक असेल ना ? हा मुलाखतीचा ताण त्यांना

सोसेल ना ?

एकीकडे ही धाकधूक–आणि दुसरीकडे ना. घ. चे गाव पहायला मिळणार, ना. घ. प्रत्यक्ष भेटणार, या कल्पनेने आलेली भरारी. मनात त्यांच्या कवितांचं गुंजन. त्या कवितांच्या आधारे मी केव्हाच भूतकाळात पोचले होते. ना. घं. च्या कविता जेव्हा नादावून वाचल्या तेव्हाचे बहरलेले दिवस आठवत होते. त्या कविता अजून सोबत होत्याच.

**झाला भास जुना म्हणून फिरलो**
**तो होत नाही कमी –**
**सारे जीवन डावलून बसलो**
**येऊन खेडयात मी**...

मनात या ओळींचे प्रतिध्वनी उमटले. ते खेडे कसे असेल ? आणि त्या खेडयात राहणारा आपला आवडता कवी कसा असेल ? मी मनात हीच चित्रे जुळवत होते. ती चित्रे पाहण्यात रमले होते.

तसे मी ना. घं. ना एकदा पाहिले होते. बहुधा १९६० साली. अनिलांबरोबर ते आमच्या कुलाब्याच्या घरी आले होते. राजाध्यक्ष घरी नव्हते. मी एकटीच आणि दोन लहान मुलींच्या व्यापात गुरफटलेली. शिवाय संकोचलेली. मला त्यांच्याशी फारसे बोलता आले नाही. बोलता आले असते तर किती बोलायचे होते ! 'शीळ'मधल्या कित्येक पाठ असलेल्या कवितांबद्दल, त्यांनी दिलेल्या आनंदाबद्दल... 'त्या कविता वाचून दाखवा' अशी विनंतीही करता आली असती. ना. घं. नी नाही म्हटले नसते. पण मला तेवढा धीरच नव्हता. त्याबद्दल ना. घं. निघून गेल्यानंतर चूटपूटही लागली नाही. कारण माझे मन ना. घं.च्या भेटीनेच तृप्त झाले होते. त्या तृप्तीत मी 'शीळ' उघडले आणि त्यातील काही कवितांना ना. घं.चा रेडिओवर ऐकलेला आवाज देत त्या ऐकू लागले. खास ना. घं.च्या लयीत.

१९६० ते १९८५–म्हणजे आता पंचवीस वर्षे झाली ! मधल्या प्रदीर्घ काळात भेट नाही, पत्रव्यवहारसुद्धा नाही. पण ना.

घं. भेटत होतेच. त्यांच्या 'अभिसार' या संग्रहामधल्या कवितां-मधून आणि नंतरही... 'अभिसार' नंतरही त्याचे कवितालेखन सातत्याने चालू होतेच. त्यांच्या कवितांना थोडी वेगळी झाक येऊ लागली होती. काही एकाकी उदासवाणी शब्दचित्रे, काही सामाजिक असंतोष व्यक्त करणाऱ्या कविता, काही मुक्तशैलीतील लेखन ... पण तो जुना सूरही घुमत होताच. नवे आवडत होतेच, पण तो जुना सूर ऐकू आला की आणखी बरे वाटायचे. मध्यंतरी ना. घ.ची 'कंचनीचा महाल' ही दीर्घ अप्रसिद्ध कविता वाचायला मिळाली. दोन वर्षांपूर्वी 'अनुष्टुभ'मध्ये एक सुंदर कविता वाचली. हे वाचत असल्यामुळे स्मरण ताजे राहिले. भेटीला इतकी वर्षे उलटून गेली आहेत असे वाटलेही नाही!

ही भेट आणखी थोडी आधी होऊ शकली असती ... व्हायला हवी होती. सातआठ वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. केशव केळकर तेव्हा दूरदर्शनवरचे मोठे अधिकारी होते. त्यांनाही ना. घं.च्या कवितेबद्दल फार प्रेम. 'प्रतिभा आणि प्रतिमा' हा कार्यक्रमही त्यांनीच सुरू केलेला. त्यामुळे ना. घं.ची त्यांच्या गावीच जाऊन मुलाखत घेण्याची कल्पना त्यांना आवडली होती. 'त्या कवितेला एक विशिष्ट परिसर आहे. त्या परिसरातच तिची ओळख करून घेतली पाहिजे,' असे मी त्यांना म्हटले होते. त्याबद्दल दुमत होणे शक्यच नव्हते. पण दूरदर्शनकडे त्या वेळी आत्ताइतक्या सोयी उप-लब्ध नव्हत्या. ठिकठिकाणी केंद्रही नव्हती. त्यामुळे सगळी जबाबदारी मुंबई केन्द्रालाच घ्यावी लागली असती. ते शक्य नव्हते. तो खर्चही पेलणारा नव्हता. या व इतर अडचणींमुळे केळकरांना तो विचार सोडून द्यावा लागला. आम्हाला खंत वाटली. थोडी निराशाही झाली. पण निरुपाय होता.

त्या वेळी हुकलेली संधी १९८४ साली पुन्हा आली. मेह-करच्या मंडळींनी ना. घं. चा अमृतमहोत्सवानिमित्त सत्कार करण्याचा बेत आखला होता. महानोरांचे ना. घं. वर फार प्रेम. त्यांचे ना. घं. कडे अधूनमधून येणेजाणेही. त्यामुळे या सत्कार

सोहळ्यात त्यांचा पुढाकार होता. त्यांनी आम्हाला त्याबद्दल आधीच कल्पना देऊन ठेवली होती. ' २५ फेब्रुवारीला समारंभ आहे. तुम्ही २४ ला येथून निघायचं. दोन दिवसांचा कार्यक्रम आहे. २७ ला तुम्ही परत येऊ शकाल.' त्यानंतर आमची पु. ल.–सुनीताबाईंशी भेट झाली. त्यांनीही ते दिवस बाजूला काढून ठेवले होते. ना. घं.चे जुने स्नेही, प्रसिद्ध भावगीतगायक गोविंद-राव जोशी हेही अर्थातच येणार होते. पु. ल., राजाध्यक्ष व जोशी यांचा सोहळ्यात महत्त्वाचा सहभाग असणार होता.

त्या वेळी पुन्हा माझ्या मनात आले, ना. घं. ची मुलाखत घेण्यासाठी ही किती सुंदर संधी आहे. त्या संधीचा फायदा दूर-दर्शन नक्की घेईलच. त्यांना तसे सुचविण्याचीही काही गरज नाही. त्यांना ना. घं. शी ऋणानुबंध असलेली इतकी मोठी माणसे एका वेळी मिळतील. हा सुवर्णसंधी दूरदर्शन वाया कसे घालवील ? काय अडचण आली कोण जाणे, पण तेव्हाही काही होऊ शकले नाही.

सुनीताबाई त्या समारंभाला जाऊ शकल्या नाहीत. माझीही ऐनवेळी काही अडचण आली– घरात आजारी असलेल्या माझ्या आत्याला टाकून मला जाववेना. त्यामुळे मीही गेले नाही. आणि गेले नाही हेच बरे झाले. कारण मी ज्या दिवशी मेहकरला जायला निघणार होते, त्याच दिवशी माझी आत्या आकस्मिकपणे वारली ! राजाध्यक्ष संध्याकाळी सात-साडेसातला बाहेर पडले– आणि ती पुढे दोन तासांनी गेली ! मी राजाध्यक्षांबरोबर गेले असते तर जन्मभर पस्तावत राहिले असते !

मेहकरच्या प्रवासात ही कटू आठवण मला एकसारखी टोचत होती. पण विजयाबाईंशी आणि विकासशी चाललेल्या दिलखुलास गप्पांत ती हळूहळू पुसट होत होती. दोघेही संगीतातले दर्दी. त्यामुळे त्या गप्पांत मधूनमधून सूरही मिसळत होता. डब्यात छान वातावरण तयार झाले होते.

सकाळी अकोला आले. आम्ही उतरलो. टी. व्ही.ची

मंडळी कुठे दिसेनात. वास्तविक ती आदल्या दिवशीच तेथे येऊन दाखल होणार होती, आणि सकाळी आम्हाला घ्यायला येणार होती. पण काहीतरी घोटाळा झाला. त्यांची आमची भेट होईपर्यंत नऊ वाजून गेले— आणि मेहकरच्या दिशेने निघायला जवळजवळ अकरा ! हा मधला वेळ एरवी फार वाईट गेला असता. ताण आला असता, चिडचिड झाली असती, मूड बिघडून गेला असता. पण तसें काहीच झाले नाही. उलट आमचा तो मधला वेळ फार छान गेला. याचे कारण आशा बगे— आणि त्यांचे अकोल्यातील घर !

मेहकरला अकोला मार्गे जायचे निश्चित झाल्यावर मी आशाताईंना पत्र टाकले होते. अलिकडच्या काही वर्षांत त्यांनी फार चांगले कथालेखन केले आहे. त्यामुळे त्यांना भेटण्याची इच्छा होती. त्यांचे तत्परतेने उत्तर आले. 'मी स्टेशनवर येते. आमच्याकडेच उतरा.' त्या आल्या होत्याच. त्यांच्याबरोबर आम्ही त्यांच्या घरी गेलो. अतिशय मनमिळाऊ, प्रसन्न माणसे. उदार वऱ्हाडी पाहुणचार. काही घरगुती, काही साहित्यिक गप्पा. आशाताई याही संगीतातील तज्ञ. त्यांच्या 'मारवा' या अतिशय सुंदर कथेत त्यांचे संगीतविषयक भान चोखपणे व्यक्त झाले आहे. त्यामुळे गप्पांना तो आणखी एक विषय. हळूहळू आमच्या गप्पा इतक्या रंगू लागल्या की, आपल्याला मेहकरला जायचे आहे हेच आम्ही क्षणभर विसरलो ! जायला निघालो तेव्हा मन प्रसन्न होते. पोटही चांगले भरलेले होते. शिवाय आशाताईंनी प्रवासासाठी दिलेली शिदोरी बरोबर होतीच !

अकोला ते मेहेकर हा प्रवास साधारणपणे दोन-अडीच तासांचा आहे असे कळले होते. विकास कशाळकर हे खरे म्हणजे त्या भागातले. पण नेमका रस्ता कोणालाच ठाऊक नव्हता. विचारत विचारत चाललो होतो. हवा छान होती. पाऊस नाही, आणि ऊनही नाही. वळणे घेत जाणारा रस्ता. दुतर्फा झाडी. हिरवेगार शेतमळे. स्वच्छ निळे आभाळ. सागाच्या मोहराने बहरलेली झाडं रस्त्याकांठी. ती पाहून डोळे निवले तशीच विलक्षण रंगांची इवली

रानफुले. किती समृद्ध निसर्ग होता! ना. घं.ची कविता या निसर्गाच्या सान्निध्यात वाढली. त्यांची 'सखू' या निसर्गात गाणे गात फिरली. सगळे प्रत्यक्ष पाहिलेले डोळ्यांत भिनलेले. तो 'जानपद' वातावरणाचा वास देण्यासाठी शिंपडलेला निसर्ग नाही!

पण ना. घं.च्या कवितेत समृद्ध निसर्ग आहे, तसा उजाड निसर्गही आहे. वाळलेली फुले... काळी गढी... ओसाडी... व साण....हेही खरेखुरे. मेहेकरमध्ये शिरताशिरताच तो उजाडपणा जाणवला. गाव अगदी लहान. वेडेवाकडे वाढलेले. एकूण रंग जुनाट. अरुंद, बोळच म्हणणे शोभेल असे रस्ते. ना. घं.नी या गावात वर्षानुवर्षे वकिली केली, म्हणजे ते प्रसिद्धच असणार. आम्ही त्यांच्या घरची चौकशी सुरू केली 'देशपांडे वकील कुठे राहतात?' अशीच. कारण या गावात त्यांना कवी म्हणून कोणी ओळखत असेल की नाही याविषयी शंका होती. लहान गावात स्वत:चा दबदबा निर्माण करणारे अनेक असतात. पण ना. घं. त्यांच्यापैकी नव्हते. ते स्वत:विषयी आपणहून कधी बोलणार नाहीत. (या मुलाखतीसाठी टी. व्ही.ची माणसे असल्याचेही येणार त्यांनी कोणाला कळू दिले नव्हते.) वकील म्हणून ते ठाऊक असणारच—कारण तो त्यांचा व्यवसाय. त्या व्यवसायात त्यांनी प्रतिष्ठा मिळवलेली. म्हणून आमचा ज्याला त्याला प्रश्न होता, 'ना. घ. देशपांडे वकील कुठे राहतात?'

'हंहं ... म्हणजे आपले ते कविराज?'' कोणीतरी विचारले. मी चकित झाले. सुखावलेही. (पुढे कळले की तो प्रश्न विचारणारे वृद्ध गृहस्थ हे एक हौशी कवी होते!) ते गृहस्थ मोठ्या खुशीत आमच्या गाडीत बसले व आम्हाला ना. घं.च्या घराची वाट दाखवू लागले. एवढ्याशा गावात, अरुंद रस्त्यातून उंचसखल भागातून जाणारी ती आमची मेटॅडोर. लोकांचे लक्ष गेल्याशिवाय कसे राहील? त्यांचे कुतूहल चाळवले गेले. हळूहळू ना. घं. च्या घराच्या आसपास गर्दी जमू लागली. ना. घं.च्या घराचा रस्ता चढणीचा होता. गाडी शेवटपर्यंत जाऊ शकली नाही. ड्रायव्हरने ती मध्येच

थांबवली. उरलेलं अंतर चालत आम्ही ना. घं.च्या घराशी पोचलो. दारावर त्यांच्या नावाची पाटी होती. मी मनाशी म्हटले, 'आपण खरेच आलो!' माझे जणू एक स्वप्नच पूर्ण होण्याच्या मार्गावर होते.

आम्हाला वाटत होते की आम्हाला उशीर झाला आहे. सगळी मंडळी आमची वाट पहात असणार. पण त्यांच्या दृष्टीने आम्ही लवकर आलो होतो. त्यांची कल्पना होती की आम्ही गीतांजलीने– म्हणजे संध्याकाळी येणार! दुपारचे दोन-अडीच वाजलेले. थोडी भूक लागली होती. आमचा विचार होता की बाहेर कुठेतरी जाऊन थोडे खाऊन यायचे. पण ना. घं.चे कुटुंबच्या कुटुंब आमच्या स्वागतासाठी सज्ज होते. आधी थंडगार पाणी. नंतर अर्ध्याएक तासात भरपूर खाणे–गरम चहा. ना. घं.च्या सुना, मुलगी किती अगत्याने आमची देखभाल करत होत्या. आम्ही चांगली सातआठ माणसे होतो. त्यामुळे आम्हाला संकोच वाटत होता. पण त्या मंडळींनी आमचे मुळी ऐकलेच नाही. 'आता सगळ्यांनी रात्री इथंच जेवायचं! पलिकडच्या (म्हणजे वि.घं. च्या) घरात सगळी व्यवस्था केली आहे.' ना.घं.चे वकील चिरंजीव आम्हाला प्रसन्न चेहऱ्याने सांगत होते. (आमच्या मुंबईला भर दुपारी आठदहा माणसे अनपेक्षितपणे आली तर काय हाहा:कार उडेल, असा विचार मनात आल्याखेरीज राहिला नाही!)–हे सगळे घडत असताना माझे डोळे ना. घं.ना शोधत होते. ना. घं. कुठे आहेत? आम्ही त्यांच्या दुपारच्या विश्रांतीत व्यत्यय तर आणला नाही?

तेवढ्यात ना. घं. आलेच. कृश, थकलेले दिसले. पण चेहऱ्यावर प्रसन्नता होती. त्यांनी आस्थेने चौकशी केली. पुढचा कार्यक्रम विचारून घेतला. विजयाबाईंनी त्यांना कल्पना दिली. गेल्याबरोबर लगेच रेकॉर्डिंगला सुरुवात करावी लागणार, बोलायला फारसा वेळ मिळणार नाही हे ठाऊक असल्यामुळे मी. ना. घं. ना. आधीच एक कच्चा आराखडा पोस्टाने पाठवून दिला होता. त्यात 'तुम्ही

कोणतेही फेरफार करा, नवे काही सुचवायचे असल्यास सुचवा.' असे मी त्यांना लिहिले होते. मी त्याबद्दल त्यांना विचारले. ते म्हणाले. ' मी सगळं तुमच्यावर सोपवलं आहे ! ' त्यांचा कशाबद्दल आग्रह नव्हता ! मोठेपणाची कोणतीही झाक त्यांच्या वागण्यात नव्हती. माझ्या मनात तुलना चालू होणे अपरिहार्यच होते. त्या तुलनेत, ना. घं. चे हे साधेपण किती दिलासा देणारे वाटले.

...एकीकडे आमच्या गप्पा चालू होत्या. पण गप्पा मारता-मारताच विजयाबाईंनी स्वतःची ' सामग्री ' हेरायला सुरवात केली होती. ना. घं. चे चिरंजीव त्यांना मनापासून मदत करत होते. ना. घं. ची पुस्तके व हस्तलिखिते तर त्यांनी आणून दिलीच, पण त्यांच्या गीतांच्या ध्वनिमुद्रिकाही भराभर काढून दिल्या. त्यांतल्या काही आता मिळतही नसतील. त्या ध्वनिमुद्रिका पाहताना ना. घं. ची गीते ज्या काळात गाळात गाजली तो काळ आठवत होता. त्या काळाची आठवण देणारी एक फार दुर्मिळ गोष्ट ना. घं. च्या घरात होती. कर्णा असलेला फोनो ! तो चालत नव्हता म्हणून ओळखीच्या एका घरातून रेकॉर्डप्लेअरही आणला. मला ना. घं. ची ती सगळी गाणी एकामागून एक ऐकायची फार इच्छा होती, पण तेवढा वेळच नव्हता !

ना. घं. चे, त्यांच्या घराचे 'शॉट्स' घेतले जात होते. त्यांच्या कवितेचा परिसर चित्रित करण्यासाठी उपयुक्त असणाऱ्या जागा निश्चित केल्या जात होत्या. ना. घं. सूचना करत होते— पण त्याही सौम्य, अनाग्रही वृत्तीने.

' तुम्ही सेंदुरजनला जाणार का ? ते माझं जन्मगाव.... येथून २५–३० मैलांवर आहे... तुम्ही उद्या सकाळी तेथे जाल असे समजून सगळी व्यवस्था करून ठेवली आहे. जाणार नसाल तर तसा निरोप पाठवावा लागेल. नाहीतर ती मंडळी वाट पहात राहतील.'

आमच्यापाशी वेळ थोडा होता. दुसऱ्या दिवशीचे संध्या-

काळचे परतीचे रिझर्व्हेशन होते. त्यामुळे दुपारपर्यंत अकाल्याला पोचणे भागच होते. सेंदुरजना व ना. घं. च्या चरित्राच्या दृष्टीने, जवळच असलेले दुसरे गाव साखरखेडा ही दोन्ही गावे करायची तर सगळे मिळून पाचसहा तास तरी लागणार होते. त्यामुळे विजयाबाई साशंक होत्या.

'आपण जाऊ. कसेही करून जमवू.' मी म्हणत होते.

'आपण आमच्याबरोबर याल ना ?' मी ना. घं. ना विचारले.

त्यांनी नकार दिला. ते म्हणाले, 'मी कुठेच बाहेर जात नाही. त्रास होतो.' मग मलाही पटले. नुसती त्या गावांची चित्रे घेण्यासाठी तिथे जाण्यात काहीच अर्थ नव्हता. ना. घं.ची प्रकृती लक्षात घेता त्यांना आग्रह करण्यातही काही अर्थ नव्हता. मग आम्ही तो विचार सोडून दिला. (त्या गावांचे, तेथील घरांचे फोटो नंतर ना. घं. नी पाठवून दिले. विजयाबाईंनी कार्यक्रमासाठी त्या फोटोंचा उपयोग केलाही.)

पण एका बाबतीत आग्रह धरावाच लागला. ना. घं. म्हणत होते.

'चित्रीकरण घरीच करा. मला बाहेर कुठे जाण्याची दगदग सोसणार नाही.'

एक तर, घरी चित्रीकरण करणे शक्य नव्हते. कारण चित्रीकरणाची सगळी सामग्री मांडण्यासाठी तेथे तेवढी जागाच नव्हती. मुख्य खोलीला नुकतीच सफेदी लावलेली दिसत होती तीही चित्रीकरणाच्या दृष्टीने गैरसोयीची होती. त्या खोलीची, तेथील कायद्याच्या पुस्तकांची काही दृश्ये घेतली होतीच. पण सबंध चित्रीकरण तेथे करायचे म्हणजे...

'निदान काही भाग तरी आपण बाहेर करू या!' आम्ही ना. घं. चे मन वळवले. ते तयार झाले. पूर्वार्ध 'कंचनीच्या महाला'च्या परिसरात आणि उत्तरार्ध शेजारीच असलेल्या त्रि. घं. च्या ऐसपैस घरात असे ठरले. आम्ही निघालो. ना. घं.

आमच्याबरोबर यायला तयार झाले खरे, पण मनात धाकधूक होतीच. त्यांना झेपेल ना ? पण मात्र खुशीत होते. आमची गाडी कांचनीच्या महालाच्या दिशेने जात असताना दिसणाऱ्या परिसराबद्दल खूप बोलत होते.

वि. घं. देशपांडे यांचे घर ! उत्तरार्धाच्या चित्रीकरणाचे ठिकाण. आधी जेवायचे, आणि मग सुरुवात करायची, असे ठरले होते. ना. घं.च्या सूनबाईंनी सगळी जय्यत तयारी ठेवली होती. श्रीखंडपुरीचे सुग्रास जेवण. पंधरावीस माणसांची पंगत. कारण ना. घं.ची इतर कुटुंबीय मंडळीही या निमित्ताने आली होती. जेवणापूर्वी, जेवताना, आमच्या त्यांच्याशीही गप्पा चालू होत्या. बोलताना एक गोष्ट फार तीव्रतेने जाणवली. ना. घं.च्या घरच्या माणसांना त्यांच्याबद्दल, त्यांच्या कवितेवर फार प्रेम आहे. नुसते भाबडे प्रेम नाही. ना. घं.ची कविता त्यांच्या ओळखीची आहे. ना. घं.चे वकील चिरंजीव त्यांच्या कविता छान गातात असे ऐकले होते. जेवणानंतर तो कार्यक्रम करण्याचा बेत होताच.

आमच्या गप्पा चालू असताना ना. घं मात्र स्वतःच्या घरी गेले होते. जाताना सांगून गेले होते, ' मी जरा विश्रांती घेतो. जेवणही तिकडेच घेतो.' ते थोडे थकले होते हे उघडच होते. आम्ही ठरवले की उत्तरार्धाची सगळी तयारी पूर्ण झाल्यावर मगच त्यांना बोलावणे पाठवायचे. त्यांना विश्रांतीची आवश्यकता होतीच.

मजेत जेवणे आटपली. विजयाबाईंनी उत्तरार्धाच्या चित्रीकरणाची पूर्वतयारी सुरू केली. झगझगीत दिवे लागले. (दुपारी ना. घं.च्या घरी काही दृश्ये घेतली जात असताना वीज गेली होती. पण ताबडतोब फोन करून त्यांनी माणूस बोलावून घेतला. सगळे ठीक झाले. मुंबईत असे झाले असते तर... )

कॅमेरा उभा राहिला. खुर्च्या ठेवल्या गेल्या.

हे सगळे चालू असताना बाहेर गर्दी जमली होती. गलका चालू होता. चित्रीकरणात व्यत्यय येऊ नये, म्हणून ती गर्दी पांगविणे भागच होते. तरीही काही माणसे रेंगाळलीच.

सगळी तयारी पूर्ण झाल्यावर ना. घं. आले. त्यांच्या चेहऱ्यावर थकवा दिसत होता. ते खुर्चीवर येऊन बसल्यावर कोणीतरी येऊन त्यांच्या तोंडावर पावडरचा पफ फिरवला. माझ्या मनात आले, हा ना. घं.ना झालेला मेक-अप्चा एकमेव स्पर्श असेल? ना. घंनी नेहमी जपला तो आपला नैसर्गिक, स्वाभाविक चेहरा. चेहऱ्यावर पावडरचा हात फिरवल्यावर ते थोडेसे हसले. चित्रीकरणासाठी लावलेल्या झगझगीत दिव्यांचाही त्यांना त्रास होत होता. पाठीला शेक बसत होता. पंखे बंद केल्यामुळे उकडतही होते. या सगळ्यामुळे ते अस्वस्थ होते. पण तसे न दाखवता मनापासून सगळे सहकार्य देत होते.

ना. घं.ना कितीतरी विचारायचे होते. त्यापैकी काही विचारून झालेही. आणखी विचारता आले असते– मुख्यत: त्यांच्या 'शीळ'नंतरच्या कवितेतील बदलांबद्दल– त्यांनी आविष्कारात जे विविध प्रयोग केले त्याबद्दल. 'शीळ'मधल्या कविता जेवढ्या ठसल्या तेवढ्या 'अभिसार'मधील ठसल्या का? गीतांमुळे वाचकवर्ग वाढला का? की 'रानावनात गेली बाई शीळ'पासून 'तुझ्यासाठी कितिदा तुझ्यासाठी रे' पर्यंतची गीते आवडीने ऐकणाऱ्या रसिकाला ना. घं. कवी म्हणून अपरिचितच राहिले? ना. घं.चा याबाबतीत काय अनुभव होता? ते 'कोल्हापूर सकाळ' मध्ये 'फुले आणि काटे' या शीर्षकाचे सदर सुरू करणार होते. त्या सदराचे संकल्पित स्वरूप काय आहे? 'जे कवितेतून सांगता येते, ते गद्यातून सांगणेही जमले' असे वाटू लागल्यास कवितेची एकाग्रता ढळेल म्हणून गद्याची वाट बंद केलेल्या ना. घं.नी हे गद्यलेखन का सुरू केले आहे? ही आत्माविष्काराची ऊर्मी केव्हा आली? कितीतरी प्रश्न. पण विजयाबाईंनी फक्त ५० मिनिटांचा कार्यक्रम आखला होता. त्या मर्यादेपलीकडे जायचे नाही असे त्यांचे सांगणे होते. शिवाय ना. घं. दमले होते. 'कंचनीच्या महाला'च्या परिसरात उत्साहाने, खणखणीत बोलणारे, दीर्घ उत्तरे देणारे ना. घं. उत्तरार्धात जरा कमी बोलत

होते. हे जाणवल्यावर मीही आवरते घेतले.

आणखी असेही वाटले की ना. घं.च्या बोलण्याइतकाच त्यांच्या कवितावाचनाचा योगही दुर्मिळ आहे. ते कविता छान वाचतात. अलीकडे कित्येक वर्षांत ते कविसंमेलनात सहभागी झालेले नाहीत, त्यामुळे त्यांच्या तोंडून त्यांच्या कविता पुष्कळांनी ऐकल्याच नाहीत. श्रोत्यांना तो आनंदही दिला पाहिजे पण पुन्हा तोच प्रश्न. मर्यादित वेळात किती कविता वाचायला सांगणार ? फार आवडणाऱ्या कित्येक कविता मला आठवत होत्या. त्यातील ज्या कवितांच्या ध्वनिमुद्रिका निघाल्या होत्या, त्या वाचायला सांगण्याचे मी मुद्दामच टाळले. त्या सोडून इतर काही कविता, एक विशिष्ट सूत्र पकडून वाचायला सांगितल्या. वर्षानुवर्षे ना. घं.च्या मनात घोळणाऱ्या त्या कविता त्यांच्याच आवाजात ऐकताना फार बरे वाटत होते. ना.घं.नी शेवटची कविता वाचली तिची शेवटची ओळ होती—

'अजून माझ्या तळहातावर सुगंध उरले ..सुगंध उरले...'

हे जणू ना. घं. च्या वाचकांचेच मनोगत होते ! ना. घं.च्या कवितांचा गंध दरवळला, तो अजून तसाच उरला आहे.

चित्रीकरण संपल्यावर लगेच ना. घं. घरी गेले.

आम्ही इतर मंडळी मात्र नंतर खूप वेळ बोलत बसलो होतो. ना. घं. हेच त्या गप्पांचे केंद्र होते. त्यांच्या चिरंजीवांनी, त्यांच्या मुलीने, नातीने, त्यांच्या कविता म्हणून दाखवल्या. विजयाबाईंनीही एकदोन कविता म्हटल्या. पुन्हा मैफल रंगू लागली. तो ना. घं.नी दिलेला रंग होता.

सकाळी गावातील बालाजीचे सुंदर पाहिले. ना. घं.चा जड मनाने निरोप घेतला–आणि आम्ही निघालो. वाटेत पुन्हा आशाताईंकडे काही तास. तेथे आनंद जातेगावकरही आले होते. पुन्हा ना. घं.–पुन्हा गाणे ! ते गाणे आम्हा सर्वांच्याच मनात भरभरून वाहात होते.

ते ना. घं.चेच गाणे आहे. ना. घं.नी स्वत:ला 'असाच' या कवितेत सांगितले आहे–

**एकटाच चालत जा**
**दूर दूर दूर**
**गात गात तूच तुझा**
**एकटाच सूर**

–पण असे 'दूर दूर दूर' जाताना ते गाणे आपल्या अधिका-अधिक जवळ आले आहे. आपल्याला ओंजळीत ना. घं.नी त्यांचे सूर ठेवले आहेत. ते सूर आयुष्यात नेहमी घुमत राहतील...

## साहित्याचे माझ्या जीवनातील स्थान

मी : विजया राजाध्यक्ष. वय वर्षे सेहेचाळीस. या सेहेचाळीस वर्षांतील पहिली सोळा वर्षे बाजूला काढून ठेवायची. त्या वर्षात काही ना काही घडले; काही महत्त्वाचे घडले; पण ते महत्त्वाचे होते हे कळण्याइतकी बुद्धी त्यावेळी नव्हती. वाढत्या वयाबरोबर ते कळत गेले असे म्हणता येणार नाही. साहित्याने माझ्या जीवनात योग्य वेळी प्रवेश केला नसता, तर ते कदाचित कधीच कळले नसते. सोळा-सतराव्या वर्षापासून मी वाचू लागले. जे हाती सापडेल ते वाचू लागले. सुरुवातीला फक्त मराठी. नंतर इंग्रजी आणि मराठी. दोन्ही भाषांतील कथा-कादंबऱ्या-नाटके आणि कविता वाचतावाचता मला माझ्या आयुष्याचा अर्थ लागू लागला. त्यातील काही जगून झाले होते, काही जगायचे होते. एकदा अर्थ लागू लागल्यानंतर त्या जगण्याबद्दलची दृष्टीच बदलून गेली. एखाद्या दुर्बोध, डोक्याला ताप देणाऱ्या कवितेचा, एखाद्या क्षणी आकस्मिकपणे अर्थबोध झाल्यावर तिच्याबद्दल जशी एक वेगळीच आत्मीयता वाटू लागते, तसे काहीसे झाले. अवतीभवतीची असंख्य माणसे, ती माणसे व आपण यांच्यातील परस्पर संबंध, या परस्पर संबंधातील कोवळीक व ताण, विविध संबंधांनी गजबजून गेलेल्या आयुष्याची वळणे व आडवळणे—सगळे कळत गेले. जे घडले त्यातील काही शांतपणे स्वीकारण्याइतका समतोलपणा आला; आणि काही नाकारण्याची जिद्दही आली. हे बळ साहित्यामुळे मिळाले.

सुरुवातीच्या काळात ललितसाहित्यातील व्यक्तिरेखा हे बळ देत. व्यक्तिरेखांत नाही म्हटले तरी कल्पनेचा थोडाफार अंश

असतोच. खऱ्या आत्मचरित्रात कल्पित असे काही नसते. या प्रकारची आत्मचरित्रे जीवनाचे सगळे बरेवाईट रंग तुमच्यापुढे उलगडत असतात. साहित्य वाचत नसते तर मला हे रंग कसे दिसले असते ? जीवनाचा अभ्यास करण्याची वृत्ती माझ्यात कशी निर्माण झाली असती ? लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतिचित्रे' आणि सीमॉन द बोव्हारचे चार भागांतील आत्मचरित्र ज्याने वाचलेले नाही ती खरोखरीच अभागी. ही पुस्तके वाचली की जीवनाचे फार सूक्ष्म भान येते. म्हणूनच त्याचे माझ्या जीवनातील स्थान अनन्यसाधारण आहे.

साहित्याची वाचक हीच माझी प्रधान भूमिका आहे; पण गेल्या काही वर्षांत माझे साहित्याशी आणखीही एक नाते निर्माण झाले आहे. मी कथा व समीक्षा लिहिते. आपण काहीतरी निर्माण करत आहोत हा आनंद लिहिताना मनात असतो. जे लिहिते ते नेहमीच चांगले उतरते असे नव्हे. कधी पराभव पत्करावा लागतो. कधी काहीच लिहिले नाही किंवा काहीच सुचत नाही ही टोचणी मनाला अस्वस्थ करते. अशा एखाद्या क्षणी एक चिडखोर प्रश्न मनात उमटतो. कोणी सांगितले आहेत हे उपद्व्याप ? लिहिण्यापूर्वीची घालमेल, लिहिल्यानंतरची टोचणी, हे सगळे टाळता येईल. आपण लेखन थांबवले तर मराठी साहित्याचे काहीही नुकसान होणार नाही. पण दुसऱ्याच क्षणी मनात सैरावैरा धावणारे हे विचार मी हुसकावून लावते. लिहायचे नाही ? मग दुसरे काय करायचे ? तशा पुष्कळ गोष्टी कराव्या लागतात; त्या करताना आनंदही मिळतो. पण काहीतरी चांगले लिहिल्यानंतर होणाऱ्या आनंदाची सर कशालाच नाही. हे आनंदाचे क्षण मोजके असतील, दुर्मिळ असतील, पण ते मिळविण्याची धडपड करताना मी वाढत असते. पुढे जात असते. माझ्या व्यक्तिमत्त्वाला व जीवनाला गतिमान ठेवणे हे मला साहित्यामुळेच शक्य झाले आहे.

साहित्य आणखीही काही गोष्टी देऊन जाते. थोडा लौकिक, थोडा पैसा. उदास मनःस्थितीत, एखाद्या वाचकाचे एखाद्या कथेची

स्तुती करणारे पत्र येते; अनोळखी ठिकाणी, आपले नाव ऐकल्यानंतर कोणीतरी ओळखीचे हास्य करते; लेखनामुळे ज्ञात, अज्ञात अशी अनेक माणसे आपण जोडलेली असतात. त्यामुळे आपल्या व्यावहारिक जीवनाला एक प्रकारचे स्थैर्य येते ही गोष्ट नाकारता येणार नाही. पण लेखक लिहितो तो या व्यावहारिक स्थैर्यासाठी नाही. तो लिहितो स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाच्या मनमोकळ्या आविष्कारासाठी, आणि त्यातून लाभणाऱ्या बंधमुक्तीच्या भावनेसाठी; लेखनामुळे जगण्यातला आत्मविश्वास वाढतो म्हणून. मी तरी तेवढ्यासाठीच लिहीत आले आहे. त्यासाठी खंत, इतरांची असूया, उजाडपण, सगळे पत्करले आहे. लेखनातून प्राप्त होणाऱ्या आनंदापुढे व आत्मविश्वासापुढे मला कशाचीच तमा वाटत नाही. साहित्यामुळे मला जीवनासंबंधीची ही निर्भर वृत्ती मिळाली.

अशी ही दोन नाती : लेखक म्हणून आणि वाचक म्हणून जडलेली. त्यांतील पहिले काहीसे अस्थिर; दुसरे मात्र चिरंतन. सगळेच लेखक वाचक असतात का ? कोण जाणे; पण वाचक ही भूमिका निष्ठेने स्वीकारल्याखेरीज गत्यंतर नाही हे तितकेच खरे आहे. लेखकाला वाचन हे तऱ्हेतऱ्हेचे आधार देते. त्याच्या बहराच्या काळात ते त्याला खतपाणी घालते; उजाड मनःस्थितीत ते त्याला धीर देते, त्याच्यातील निर्मितीची प्रेरणा कोळपून जाऊ नये याची याची दक्षता घेते. लिहिताना आवश्यक असणारी स्वतःच्या मर्यादांची जाणीव तर ते नेहमीच पुरवीत असते. स्वतःच्या मनाचे व जीवनाचे विविध रंग स्वतःपुढेच उलगडणारी, उधळणारी साहित्याइतकी प्रभावी शक्ती दुसरी कोणती ?

साहित्यापासून मला ही शक्ती वारंवार मिळत राहिली आहे. ही शक्ती कोणत्या साहित्यप्रकाराने सर्वांत अधिक दिली ? वर कथाकादंबऱ्यांचा व आत्मचरित्रांचा उल्लेख केला. त्यांनी जीवनाचे भान दिले हे निश्चितच, पण जातिवंत कवितेने माझे जे पोषण केले आहे त्याचे शब्दांत वर्णन करणे अशक्य आहे. कविता वाचण्याचा छंद फार जुना. वाढत्या वयाबरोबर इतर

काही छंद बाजूला ठेवावे लागले. हा मात्र वाढतच गेला. त्याने आनंद दिला, आणि बळही. काही जीवघेणे अनुभव त्या बळावर पचविता आले. मर्ढेकरांची कविता वाचून माणसाचे ‘ लहान ’पण कळले, आणि मग स्वत:च्या लहानपणाबद्दल फारसे दु:ख वाटेनासे झाले; हे लहानपण स्वीकारताना मोठे होण्याचा प्रयत्न केला पाहिजे हे कळले. अवतीभवती ‘ पोकळीचा पिंजरा ’ असतो. त्या पिंजऱ्याला गज आहेत हेही कळत असते, पण आपल्या सगळ्या मर्यादा ओलांडून त्या गजांना धडक दिली पाहिजे असे तीव्रतेने वाटते. जीवनाशी मुकाबला करण्याची ही वृत्ती साहित्यामुळे निर्माण झाली. कधी ओंजळीत जे पडले तेच खूप मोठे मानन कृतज्ञ रहावे : ‘ कोसळली सर अंगावर माझ्या, माझ्याचसाठी पुन्हा वृष्टीसाठी लाचार मागणे मागणार नाही.’ पाडगावकरांच्या एका ग़झलातील या ओळींनी ही तृप्ती शिकविली; जे मिळते ते उत्स्फूर्तपणे घ्यावे ते नेहमी स्वत:त तरंगत ठेवावे, कधी संपू देऊ नये, ग्रेस म्हणतात त्याप्रमाणे ‘ बुडता बुडता सांजप्रवाही अलगद भरूनी यावे.’

जगण्यातील हा उत्स्फूर्तपणा; सहजपणा सांभाळता आला तर असाध्य असे काय राहते ? खानोलकरांच्या ओळी आठवतात : ‘ ताऱ्यांवरी पडावा केव्हा चुकून हात, विस्तीर्ण पोकळीचा गंधार सापडावा.’ फक्त इच्छा असली पाहिजे. ती असेल तर एखाद्या भाग्यवंत क्षणी पूर्ती लाभून जातेही. साहित्याने ही इच्छाशक्ती दिली, आणि पूर्तीसंबंधीचा हा विश्वासही दिला. जीवनातील चार क्षण त्यामुळे उजळले, जगण्याचा सूर-गंधार सापडला. आणखी काय हवे ? दु:ख, अपमान, अपयश या लौकिक व्याधी कोणाला चुकल्या आहेत ? पण त्या सोसताना, त्यांना पुरून उरणारे असे काहीतरी आपल्याजवळ आहे ही भावना मला नेहमीच धीर देत आली आहे. साहित्य वाचीत, लिहीत नसते तर, कोण जाणे, या लौकिक व्याधींनी मला केव्हाच कवेत घेतले असते ! साहित्यामुळे ते टळले. मला जगवले, आणि माझ्या जगण्यात प्राणही ओतला !

## हिरवेगार

'सत्यकथे'च्या ऑगस्टच्या अंकात वाचले की सप्टेंबरपासून सत्यकथा प्रसिद्ध होणार नाही. इतक्या तडकाफडकी घडणाऱ्या गोष्टींविषयी तत्काल काही प्रतिक्रिया होणे कठीण असते. जे घडले ते हळूहळू कळत जाते. त्यामुळे सत्यकथा बंद पडली म्हणजे नेमके काय झाले, हे आता जाणवू लागले आहे. आता असेही मनात येते आहे की, ती बातमी तेवढी अनपेक्षित होती का? 'सत्यकथे'-च्या डिसेंबर १९७९ च्या अंकाची आठवण येते. त्या अंकात श्री. पु. भागवतांनी लिहिलेल्या निवेदनात, असे काही घडणार आहे याची पूर्वसूचना मिळाली होती. मन उदास झाले होते. त्यानंतर दोन अडीच वर्षे 'सत्यकथा' प्रसिद्ध होत राहिली. वाटले की गंडांतर टळले. पण ते खरे नव्हते. सत्यकथेची नियती तेव्हाच ठरली होती. मग मधल्या दोनअडीच वर्षांत 'सत्यकथा' कशी काय चालू राहिली? मला वाटते, पंखा बंद केल्यानंतरही काही काळ तो गरगरत राहतो. तसा काहीसा हा प्रकार होता. सूर्य मावळल्याचे अंधार पडेपर्यंत लक्षात येत नाही, असेही म्हणावे हवे तर.

'सत्यकथे'च्या डिसेंबर ७९ च्या अंकात, अगदी आरंभीच श्री. पु. भागवतांचे निवेदन छापले होते. आरंभीचा मजकूर आपण नेहमीच प्रथम वाचतो असे नाही. कोणाचा कधी क्रम लागेल हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. पण या वैयक्तिक अनुक्रमाणिकेतहा

काही नावे ओलांडून पुढे जाता येत नाही. श्री. पु. भागवत हे असे एक नाव. आधी त्यांचे निवेदन न वाचता इतर काही वाचणारे वाचक असतील, असे वाटत नाही. निदान मी तरी तसे केले नाही. ते निवेदन वाचले, आणि अंक तसाच बाजूला ठेवून दिला. यापेक्षा अधिक काय करता येण्याजोगे होते ? आयुष्यात स्वतःच्या दुबळे-पणाची जाणीव तीव्रतेने करून देणारे काही क्षण येतात. तो तसाच एक क्षण होता. प्रत्यक्षात तो लगेच उलटला तरी मनात तो पसरत राहिला. मी त्याच्यात बुडले, की तो माझ्यात बुडला ? काहीच कळले नाही.

काही दिवसांनंतर बडोद्याहून शांताराम सबनीसांचे पत्र आले. त्यांनी लिहिले होते की, सदानंद रेग्यांची गोडशांसंबंधीची कविता मला आवडली. मला प्रश्न पडला, कोणती कविता ? मी ती कशी वाचली नाही ? 'सत्यकथे'चा अंक आला की प्रथम त्यातील कवितांवरून नजर फिरवायची सवय झाली होती. अलि-कडे त्यातील एखादी दुसरीच पुन्हा वाचण्याजोगी असे पण जित्याची खोड कुठे जाते ? मग ही कशी नजरेतून निसटली ? वास्तविक सदानंद रेगे या नावाभोवती नजर रेंगाळली पाहिजे. गोडसे या नावात तर ती रुतलीच पाहिजे. ही दोन्ही नावे डोळ्यांच्या पटलावरून तशीच सरकून पुढे जावी ? जे घन बर-सलेच पाहिजेत ते नुसतेच विरावेत ? 'हे काही बरोबर नाही. आपल्यात काहीतरी बिघाड झाला आहे...' मी मलाच दोष देऊ लागले. पण थोड्याच वेळात लक्षात आले की माझा काहीच दोष नव्हता. मी 'सत्यकथे'चा उरलेला अंक वाचलाच नव्हता. आणि तोही माझा दोष नव्हता ! एखाद्या आवर्ताच्या वेळी, आपल्या आवडीच्या, गरजेच्या वस्तू बरोबर घेऊन बाहेर पडावे, हे कोणाला सुचते ? माझ्या आवडीची एक वस्तू 'सत्यकथे'च्या अंकात तशीच मागे राहून गेली होती, मी विसरलेच होते !

तो अंक पुन्हा हातात घेतला आणि सदानंद रेग्यांच्या कवितेपर्यंत पोचले. कवितेचे नाव 'पावळच्या एस्. टी. स्टँडवर'. थोडा घोटाळा या नावामुळेही झाला का? या नावाचा आणि गोडशांचा अर्थाअर्थी काय संबंध? पुष्कळांना असे वाटले असणार. कारण पुढे मी ज्यांना ज्यांना विचारले त्यांनी त्यांनी ती कविता वाचली नसल्याचे सांगितले. याची अनेक कारणे असू शकतील. पण त्यातली महत्त्वाची दोन : काही, माझ्याप्रमाणे, त्या निवेदनात गुंतून पडले; काहींना 'पाबळच्या एस् टी. स्टँडवर' गोडसे दिसले नाहीत! —हेही माझ्याप्रमाणेच असे म्हणत नाही, कारण मला तेथे गोडसे दिसायला हवे होते. इतरांजवळ समर्थन होते; माझ्याजवळ ते नव्हते! कारण मला ठाऊक होते की अलिकडे ग्रामे हीच गोडशांची दैवते झाली आहेत. गोडसे म्हणजे आदासे; गोडसे म्हणजे वढोसे; गोडसे म्हणजे मुऱ्हे; आणि गोडसे म्हणजे पावळही! आपल्या जिवाचा एकेक तुकडा गोडशांनी या गावात ठेवला आहे. आता ती गावेच त्यांच्यात येऊन राहिली आहेत!

गोडशांच्या या 'ग्रामपंचाइती'च्या किती आठवणी सांगाव्या! पाबळची आठवण मात्र सांगितलीच पाहिजे. 'केंदूरच्या बसस्थानकावर मैलाचा दगड नजरेस पडला... पावळ तीन कि. मी.' गोडशांच्या 'मस्तानी' या लेखाचे हे सुरुवातीचे वाक्य आहे. गोडशांनी ते वाचले आणि आमच्या घराच्या आतल्या खोलीत स्थलकालाचा वेगळाच नकाशा आकारू लागला. तेथे गोडसे धरून फक्त पाच माणसे. आम्ही दोघे, पु. ल. देशपांडे आणि मधू गानू. गोडसे वाचनात रंगलेले; आणि श्रोते श्रवणात दंगलेले. मधून-मधून गोडशांचे लेखाचाच एक भाग वाटावे इतके रेखीव भाष्य. 'मस्तानी' हे पेशवाईतले धुकेच होते... आणि अजूनही धुकेच आहे' अशा एखाद्या वाक्याला पु. ल. नी दिलेली उत्स्फूर्त दाद... आम्ही गोडशांबरोबर पुढे जात होतो की मागे? अडीचशे वर्षांपूर्वीच्या पेशवाईत विरलेल्या धुक्याचा हा शोध कधी संपूच नये

असे वाटत होते. मनात येत होते, गोडसे हेही एक धुकेच आहे. या धुक्याचा शोध कोण घेणार? तेवढी ताकद कोणापाशी आहे?

हा लेख 'महाराष्ट्र टाइम्स'च्या १९७९ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाला. तो लेख वाचून लगेचच सदानंद रेग्यांनी ही कविता लिहिली? तसेच असले पाहिजे. तो उमाळा कवितेत जाणवतो. निर्मितिप्रक्रियेविषयी वगैरे आपण पुष्कळ बोलतो, वाचतो. कोणाच्या मनात कविता घडते, कोणाच्या मनात ती फुलते. हे सगळे खरे असेल; पण त्याबरोबरच, हेही खरे आहे की कोणाच्या मनात ती चमकतेही! चमकते नव्हे, लखलखते! गोडशांनी सदानंद रेग्यांच्या मनात आभाळ उभे केले. या विजेला तेथे लखलखण्याखेरीज गत्यंतरच नव्हते. त्या अनुभवाची जात-कुळीच ती. ती 'कंचनी' रेग्यांच्या मनात 'सहज पाखरावाणी' गायली. त्या आधी ती त्यांच्या मनात 'प्रेम आणि मरण' मधल्या 'गगनातिल चंचल बाले'प्रमाणे उतावीळ होत धावली होती! 'प्रीतिची जळती ज्योत...' कंचनी? की कांचनी? रेग्यांनी खरोखरीच त्या अनुभवाचे सोने केले. मस्तानीचा तांबूल गोड-शांच्या शब्दांत, आणि गोडशांचा तांबूल रेग्यांच्या गळयात! काही अनुभवच असे आरस्पानी असतात. त्यांचा 'जिव्हाळा' आपण गोंदून, निबवून घ्यायचा. झाकायचे नाही, तर दाखवत राहायचे. दाखवण्यातले सौंदर्य काही कवींच्या लक्षात कसे येत नाही? आणि दाखवणे व मिरवणे, मांडणे यात फरक आहे हे काही कवींना कळत कसे नाही? गोडशांनी मस्तानीला दाखवले आणि रेग्यांनी गोडशांना! दाखवण्यातले अधिक मोठे सौंदर्य, त्याभोवतीचे धुके कायम ठेवून दाखवण्यात असते! गोडसे दिसले-धुक्यामुळे ते अधिक सुंदर दिसले!

मी कविता वाचत होते. पाबळच्या एस्. टी. स्टँडवर बस-लेले गोडसे मी पाहात होते. 'शनवारवाड्यातली तिरकी चित्रे'

दुरुस्त करणारे गोडसे, 'महाराजांना त्यांच्या नव्या राज्याभिषेकाची स्केचीस' दाखवणारे गोडसे; 'आसपास ओळखीचं कुणी नाहीसं पाहून' हळूच तोंडात तांबूल टाकणारे गोडसे.

गोडसे म्हणजे इमॅक्युलेट पर्सस्पेक्टिव्ह.

गोडसे म्हणजे चपखल बेमालूम कॉम्पोझिशन.

गोडश्यांच्या मनात एक मृदंगही असतो.

पण त्याच्या बोलांच्या कॅलिग्रफीवरच ते खूष.

... तो मृदुंग घुमायला लागतो, आणि त्याच्या तालावर एकेक पुरावे जमायला सुरुवात होते. मग तेथे एकटे गोडसे उरत नाहीत.

पाबळच्या एस्. टी. स्टँडवर
मस्तानी जातीनं येते होऊन
आपल्या समाधीवरची चादर
म्हणते—रफू करून द्या
गोडसे गोडसं हसतात
अन् चादर हिरवीगार होते

पाहतापाहता सगळेच हिरवेगार झाले. विटके काही उरलेच नाही. गोडशांच्या 'लिहुन भिंतिवर भुजंग भरला रंग चितान्याकडून', 'एक दरबारचित्र आणि चरित्र', 'शिवरायाचे कैसे बोलणे', 'दफ्तनी' अशा कितीतरी लेखांतील चित्रे हिरव्यागार मनात उजळली. गोडशांनी 'उलट्या' पावलांनी चालत ती रंगरेखाचित्रे आणि शब्दचित्रे समोर आणून ठेवली. त्यामुळे बाकीचे व्यापताप विसरले. कधी 'बहिणीकडे.' कधी 'लग्नबिग्न जमवायला' कधी 'सासूच्या बाळंतपणाला वगैरे' जायचे असते. रुक्ष, उजाड आयुष्याचा हा कारभार चुकत नाही म्हणून तर एकीकडे गोडसे आणि दुसरीकडे 'आपण.'

गोडसे एस्. टी. स्टँडवरचे
आपण आपापल्या वाटांवरचे

पण त्याच वाटा आता मिटून गेल्या. आता गोडशांची वाट हीच आपली वाट. त्या वाटेवर मृदंग घुमतो आहे, घुंगुरवाली पावलं थुई थुई नाचू लागणार आहेत ... मस्तानी येते आहे ... ! गोडशांनी 'बाजी' जिंकली आहे !

हा अद्‌भुत सोहळा रेग्यांनी दाखवला; आपण पाहिला. आपण म्हणजे कोणी कोणी ? 'आपण' मधे द. ग. गोडसे ज्यांना ठाऊक नाहीत, तेही येतात का ? की ही कविता फक्त गोडसे ज्यांना ठाऊक आहेत, त्यांच्यासाठीच ? कवितेने असे 'फक्त विशिष्ट वाचकांसाठी' असावे ? फक्त त्यांच्याच कानात कुजबुजावे ? मग इतरांनी काय करायचे ? कवीकडे 'संदर्भासह स्पष्टीकरण करा' अशी मागणी करायची ? कवीचे यांच्यासंबंधी काही 'उत्तरदायित्व' आहे की नाही ? प्रश्न एक, उत्तरे अनेक. त्यातले एक उत्तर माझे : कवितेच्या संस्कारात निःसंदिग्धाइतकाच संदिग्धाचाही वाटा असतो. धुके हवेच. त्या धुक्यामुळेच 'पैल' काय आहे याबद्दलची उत्कंठा, जिज्ञासा जागृत होते ना ? तिच्या शमनासाठी कवीचे सहाय्य नको किंवा गोडशांचे चरित्रविषयक तपशील गोळा करण्याचे स्वावलंबनही नको ! कारण कविता हे काही चरित्र नाही ! हा फक्त एक मर्मबंध आहे, मर्म कळले की बंधही जडतो. गोडसे हे एक मर्म. ते कोणी कोठेच, कधीच जाणलेले नाही ? 'पाबळच्या एस्‌टी स्टँडवर' किंवा अशाच दुसरीकडे 'सर्वत्र' गोडसे बसलेले असतात. या 'सर्वत्रा'कडे कोणाचीच नजर गेलेली नाही ? मग त्यांच्यासाठी हीच काय कोणतीच कविता नाही ! कोणी म्हणेल, 'ठीक आहे ! पण असे सोडूनही देता येत नाही. आरंभी थोड्यासाठी असलेली ती अंती सर्वांसाठी होते त्याला 'आपण' तरी काय करणार ? या 'आपण' मधे मात्र सगळे येतात, त्यातल्या काहींना गोडसे वारंवार भेटतात; काहींना दीर्घ विरामानंतर भेटतात; आणि काहींची त्यांच्याशी नुकतीच ओळख झालेली असते ...त्यांच्या अंगात ती

नवी नव्हाळी लहरत असते ... म्हणजे माझ्या हातातले गोडशांचा स्नेह हे हुकमाचे पान हे शेवटी एक फत्रे पानच ठरते की काय ? जवळजवळ तसेच. कारण मला माहीत असलेले गोडसे वेगळे, या कवितेतले गोडसे वेगळे. येथे मी त्यांना प्रथमच भेटते आहे. म्हणून माझ्याही अंगात तीच नवी नव्हाळी आहे. कवितेच्या 'डावा 'चे हे असे लोकविलक्षण नियम आहेत !

कवितेतले गोडसे मला भेटलेले गोडसे—आणि इतरांना भेटलेले गोडसे. एकाच प्राणतत्त्वाचे हे वेगवेगळे अविष्कार म्हणून हा दत्तात्रेय एकमुखीच ! त्यांना या कवितेत ते कसे दिसले असतील ? मला उत्सुकता होती. कविता वाचल्यानंतर काही दिवसांनी ते भेटले तेव्हा त्यांना यासंबंधी विचारले. जरा भीतभीतच. कारण स्वत:संबंधी बोलणे हें गोडशांना प्रिय नाही. कलांत, इतिहासात रमता यावे एवढ्यासाठी फक्त ते स्वत:त रमतात ! कलेशी इतिहासाशी चाललेल्या या अखंड एकांतात इतरांच्या प्रवेशाला सक्त मनाई ! आणि येथे तर रेग्यांनी कवाडेच खुली केली ! हे गोडशांना आवडले असेल ? माझी शंका व्यर्थ होती. गोडशांना कविता आवडली होती. त्यांचा प्रसन्न मूड पाहून मी त्यांना पुष्कळ प्रश्न विचारले. रेग्यांची आणि तुमची ओळख किती जुनी ? अलिकडे कधी भेटला होता ? वगैरे. त्यांची अलिकडे भेट झाली नव्हती. स्वत: पुढाकार घेऊन कोणाशी संपर्क साधणे, ठेवणे हेही गोडशांच्या स्वभावात नाही. या अर्थाने गोडसे हा या संपर्कमाध्यमाच्या युगातला कालविपर्यासच आहे ! त्यांचा संपर्क फक्त त्यांच्या कलेशी. पण हेच गोडसे म्हणाले, 'रेग्यांना एकदा भेटणार आहे. माझ्या मनात आहे की त्यांना एक जेवण द्यायचं !' गोडशांचे आदरातिथ्य हा एक बादशाही प्रकार असतो. हे ऐश्वर्य ते वाटेल त्याच्यावर उधळत नाहीत. ते त्यांना रेग्यांवर उधळायचे होते. गोडसे इतके मनमोकळे होते. पुढे काय झाले ? मी विचारले नाही. तो विषयच पुढे कधी निघाला नाही.

का निघाला नाही? मला एक सुंदर अनुभव आला म्हणून. तो अनुभव असा की गोडसे मुळी त्या कवितेचा आणि आपला काही संबंध आहे, हे विसरूनच गेले! ते त्या कवितेविषयी पुष्कळ बोलत राहिले. ते सगळेच बोलणे आता माझ्या लक्षात नाही. पण 'मृदुंगा' चा उल्लेख त्यांना फार सुखातून गेला होता हे मात्र पक्के आठवते. त्यांचे या वाद्यावर विलक्षण प्रेम एकदा म्हणाले होते की 'हे वाद्य तुम्हाला अखंड सोबत करतं, कारण तुम्ही त्याला स्पर्श केलेला असतो!' आणखी एक कारण आहे. गोडशांची इतर कलाप्रकरणे इतरांपर्यंत पोचली. त्या कलांचे स्वरूपच तसे. मृदुंग-प्रकरण मात्र 'गोपनीय' राहिले. त्याचा घुमारा फक्त गोडशांसाठी, म्हणून त्याबाबत गोडसे अधिक मृदू! जे अधिक गोपनीय ते अधिक प्रिय हा न्याय! 'त्याच्या बोलांच्या कॅलिग्रॅफीवरच ते खूष!' म्हणाले 'या माणसाला बरोबर कळलेलं आहे...' हे कोण बोलत होते? गोडसे हा कलावंत, की गोडसे हा वाचक? मला वाटते, दोघेही. गोडसे या वाचकाला गोडसे या कलावंताचे प्रतिबिंब दिसत होते. स्वतःच्या मनातले स्वतःचेच प्रतिबिंब– नव्हे बिंबच! बिंब एकच–ज्याला छायाच नाही असे! रेग्यांनी तेच गोडशांसकट सर्वांच्या मनावर बिंबवले! इतके अस्सल काही घडल्याखेरीज का बिंब स्वतःला विसरून प्रतिबिंबाची दखल घेते?

रेग्यांच्या मनात पुष्कळ प्रतिबिंबे आहेत. एक बालकवींचे दुसरे गोविंदाग्रजांचे, तिसरे मर्ढेकरांचे, चौथे चिं. त्र्यं. खानोलकरांचे, पाचवे दिवाकरांचे– अशी आणखी कितीतरी. त्या प्रतिबिंबांना त्यांची नेमकी पार्श्वभूमी सापडली आहे. मर्ढेकर उभे आहेत ते 'आळंदीच्या पिंपळाखाली,' गोविंदाग्रज सावनेरला निघालेले– एका खुळ्या पिंपळाला भेटण्यासाठीच! बालकवींच्या मनातच एक औदुंबर उगवतो आहे.... खानोलकर निरभ्र आकाशाखाली उभे 'ये रे घना... ये रे घना...' असे आठवत! 'निष्कर्ष मी तर की आहे नगण्य पर्ण!' हा त्यांना जगताना पडलेला चिरंतन

प्रश्न–ही सगळी झपाटलेली झाडेच ! झपाटलेली माणसे त्यांच्याखाली नाही उभी रहाणार तर आणखी कुठे ? प्रत्येक झाडाची एकेक फांदी रेगे नावाच्या एका झाडात घुसलेली. गोविंदाग्रजांच्या फांदीवर कल्पनाशक्ती, मर्ढेकरांच्या फांदीवर असंबद्धता, बालकवींच्या फांदीवर मुक्तता, खानोलकरांच्या फांदीवर जोगवा, दिवाकरांच्या फांदीवर काळोख. या सगळ्या फांद्यांसकट रेग्यांच्या कवितेंचे झाड झुलत राहिले. शेवटी रेग्यांनी काय केले ? ही सगळीच झाडे पावळच्या एस्. टी. स्टँडवर नेऊन लावली ! तेवढीच गोडशांना–आणि त्यांच्या मस्तानीलाही सावली ! गोडशांच्या रेग्यांमध्ये घुसलेल्या फांदीवर काय होते ? गोडशांची चित्रे ! ती डोळ्यांत इतकी विरघळली की शेवटी गोडसे हेही एक चित्रच झाले ! गोडसे म्हणजे इमॅक्युलेट पर्सपेक्टिव्ह, गोडसे म्हणजे चपखल बेमालूम कॉम्पोझिशन.' पर्सपेक्टिव्ह ! सगळ्या झाडांना या पर्सपेक्टिव्हची ओढ ! भूतभविष्याच्या संदर्भातला वर्तमान. निखळलेले, तुटलेले काहीच नको. ' सातत्य ' शोधण्याची ओढ !

' पर्सपेक्टिव्ह 'वरून आठवले. गेल्या वर्षी रेगे भेटले तेव्हा मी त्यांना म्हटले, ' तुमची कविता फार आवडली होती....अलिकडे कित्येक दिवसांत इतकी साधी, गोड कविता वाचली नव्हती ! ' रेगे हसले. दुसऱ्या दिवशी ते पुन्हा भेटले तेव्हा त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिलेल्या कवितेचे कागद माझ्या हातात ठेवले. स्वच्छ, सुंदर लेखन आहे. फक्त ' पर्सपेक्टिव्ह ' हा शब्द दोनदा खोडला आहे ! तो कसा लिहायचा याबद्दल रेग्यांच्या मनात गोंधळ झाला असेल कदाचित. अर्थाविषयी मात्र काही गोंधळ नाही ! म्हणून तर त्यांनी गोडशांना ' पर्सपेक्टिव्ह ' म्हटले ! रेग्यांनी त्या वेळी काही नव्या कविताही दाखवल्या. सुंदर होत्या. या तीनचार वर्षांत रेगे किती वेगळे, चांगले लिहू लागले होते ! नवा सूर त्यांना सापडला होता. ' पावळच्या एस् टी. स्टँडवर '-पासून नवा प्रवास सुरू झाला. सोबतीला आपले, तिकडचे लेखक

होते, तसा गोडसे हा चित्रकारही होता ! रेग्यांना या चित्रकाराचे विशेष अप्रूप वाटले असले पाहिजे कारण रेगे हेही चित्रकार होते. रेग्यांची कविता हे एक विचित्र चित्रच आहे ! मस्तानीची घुंगुरवाळी पावले पाहात असतानाही ' सासूचे बाळंतपण वगैरे ' एरवी कसे आठवले असते ? काही वेळा ते विचित्र खटकते. येथे मात्र ते चित्राचाच एक भाग होते ! रेग्यांमध्ये ती क्षमता होतीच. ' झ्याक् प्रेव्हेर 'च्या ' टु पेंट द पोर्ट्रेट ऑफ अ बर्ड ' ही कविता वाचल्यानंतर मला असे वाटले होते अशा तऱ्हेची कविता मराठीत कदाचित सदानंद रेगेच लिहू शकतील ... आता वाटते, ' पाब्रळच्या एस् टी. स्टॅन्डवर ' या कवितेला ' टु पेंट द पोर्ट्रेट ऑफ अ पेंटर ' असेही एक शीर्षक असायला काय हरकत आहे ? गोडसे नावाचा एक मुक्त पक्षी रेग्यांनी रंगवलेल्या पिंजऱ्यात खुशीने येऊन बसला. रेग्यांच्या हस्ताक्षरातील कवितेवर पुन्हा नजर टाकली तेव्हा रेग्यांची सही दिसली. पक्ष्याने गाणे म्हटले तर सही करायला काहीच हरकत नाही असे प्रेव्हेरने म्हटलेच आहे ! गोडशांनी तर रेग्यांसाठी मृदुंग वाजवला !

अलिकडच्या कवितेत झाडे, पक्षी वगैरे सगळे असते. फक्त ते अभयारण्यातले नसून उद्यानातले ! सजावटीचे प्रकार बदलले एवढेच. पंडितकवी बिचारे बहिरंगाची सजावट करायचे पण हा ' इंटिरियर डेकोरेशन 'चा जमाना आहे ! त्यामुळेच रेग्यांची कविता वाचल्यावर मला वाटले की आपण सोफ्यावर बसलेले नसून जमिनीवर बसलो आहोत, किंवा एअरपोर्टऐवजी एस् टी. स्टँडवर ! आपली जुनी ओळख आहे या सगळ्यांशी परके वाटायला नको. अलिकडची फार थोडी कविता आपली ; बाकीची सगळी परकी. पोरकेपण टाकले तर परकेपणही संपेल का ? कशासाठी पोरकेपण ? चांगले भक्कम, जातिवंत कुळ तुमच्यामागे उभे आहे .. त्याच्याशी भांडण कशासाठी ? पण खरे भांडण तरी आहे का ?

पण हा प्रसंग परक्या कवितेशी वाद घालण्याचा नव्हेच.

तो रेग्यांशी, गोडश्यांशी, मस्तानीशी संवाद करण्याचा आहे. त्या संवादासाठी मीही 'पावळच्या एस्. टी. स्टँडवर' पोचले आहे. तिथे नियमित, कायमच्या रात्री झालेला एक 'टळटळीत उषःकाल' मला दिसतो आहे. रात्र संपल्यावर उजाडतेच, पण रात्रीच जर उजाडू लागले तर मग आपण तरी तक्रार कशासाठी करावी? त्या उजेडात खूप दिसते, खूप ऐकू येते... सगळेच हिरवेगार होऊन जाते. रेग्यांनी कविता लिहिण्यासाठी वापरलेली शाईही मला आता हिरवी दिसू लागली आहे! तोच रेग्यांचा रंग होता! थोडा हिरवा, थोडा हिरवट!

नोंद 3228

## काळ काम वेग

गेल्या आठवडचात पुण्याला गेले होते.

मला पुणे आवडते. एखाद्या व्यक्तीला भेटायचे मनात असले तरी अंतर फार आहे म्हणून, वाहने मिळत नाहीत म्हणून ते राहून गेले, असे पुण्यात होत नाही. अर्ध्या तासात तुम्हाला कितीही दूर पोचता येते. आणि मुख्य म्हणजे तुमच्याजवळ अर्धा तास असतो. किंबहुना पुष्कळ वेळ असतो. कारण तुम्ही मुंबई सोडलेली असते. ती चाकोरी, ती धावपळ—सगळयापासून तुम्ही तात्पुरते का होईना दूर असता. आयुष्य कसे मंथ, निवांत असते. मोकळा दिवस. काहीही करावे, कोठेही जावे. कसलीही दडपणे नाहीत, बंधने नाहीत.

श्री. पु भागवत अलिकडे अधूनमधून पुण्यात असतात. सकाळीच त्यांचा फोन आला, 'काय चालल आहे ?'

'काही नाही मोकळी आहे.' मी म्हटले.

'येता का इकडे ?'

'येते. कसं यायचं ?'

त्यांनी पत्ता समजावून सांगितला. मी ज्यांच्याकडे उतरले होते त्यांना विचारले, 'येथून किती दूर आहे ?'

'तसं बरंच. रिक्षानं गेलात तर पंधरा मिनिटं लागतील !'

म्हणजे काहीच नाही ! मी जायचे ठरवले. रिक्षा लगेच मिळाली. प्रवास सुरू झाला. प्रवास कसला तो ? मोकळे रस्ते

आणि एवढेसे अंतर रिक्षा अगदी सावकाश गेली असती तरी माझी हरकत नव्हती.

पण एकदा रिक्षात वसल्यावर माझ्या इच्छेला काय महत्त्व ? सगळी सूत्रे रिक्षावाल्याच्या हातात. तो भरमसाट वेगाने चालला होता. मुंबईला टॅक्सात बसल्यावर हाच अनुभव येतोः तेथे तुम्ही घाईत असता; आणि तरीही इतक्या वेगाची गरज नाही असे तुम्हाला वाटत असते. पण टॅक्सी ड्रायव्हर तुमच्या इच्छेला, कधी कधी तुम्ही केलेल्या विनंतीला न जुमानता पुढील गाड्या मागे टाकणे, ट्रॅफिक सिग्नलपाशी कच्कन ब्रेक लावून थांबवणे, एखाद्या पादचाऱ्याच्या जवळ गाडी ठेपवून त्याला घाबरवणे, वगैरे गोष्टी करतच असतो. तुम्ही असहाय्यपणे बसून असता. तुमच्या मनात फक्त एकच प्रश्न असतो, एवढा वेग कशासाठी ? तो वेग वाहनाचा असतो, ते वाहन चालवणाऱ्या माणसाचा असतो. ती त्याची प्रवृत्ती असते. जे वाहन वेगाने जाऊ शकते ते संथपणे नेणे त्याला मंजूरच नसते !

माझा रिक्षावाला याच जातीतला होता. त्याचे माझे काही जमत नव्हते. पण बोलण्यात अर्थ नव्हता. दिलासा एवढाच होता की त्या रिक्षाला एक छत आहे. छताखाली डोळे मिटून बसले तरी चालण्याजोगे आहे.

शेवटी एकदाचा प्रवास संपला. मी जरा तुटकपणेच रिक्षा-वाल्याच्या हाती पैसे टिकवले आणि खाली उतरले.

भागवतांच्या घरात शिरल्यावर सगळे विसरून गेले. गप्पा रंगत चालल्या.

गप्पा चालू असतानाच त्यांच्याकडे अनिल अवचट आले. हा एक तरुण, बुद्धिमान लेखक आहे. व्यवसायाने डॉक्टर. पण आपला व्यवसाय सांभाळून इतर अनेक कामे करणारा तो माझ्या ओळखीचा. त्याचे लेखनही मी आवडीने वाचलेले. नेहमी मनात यायचे, इतके सगळे याला कसे जमते ? हा बहुधा क्षणाचीही विश्रांती घेत नसणार. हा तरुण आहे तोपर्यंत ठीक आहे, पण पुढे

कसे होणार ? चाळीशी उलटली की आयुष्याचा वेग कमी करावा लागतो. नव्हे, तो आपोआपच कमी होतो. हा स्वानुभव होता.

'काय, धावपळ चालूच ना ?' मी त्याला विचारले.

'जोरात ! परवाच जुन्नरला गेलो होतो... '

तो उत्साहाने सांगत होता. त्याच्या कामाचा वेग त्याच्या बोलण्यातूनही व्यक्त होत होता. माझ्या लक्षात आले की त्याच्या बोलण्याचा वेगही माझ्या कह्याबाहेरचा आहे. मग त्याच्यासारखे वेगाने काम करत रहाणे दूरच राहिले. एकेकाळी मीही... पण जाऊदे. भूतकाळाच्या गोष्टी कशासाठी ? तो काळ मागे पडला हे सत्य स्वीकारले पाहिजे.

...बोलता बोलता त्याने विचारले, 'आता तुम्ही कुठे जाणार ?'

'लक्ष्मी रोडवर.'

'चला, मी सोडतो तुम्हाला.'

'तुमचं वाहन ?'

'स्कूटर.'

'मग बिलकुल नको. भीती वाटते मला. तुम्ही मला रिक्षात बसवा आणि पुढे जा.'

तो हसला आणि गप्प बसला. आणखी थोड्या गप्पा झाल्या. आम्ही निघालो.

बाहेर त्याची स्कूटर उभी होती. मी तिच्याकडे निर्धास्तपणे पाहिले. माझा तिचा काय संबंध ?

पण त्याला तो संबंध जोडायचा होता. स्कूटरपाशी आल्यावर तो म्हणाला, 'बसा.'

हे सरळसरळ आव्हानच होते. मी काकुळतीला येऊन म्हटले, 'नको हो. मला खरंच भीती वाटते. फार एक्स्पो ऽ ऽ ज्ड वाटतं.' मी त्याला पूर्वी आलेले एकदोन अनुभवही सांगितले. पण तो काही ऐकायलाच तयार नव्हता. शेवटी माझा नाइलाज झाला.

त्याने मागे कसे बसायचे याबद्दल सूचना दिल्या. 'एक हात

स्टेपनीवर ठेवा, दुसरा या कडीवर किंवा माझ्या खांद्यावर.'

'भीती वाटली तर टाकीनच...'

'नाही वाटणार भीती हो. मी तुम्हाला तुमच्या वेगानं नेतो, मग तर झालं ?'

'पण इतक्या हळू जायचं म्हणजे तुम्हाला ताप होणार ..'

'मला सवय आहे. मी माझ्या पासष्ट वर्षांच्या सासूबाईंना घेऊन जातो. तुम्ही त्यांच्यापेक्षा पंधरावीस वर्षांनी तरी लहान असाल ?'

'हेही जपून राहण्याचंच वय हो.'

'ते बघू आपण. बसा तर खऱ्या.'

मी मन घट्ट करून बसले. तो अतिशय सावकाश जाऊ लागला. पण मला शंका होतीच. बरेच अंतर काटायचे आहे. याने मध्येच वेग वाढवला तर ?

पण तसे काही झाले नाही. तो सावकाश जात होता. वळणावर तर अधिकच सावकाश. पुढून एखादे वाहन येताना दिसले की मला धडधडू लागायचे. पण तो वाहनापासून दूर रहात होता. ते चालवणाऱ्या माणसाच्या अहंकाराला कोणत्याही प्रकारे धक्का पोचू देत नव्हता. पुढूनमागून येणाऱ्या वाहनांबद्दलचा त्याचा एकंदर दृष्टिकोण 'जा बाबा तुला जायचं असेल तसा' हा. हे लक्षात आल्यावर माझी भीती एकाएकी नाहीशी झाली.

त्याने मध्येच विचारले, 'कसं वाटतंय ?'

'मी म्हटले, अतिशय निर्धास्त.'

मी मधूनच हात सोडून सुद्धा बसले.

खरोखरीच छान, निर्धास्त वाटत होते– इतके की ठिकाण आल्यावर खाली उतरताना थोडे वाईटच वाटले.

'आलात ना सुखरूप ?'

'अगदी ! एक नवाच कॉनफिडन्स मिळाला हो.'

तो हसला. म्हणाला, 'आता पुन्हा याल तेव्हा पुन्हा घेऊन जाईन... माझ्या बायकोलाही अशीच भीती वाटायची. स्कूटर मागे बसण्याची नव्हे, स्कूटर चालवण्याची. आता तिची स्वत:ची

स्कूटर आहे. बाईच्या हाती स्वतःचं वाहन आलं की स्त्री मुक्ती पूर्ण झाली !'

नंतर काही वेळ मी माझ्याच तंद्रीत होते. लक्ष्मी रोडवरील काम आटपून निघाले. आणखी एका ठिकाणी जायचे होते. ते ठिकाण जवळपासच होते. चालतच निघाले. वाटेत एक ओळखीचे गृहस्थ भेटले. त्यांनी ' कुठे निघालात ?' असे विचारले.

मी सांगितले.

' जवळच आहे. पण ऊन आहे. फार मी सोडू का तुम्हाला ?'

त्यांचा हात त्यांच्या स्कूटरवर होता.

होकार देण्याचा मोह झाला. आता मी डरपोक थोडीच राहिले होते ! ताजा अनुभव गाठीशी होता. पण माझ्या तोंडून होकार निसटण्याच्या आधीच माझ्या तरुण मित्राचे वाक्य माझ्या कानात घुमू लागले. ' मी तुम्हाला तुमच्या वेगानं नेतो. मग तर झालं?' मी साशंकपणे त्या गृहस्थांकडे पाहिले. त्यांना ते जमेल का?

बहुतेक नाहीच. कारण बहुतेक माणसे स्वत:च्या वेगाने जात असतात. दुसऱ्याच्या वेगाने जाण्याची कटकट कोण करणार ? तसा एखादाच असतो.

पण एखादा तरी असतो हा नुकताच मिळालेला दिलासा मला गमवायचा नव्हता. म्हणून मी त्यांना म्हटले, ' नको. मी चालतच जाते. जवळ तर आहे !'

मी चालू लागले. माझ्या चालीने. ती चाल आता थोडी मंदावलेलीच होती. तिच्याशी मलाही जमवून घेता येत नव्हते, मग इतरांचे काय ?

यापुढे तर हा वेग अधिकाधिक मंदावणार. आज जेवढे झेपते आहे तेवढेही झेपेनासे होणार आणि भोवतीचा वेग तर वाढतच राहणार. तो नियंत्रित करणारी मी कोण ?

पण एखादा अनिल अवचट अधूनमधून भेटत राहील. ' मी तुम्हाला तुमच्या वेगानं नेतो. मग तर झालं ?' असे आश्वासन देणारा. हेही पुष्कळ झाले !

---

## राग-अनुरागाचे दुपदरी नाते

एक शुभ्र, कोरा कागद समोर घेऊन मी बसले आहे.

कोरा कागद ही काही मी आज प्रथम पाहत असलेली गोष्ट नाही. गेली तीस वर्षे तो अधूनमधून समोर आला. सुरुवातीला तो वहीच्या आकाराचा होता, गेल्या काही वर्षांत त्याचा आकार अधिक मोठा झाला. आता त्या विशिष्ट आकाराच्या, रेघांच्या फुलस्केप कागदाचीच डोळ्यांना सवय झाली आहे. फार उंची नव्हे, पण बऱ्यापैकी पोत असलेला, नीटनेटका दिसणारा. मला नीटनेटकेपणाची आवड आहे, म्हणून कागदही नीटनेटके लागतात. विशेषत: पहिला कागद. त्या कागदानंतरचे कागद तेवढे मनाजोगते नसले तरी चालते, कारण नंतर त्यांच्याकडे तेवढे ध्यान राहत नाही. जो काही सूर लागायचा तो लागून गेलेला असतो. मी त्यात हरवलेली असते. कागद, अक्षर, भोवतीचे वातावरण, या सगळ्यांचे भान कमीअधिक प्रमाणात गेलेले असते. मनात असलेले, लिहिता लिहिता ऐन वेळी प्रकट होणारे–सगळे काही आपोआप जुळून येत असते. अशा वेळी कागद ही फक्त शब्दांचा वर्षाव स्वीकारणारी भूमी झालेली असते. शब्द हेच अंकुर असतात. सुरुवातीला मात्र ते अंकुर कागदाच्या गर्भातच लपलेले असतात. त्यांना बाहेर येण्याचे आमंत्रण कसे द्यावे हे कळत नसते. हे आमंत्रण त्यांच्याकडून स्वीकारले जाईल का, हेही ठाऊक नसते. अनिश्चिततेचा एक खूप मोठा ढग मनाचे आभाळ व्यापून राहिलेला असतो. मन

त्या धूसर काळोखात चाचपडत असते. असेही वाटत असते की कशाला हवे हे ओढवून घेतलेले दुखणे ? हा समोरचा कोरा कागद फाडून टाकला की सगळे प्रश्न, सगळ्या वेदना आपोआप मिटतील !

पण तो मी अजून फाडलेला नाही !

का ?

तो आणि मी एका चिवट धाग्याने एकमेकांशी बांधले गेलो आहोत, एवढेच या प्रश्नाचे उत्तर ! त्याच्याशी एक अनाकलनीय, अतूट असे नातेच आता जडले आहे. ते संपावे असे आता मला माझ्या बाजूने तरी वाटत नाही. या अबोल कागदाच्या मनात काय असेल हे मी कसे सांगू ? तो आपला दरवेळी समोर येताना घुम्मच असतो. हळूहळू तो बोलू लागतो. बोलू लागतो म्हणजे काय करतो ? — तर माझे ऐकू लागतो ! अगदी एकतानतेने, अधूनमधून प्रतिसाद देऊन मला खुलवत ! त्याचा प्रतिसाद हा त्याचा प्रसाद असतो !

पण याचा अर्थ असा नव्हे की तो फार मनमिळाऊ, आज्ञाधारक आहे. छे छे. तो चांगलाच लहरी, हट्टी आहे. म्हणून तर आमच्या या नात्यात पुष्कळ गुंतागुंती आहेत; सुख आहे तसे दुःखही आहे; आश्वासन न दिल्यामुळे आलेली अनिश्चितता आहे; कधी वंचनेच्या वेदनाही आहेत. आणि याबद्दल तक्रार तरी कोणाकडे करायची ? तीही मी, काही वेळा, त्याच्याकडेच केली आहे; त्यानेच ती नोंदवून घेतली आहे !

त्याचे उत्तर ? ठाऊक नाही !

हे नाते इतके गुंतागुंतीचे असते हे मला सुरुवातीला ठाऊक नव्हते. त्या वेळी काहीतरी लहानसे सुचायचे. सुचले की लगेच ते लिहून काढायचे. एकटाकी, झरझर. ते जमले आहे की फसले आहे हा प्रश्न कधी स्वत:ला विचारला नाही. किंबहुना असा काही

प्रश्न असतो हेच ठाऊक नाही ! कागदही बेटा मिस्किल. दुरून सगळी गंमत पाहणारा. त्याला वाटले असेल, जे पुढे आपोआप कळते ते आधीपासून कशाला सांगायचे ? आपण सांगितले तर कदाचित खोटे वाटेल. त्यापेक्षा हिचे हिलाच कळू दे. तऱ्हेतऱ्हेच्या अनुभवांना सामोरे जाऊ दे, ठेचाळू दे.

त्याने हा पवित्रा स्वीकारला. त्यामुळे पहिली पाचसहा वर्षे अज्ञानाच्या सुखात गेली. आणि मग कधीतरी तो साक्षात्काराचा क्षण आपोआपच आला ! कळून चुकले, हे सगळे वाटले तेवढे सोपे, सरळ नाही. खूप लांबचा प्रवास आहे. खाचखळग्यांची वाट आहे. आणि आपण तर आत्ताच मुक्काम आला असे गृहीत धरून चालतो आहोत !

हे कळले तेव्हा कोरा कागद मनात हसला असेल. कुचेष्टेने नव्हे, हे नाते दृढ होत चालल्याचे लक्षण आहे या जाणिवेने.

त्यानंतर प्रवास कधी फार एकाकी झाला, कधी फार सैरभैर. कधी वाटेत दाट धुके पसरले, कधी स्वच्छ उन्हातही वाट चुकली, कधी भलताच मुक्काम गाठला तर कधी मुक्कामाच्या अलिकडेच थांबावे लागले.

या सगळ्या प्रसंगांची रोजनिशी कोणी ठेवली आहे ? आणि ते शक्य तरी कसे आहे ? पण काही न पुसलेल्या आठवणी आहेत. आठवणी नव्हेतच, अनुभव. आठवणी भूतकाळात जमा झालेल्या असतात, अनुभव पुन्हापुन्हा येतच असतात... त्यांची रूपे वेळोवेळी बदललेली असतात, इतकेच.

हे असेच काही अनुभव :

अलिकडेच कधीतरी मी माझी टिपणवही चाळली. वर्षभरात जे जे काही सुचते ते—सगळेच नव्हे, पण बरेचसे मी त्या वहीत टिपलेले असते. लेखकाने अधूनमधून, सातत्याने लिहीत राहिले पाहिजे हे अगदी खरे आहे. पण अलिकडे माझे ललित लेखन

बहुतेक वर्षाकाठी एकदाच—अर्थातच, दिवाळीच्या मोसमात!— होते. (त्याबद्दल नुसती खंत व्यक्त करून तरी काय उपयोग? वस्तुस्थिती नाकारण्यात अर्थ नाही.) वर्षभरात काही कथाबीजे मनात उमटलेली असतात. त्या कथाबीजांचा क्रम कसा लागतो, तो तसाच का लागतो, हे सांगता येणे अवघड आहे. पण एकामागून एक सगळे ठरत जाते खरे. क्वचित 'हे की ते?' असा संघर्ष. पण तोही फार न रेंगाळणारा. असे कित्येक वर्षे चाललेले.

या वर्षी मात्र वही उघडली, आणि तिच्यातील पानांवर लिहिलेली अक्षरेच दिसेनात! पुन्हा पाहिले. अक्षरे दिसली, पण ती डोळ्यांसमोरून नुसतीच सरकून गेली. त्यांच्याभोवतीच्या आठवणी जाग्या होईनात, नवे तपशील मनात जुळेनात. हे जाणवले तेव्हा भीती वाटली. खरे म्हणजे ते फारसे अनपेक्षित नव्हते. आधीचे तीनचार महिने मी या उजाड, भकास मनःस्थितीचा अनुभव घेत होते, नवे काही घडतच नाही म्हणून नुसतीच थांबून होते. ते थांबणे फार कंटाळवाणे वाटत होते. ते नुसते निमूटपणे स्वीकारून चालत नाही, कधीतरी कष्टाने, धीराने पहिले पाऊल उचलावे लागते, हेही ठाऊक होते. पूर्वी ते केल्यानंतर वाट सापडत गेली होती. सुरुवातीला धूसरपणे, नंतर स्वच्छपणे.

या वर्षीही असे घडेल का? मनात आशंकांचे काहूर.

हे असे का घडले? केवळ फिरत्या ऋतुचक्रानुसार आलेला हा शिशिर, की या मनःस्थितीला काही व्यावहारिक कारणेही होती?

माझे मन विश्लेषण करू लागले.

केशवसुतांची कविता आठवली. 'शब्दांनो, मागुते या!' त्या कवितेत बहारानंतरचा शिशिर आहे, त्या शिशिरात 'गाणारे शब्द सारे झडकरी उडुनी दूर देशास गेले' हे दुःख आहे. या दुःखाला एक व्यावहारिक कारण असल्याची सूचना आहे. जगाचा शाप! जगाकडे दुर्लक्ष केले म्हणून जगाने दिलेला शाप! त्यामुळे निर्माण झालेला दुरावा, चिंतेचा वणवा....

माझ्या बाबतीत असे काही घडले ? केशवसुतांशी स्वतःची तुलना करायची नाही; ते धार्ष्ट्यं जवळ नाही. मी अगदी लहान कोणीतरी. पण तरीही केशवसुतांच्याच जातकुळीतली ना ? म्हणून हा दुरावा, हा वणवा माझ्याही अनुभवाला येऊ शकतो ना ?

त्या काळात दुरावा होताच. सगळे जगच माझ्यापासून दूर गेले आहे असे वाटत होते. म्हणून मी जगावरच नव्हे तर स्वतःवरही रागावले होते. सगळे काही नाकारत होते. मनात पुष्कळ संकल्प होते. पण व्यावहारिक कामांचा काच इतका होता की ते संकल्प सिद्धीला जाण्याची काही शक्यताच दृष्टिपथात नव्हती. म्हणून मी हट्टाने, स्वतःवर सूड उगविल्याप्रमाणे ती कामेच करत राहिले होते; त्या तऱ्हेची आणखी कामे मागे लावून घेत होते. मनाची समजूत घालत होते, या व्यापांमध्ये लेखन कसे जमणार ? इतर लेखनाचे जाऊ दे. पण मर्ढेकरांवरच्या पुस्तकाचे काम रेंगाळले आहे... रेंगाळतेच आहे. ते देणे लवकरात लवकर चुकते केले पाहिजे. पण कसे ? वेळ तर पाहिजे ? नुसता वेळच नव्हे, मनःशांतीही. ते काही कसेतरी ओढून काढण्याच्या जातीतले लेखन नाही...

माझे मन एकामागून एक असे हे मुद्दे मांडू लागले, तेव्हा या कोऱ्या कागदाने मला हळूच चिमटा काढला. यात कुठे पळून जाण्याचा भाग तर नाही ? जरा खात्री करून घे. भरपूर वेळ कधीच नव्हता; मनावरील ताणही कमीअधिक प्रमाणात कायम होते. तरीही लेखन थांबले नव्हते. मग आताच असे का ? मनात अनिच्छा, विरोध या भावना आहेत, आणि म्हणून त्याने हा समर्थनाचा पवित्रा तर घेतलेला नाही ?

हे प्रश्न ऐकताच मी सावध झाले.

त्यातच, आजूबाजूचे कोणी कोणी, कधी सहज तर कधी आस्थेने, 'अलिकडे नवं लेखन काय ?' अशी चौकशी करू लागले. त्यामुळे मी अस्वथ होऊ लागले.

तेव्हाच मी स्वतःला समजावले, आता यातून सुटका नाही.

जसे जमेल तसे पुढे रेटले पाहिजे. या विपरीत परिस्थितीची स्वतःवर मात होऊ देता कामा नये. तिच्याशी झुंज दिली पाहिजे.

त्यासाठी शस्त्र कोणते ? –तो कोरा कागदच !

जिद्दीने पेटलेला तो दिवस मला अजून आठवतो. त्या दिवशी मी एका दीर्घ समीक्षालेखांची अर्धवट राहिलेली टाचणे पूर्ण केली. माझा मर्ढेकरांवरचा प्रबंध पुढे ओढला, आणि मध्येच सोडलेल्या कामाशी सांधा जुळवून घेतला. ते थोडे पुढेही नेले. आणि एक जो उत्तम झाला पाहिजे असे मनापासून वाटत होते, असा एक लेख लिहायला घेतला. पान–दिडपान सलगपणे लिहूनही झाले ...

मी इतकी आनंदात होते ! मनाशी म्हटले, त्या कोऱ्या कागदावरचे सावट बहुतेक नाहीसे झाले. आता स्वच्छ ऊन राहील. संकल्प मार्गी लागतील ... त्या आनदाने मी तरारले; अगदी गद्य रुक्ष गोष्टीतही पुन्हा रस घेऊ लागले. गेले कित्येक दिवस मी त्यांच्यात गुंतूच शकले नव्हते. गुंतता यावे म्हणून वेगवेगळे उपाय करून पाहिले होते. पण खरा उपाय हाच होता.

खरा उपाय तोच असतो हे मला ठाऊकही होते. तडफड, नैराश्य–सगळे चांगले लेखन झाले की संपते, ते होत नसले की वाढते ... स्वतःचा चेहरा, व्यक्तिमत्त्व, सगळेच हरवल्यासारखे वाटते. अशा वेळी तोच उपाय. कोऱ्या मनावर अक्षरे लिहीत राहणे. शब्दांच्या सहवासाइतके चैतन्यदायी काही नाही.

पण ते चैतन्य क्षणकाल माझ्या मनात सळसळले, आणि पुन्हा ओसरून गेले. काय झाले कोणास ठाऊक. मन पुन्हा एकदा झाकोळून आले. आदल्या दिवशी जे काम केले होते, ते बिनसल्यासारखे वाटू लागले. वाटले, त्या लेखाचा खरा सूर गवसलाच नाही आपल्याला. भलताच सूर लागला. असे जाणवल्यानंतर ती लिहिलेली दीडदोन पाने तशीच बाजूला ठेवून दिली. आजतागायत ती तशीच पडली आहेत ...

पुन्हा काळोख.

दोन काळोखांमधील त्या क्षणभंगुर उन्हाचा अर्थ कसा

लावायचा ? मला वाटते, ते ऊन खरे नसते, कृत्रिम असते. इत-रांना, स्वतःला दिलेले ते एक खोटे आश्वासन असते. इतर विचारतात, 'काही नवं लिहिलंत की नाही ?' म्हणून लिहायचे. स्वतःला एका अज्ञात शक्तीने पराभूत केल्यासारखे वाटते म्हणून लिहायचे ... या काय लेखनाच्या खऱ्या प्रेरणा झाल्या ? या चुकीच्या प्रेरणांतून केलेले लेखन बिनसेल नाही तर काय होईल ? पण हे समजूनही उमजत नाही. म्हणून ओसाडीतून प्रवास करत असताना अधूनमधून हे मृगजळ दिसते....प्राण तहानलेलाच राहतो. पण त्या मृगजळाच्या मागे धावता धावता अचानक एखाद्या जिवंत झऱ्याचा खळाळ ऐकू येतोही. म्हणून हे भासही हवेतच.

भास हवेत, त्याप्रमाणे बंधनेही हवीत. तीही काही वेळा मनाला काळोखातून बाहेर पडण्यासाठी मदतीचा हात देऊ करतात. पण या विपरीत काळात त्या बंधनांची फार भीती वाटत असते. ती अधिक जखडतात... आपल्या सबंध अस्तित्वाला जणू मुसक्याच बांधतात... असे निदान त्या वेळी वाटते !

माझी हीच प्रतिक्रिया होती. म्हणून मी त्या सुमारास अकाशवाणीकडून 'भाषणा'साठी आलेले एक आमंत्रण नाकारण्याचे ठरवले होते. 'नाही म्हटले तरी आठदहा पाने लिहायची. नकोच तो ताप.' असे म्हणून मी ते करारपत्र बाजूला ठेवून दिले, आणि कसे कोण जाणे, ते परत पाठवण्याचे विसरूनच गेले ! हे जव्हा लक्षात आले तेव्हा फार उशीर झाला होता. इतक्या उशिरा नकार कळवणे वाईट दिसले असते ...! मग धावाधाव. काहीतरी लिहिलेच पाहिजे. सुदैवाने विषय दिलेलाच होता–'मला प्रभावित करणारे पुस्तक.' कोणते पुस्तक ? मनाने चटकन उत्तर दिले, लिव्ह उल्मानचे 'चेंजिंग.' मला ते फार आवडले होते. या भाषणाच्या निमित्ताने ते पुन्हा एकदा वाचायला सुरवात केली. त्यात गुंतलेही. पण प्रत्यक्ष लेखनाच्या वेळी काय होईल, याबद्दल भरवसा वाटत नव्हता !

'चेंजिंग'वर लिहिण्यासाठी कागद पुढे ओढला तेव्हा ही

साशंक मन:स्थिती. पहिली काही वाक्ये जुळवताना झालेले अतोनात कष्ट. दोन वाक्यांच्या लेखनामध्ये घेतलेले दीर्घ विराम. प्रत्येक विरामाच्या वेळी वाटायचे, हा कधी संपणारच नाही. पुढचा कागद तसाच कोरा राहणार आहे. मग अनिलांचे वाक्य आठवायचे : 'एका ओळीचा गळ टाकून बसायचे. त्या गळाला दुसऱ्या ओळीचा मासा कधीतरी लागतो.' तसेच चालले होते. नेट. धीर पण यापलिकडे काही नाही ! पण असे एकेक पाऊल ओढत पुढे जात असतानाच कधी वेग आला ते मलाही कळले नाही ! तो वेग आला मात्र, मनावरचा ताण कुठल्याकुठे पळाला. एरवी अगदी क्षुल्लक अशा व्यत्ययांमुळेही मी अस्वस्थ होते. मला लिहीत असताना आजूबाजूला कोणी वावरलेलेसुद्धा खपत नाही. आवाज तर नकोसेच वाटतात. पण तो वेग आल्यानंतर भोवतालचे भानच नाहीसे होते. व्यत्ययांचेही काही वाटत नाही. कारण बाह्यत: व्यत्यय असले तरी आत एकतानता असते. अदृष्टातून कोणीतरी कानात कुजबुजते आहे आणि आपण ते लिहून घेत आहोत अशी जणू अवस्था असते ! या अवस्थेत जे लिहिले जाते ते 'महान' वगैरे असते असे मुळीच नाही. पण ही तंद्रा मात्र फार खरी असते, सुंदर असते. या तंद्रेत मला जेथे पोचायचे आहे तेथे निश्चितच पोचता येते. कोणाला स्वत:लाही वाट विचारावी लागत नाही. त्या ठिकाणी पलीकडेही खूप असते. मोठे लेखक तेथे पोचलेलेही असतात. पण हा ज्याच्या त्याच्या कुवतीचा प्रश्न आहे. जे आपल्याकडे नाहीच त्याबद्दल खंतावण्यात काय अर्थ ? खंत नसतेच. कारण जे आहे ते सत्कारणी लागले ही भावना असते. ती मनाला समाधान आनंद देत असते. माझा आणखी एक अनुभव आहे. ही तंद्रा लागण्याआधी जे लिहिलेले असते—कष्टाने, साशंकतेने, तेही त्या वेळी वाटते तेवढे टाकाऊ नसते. उलट पुढील भागाशी ते इतके छान जुळून आलेले असते—इतके की कोणाला वाटावे तो विशिष्ट सूर सुरवातीपासूनच लागला आहे ! हा प्रयासापासून तंद्रेपर्यंतचा प्रवास मी अनेक वेळा अनुभवला आहे. 'चेंजिंग'वर

लिहिताना तो अनुभव पुन्हा एकदा घेतला. आणखीही अनेक वेळा घेणार आहे; पण त्या अनुभवामधील गुंते, गूढे मला उकललेलो नाहीत. ती कोणाला उकलली आहेत ?

बालकवींच्या मोठेपणाची आणि माझ्या लहानपणाची जाणीव ठेवून एक तुलना : त्यांनी ' बालविहग ' या कवितेत ' काव्यदेवता अंतरली मज गरिबाला आज ' असे उद्गार काढले आहेत. त्या अवस्थेत ' बालविहग 'सारखी सुंदर कविता कशी लिहिली ? कवितेच्या शेवटी या प्रश्नाचे उत्तर आहे, ' कशीबशी ती त्वत्प्रीतीस्तव या कवनीं लिहिली.' —बालविहागबद्दलची ओढ ही प्रेरणा. त्या ओढीमुळे कविता लिहिली पण त्याआधी ती ' आठवली.' - तुजला बघता भरभर उडता कविता आठवली... म्हणजे ती मनात होतीच ! प्रत्यक्ष लिहिताना काय झाले असेल ? कोऱ्या कागदाने किती काळ सतावले असेल ? प्रयत्न संपून ' ती अत्यद्भुत गूढ शक्ती ' अंगात कधी संचारली असेल ? —या प्रश्नांची उत्तरे बालकवींखेरीज कोण देणार ? पण त्यांनाही ती कदाचित देता आली नसती !

पण या शक्तीचा संचार अंगात होतच नाही तेव्हा काय होते ? तोही अनुभव मी काही वेळा घेतला आहे. माझ्या ' विदेही ' या कथेच्या लेखनापूर्वीचा काळ आठवतो. तीच उदासी, बेचैनी. खरे म्हणजे त्या बेचैन मनःस्थितीत लेखनाला सुरुवातच करायला नको होती. पण बंधन घालून घेतल होतं. तीनचार दिवाळी अंकांसाठी लिहायचे होते. म्हणजे कधीतरी सुरुवात करायलाच हवी होती. नाहीतर सगळे व्यापताप सांभाळून वेळेवर लेखन पूर्ण होणार कसे ? पण तेवढेच कारण नव्हते. आपल्याजवळ एक फार चांगली कथाकल्पना आहे याची जाणीव होती, आणि ती लवकर शब्दबद्ध करण्याची उत्सुकताही होती. कदाचित, फार मूल्यवान असे काही जवळ बाळगण्याचा जो मानसिक ताण असतो, त्यातून

मोकळे व्हायचे होते, असेही असेल. कारणे कोणतीही असोत. कथा लिहायला सुरुवात केली खरी. सूर लागत नव्हता; तरीही मी स्वतःला पुढे खेचत होते. लिहतालिहता अचानक अभ्रे निघून जातात आणि स्वच्छ ऊन पडते हा अनुभव या वेळीही येईल या आशेवर ही सगळी ओढाताण चालली होती. पण ती आशा व्यर्थच ठरली. आठदहा पाने लिहून झाली तरी परिस्थिती बदलेना. मी हताश झाले. तेथेच थांबलें.

थांबले, त्याच दिवशी राम पटवर्धन योगायोगाने कॉलेजात आले होते. एखादी कथा पूर्ण झाल्याखेरोज मी ती कोणाला दाखवत नाही. अपूर्ण अवस्थेत ती अर्थशून्यच असते. पण त्या दिवशी काय झाले कोण जाणे, मी पटवर्धनांना ते कागद दाखवले. माझ्या दृष्टीने कोरे, पण त्यांच्या दृष्टीने शब्द लिहिलेले. 'विदेही'च्या कथाबीजाबद्दल त्यांचे माझे बोलणे पूर्वीच झाले होते; आणि ती कथा मी त्यांच्यासाठीच, 'सत्यकथे'साठीच लिहीत होते. म्हणूनही त्यांना ती दाखवण्याची इच्छा मला झाली असेल. पटवर्धनांनी कॉलेजातील माझ्या खोलीत बसूनच ती कथा एकाग्रतेने वाचली. ती फसत चालली आहे हे तर मलाही ठाऊक; होते पण ती का फसते आहे याचे फार चांगले विश्लेषण पटवर्धनांनी केले. मी माझी बाजू वगैरे मांडण्याचा काही प्रश्नच नव्हता! कारण मला ते सगळेच पटत होते. घरी आल्यानंतर मी ते कागद बाहेर काढले आणि फाडून टाकले!

मला वाटते, पहिल्या लेखनात अपूर्ण राहिलेली, फाडलेली अशी ही माझी एकमेव कथा असेल. (आणखी काही फसलेल्या, बाजूला ठेवलेल्या कथा आहेत. त्या फाडून टाकायच्या असे मी ठरवलेही आहे. दरवर्षी मी पुष्कळ फाडाफाड, फेकाफेक करते. हे लिखाण त्यातून कसे सुटले आहे, हे माझे मलाच ठाऊक नाही!) वर्षानंतर मी ती पुन्हा लिहिली. त्या वेळी मात्र, मनःस्थितीत फारसा बदल नसूनही, सूर लागला. प्रसूतीच्या अनुभवासंबंधीच्या या कथेबद्दल लिहिते आहे, म्हणून सहज सुचलेले एक रूपक : हे

कोऱ्या कागदावरचे गर्भपात असतात. याच जातीचा आणखी एक अनुभव असतो. पूर्ण दिवस भरतात. वेदनेच्या दिव्यातून सुखरूप सुटका होते. मूल दिसायला गुटगुटीत दिसते; पण त्याच्यात प्राणच नसतो ! माझी 'गांधार' नावाची एक दीर्घकथा आहे. वेगात, धुंदीत लिहिलेली आहे. लिहिताना मी समाधानात होते; वाचताना हादरले, कारण तिच्यात कुठे प्राणच आढळेना ! किती तरी वर्षे ती तशीच पडून आहे. कधीतरी वाटते, बाहेर काढावी, वाचावी. पण वाचणार काय ? शब्दांचे भास असणारे कोरे कागदच आहेत.

'विदेहा' फाडून टाकली, 'गांधार' बाजूला ठेवली. असे आणखी कितीतरी वेळा करायला हवे होते. पण ते केले नाही. याबद्दलची माझी प्रतिक्रिया संमिश्र आहे. मध्यम दर्जाचे, स्वत:लाच फारसे समाधान न देऊ शकलेले लेखन प्रसिद्ध केले याबद्दल मनात अपराधाची, पश्चात्तापाची भावना आहेच. पण त्याबरोबरच असेही वाटते की जोपर्यंत ते उत्तम असल्याचा भ्रम आपल्या मनात नाही, तोपर्यंत काय हरकत आहे ? कधी संकल्पना मध्यम प्रतीची असते, तर कधी लेखनाची कुवत कमी पडते. या अंगभूत मर्यादा आहेत. लिहीत राहणे हाच त्या मर्यादा कधीकधी ओलांडण्याचा मार्ग असतो. उत्तमाकडे जाण्याची दिशा मध्यमातूनच दिसत असते. मध्येच थांबून कसे भागेल ? पुढे जायचे असेल तर चालत राहिलेच पाहिजे. काही वेळा मी अशी अट्टाहासाने चालत राहिले. उजाड, वैराण असे ते प्रवास अजून आठवतात. ते यापुढेही करावे लागणार आहेत. या प्रवासात कधी अचानक सावली दिसते, झऱ्याचा एखादा खळाळ ऐकू येतो, मागोवा घेत घेत त्या अद्‌भुत प्रदेशांच्या प्रवेशद्वारापाशी पोचता येते. कधी यातले काहीच घडत नाही. वणवण संपत नाही. मग या प्रवासामुळे काय लाभ होतो ? एकच : कोऱ्या कागदाची असलेली ओळख विसरत नाही, त्याच्याकडे पाहण्याची भीती वाटत नाही.

म्हणून हे नाते अजून तरी संपलेले नाही. गुंतागुंतीचे, विल-

क्षण हवेसे वाटणारे, आणि तितकेच नकोसेही वाटणारे असे हे नाते आहे.

असेही वाटते की जोपर्यंत आपल्याला काहीकाही सुचते आहे, तोपर्यंत त्या कोऱ्या कागदाची कशाला एवढी पर्वा करायची? त्याला वळवणे हे अखेर आपल्या हाती आहे.

पण या विश्वासात मग्न असतानाच मध्येच एका निनावी भीतीची लहर चमकून जाते : काही सुचलेच नाही तर? मन कोरेच राहिले तर? त्यावर काही उमटेनासेच झाले तर?

त्या क्षणी कोरा कागद समोर येतो आणि म्हणतो, 'हेच तर मी तुला गेली कित्येक वर्षे सुचवतो आहे!'

'हेच सुचवतो आहेस? मग पूर्वी काही वेळा तू दिलेल्या प्रतिसादाचे काय? त्यामुळे तुझ्यावर जडत गेलेल्या प्रेमाचे काय?' मी विचारते.

तो उत्तर देत नाही. राग येतो.

राग–अनुरागाचे हे दुपदरी नाते चालूच राहते ...

## स्वगत

आज काहीतरी लिहायचेच असा निर्धार करून मी बसले आहे. समोर दोनतीन जुन्या डायऱ्या आहेत. या डायऱ्यात 'सुचलेले' काहीबाही टिपून ठेवलेले असते. 'सुचलेले' कोणत्या अर्थाने ? कधी माझ्याच आयुष्यात एखादा प्रसंग घडतो; कधी कोणीतरी एखादी घटना सांगते; कधी पाहण्यात, वाचण्यात मनाला स्फुरण देणारे काहीतरी येते. मला अचूक कळते की यात एखादी कथा आहे. या जाणिवेलाच मी सुचणे असे म्हणते. कारण ते प्रसंग प्रत्यक्षात घडलेले असले तरी त्यांच्यातील 'कथा' मला जेव्हा दिसते तेव्हा बाह्य तपशील गळून गेलेले असतात. फक्त बीज उरलेले असते. ते माझ्या मनात मुक्तपणे अंकुरत राहते. कधी अंकुर अल्पावधीत फुटतो. कधी ते बीज फुटण्याच्या प्रतीक्षेत दीर्घकाळ राहते. प्रतीक्षेच्या, फुटण्याच्या अवस्थेत, मनात ज्या घडामोडी होतात, त्या फार अनपेक्षित असतात. त्यामुळे कथा लिहून झाल्यावर काही वेळा, मूळ बीज कोणते होते, याचे स्मरणही राहत नाही. पण डायरीत नोंद असते. म्हणूनच माझ्या या डायऱ्यांना मी शीर्षक दिले आहे : 'कथाबीजे.'

आज मी त्या डायऱ्या चाळते आहे. चाळताना लक्षात येते आहे की काही बीजे मी कथांसाठी वापरली आहेत. काही तशीच पडून आहेत. मी सातत्याने लिहू लागले तेव्हापासूनच्या या नोंदी आहेत. त्या वेळी जे महत्त्वाचे वाटले ते आज तसे वाटत

नाही. त्यामुळे ते आपोआपच बाद झाले आहे. पण अजूनही लक्षणीय वाटणारी काही बीजे आहेतच. मध्ये इतका काळ गेला. कथाकार म्हणून मी बदलले, तरी ही बीजे उरली आहेतच. मग मी आजपर्यंत त्यांच्यावर का लिहिले नाही ? मला वाटते याचे नीटसे स्पष्टीकरण देता येणार नाही. सुचण्याचा क्रम आणि लिहिण्याचा क्रम यांच्यात तसे काही नाते नाही. कोणत्या वेळी कोणते बीज उमळून येईल याला काही नियम नाही. जे सुचले ते मनात नीट मुरू द्यावे असे म्हणतात. माझा यावरही फारसा विश्वास नाही. अमूक एक काळ जाऊ दिला की अमूक एक टक्के यश निश्चित होते, असे गणित थोडेच आहे ? ते यश खरे म्हणजे मूडवर अवलंबून असते, आणि थोडेफार दैवावरही ! माझ्या काही खूप काळ मनात रुजत असलेल्या अयशस्वी कथा मला या क्षणी आठवताहेत; आणि एखादी सुचल्यावर लगेच लिहून काढलेली यशस्वी कथाही ! मी जे म्हणते आहे ते कदाचित माझ्यापुरतेच खरे असेल. पण निर्मितिप्रक्रियेविषयीचे कोणतेही विधान, काही प्रमाणात वैयक्तिकच राहणार नाही का ?

प्रत्येक लेखक ही वैयक्तिकता जपत असतो. अगदी साध्या साध्या तपशिलांमधेही ही वैयक्तिकता जाणवते. मी जे सुचले ते डायरीत टिपून ठेवते. सगळे लेखक तसे थोडेच करत असतील ? ते स्मरणांकित करण्याचे त्यांचे मार्गही वेगळे असू शकतील. मीही सगळे कुठे टिपून ठेवते ? जे टिपलेले असते तेही किती वेडेवाकडे, त्रोटक ! इतरांना ते पाहून काही अर्थबोध होणार नाही इतके खाजगी ! जणू ओळखीची असूनही सांकेतिक वाटेल अशी ही लिपी ! कधी एखादा शब्द टिपलेला असतो त्या भोवतीचे सगळे मनात ! आणि कधी सगळेच मनात ! ते विसरेल म्हणून टिपून ठेवण्याची गरज वाटत नाही. इतके ते रक्तातून वाहत असते. मूकपणे, माझ्या कोणत्याही व्यवहारात व्यत्यय न आणता !

आज मी यातले काय लिहू ? डोळ्यासमोरून पुष्कळ काही सरकते पण मनाला कशावरच झेपावेसे वाटत नाही. पाडगावकरांची एक कविता आठवते. तिची पहिली ओळ आहे, 'मनात माझ्या मुळीच नाही काही...' मन इतके शांत, निर्लेप की त्याला एका चिमुकल्या थेंबाच्या वाजणाऱ्या पावलाची चाहूलही ऐकू यावी ! ती अवस्था मीही काही वेळा अनुभवली आहे पण आज मन अगदी रिकामे, वांझ. मनात एकही सलग ओळ जुळून येत नाही. काळज्या घेरत राहतात. दडपल्यासारखे वाटते. निर्भर कसे ते वाटतच नाही.

निर्भर वाटणे म्हणजे तरी काय ? सुरुवातीपासून, विनायास तसे वाटेल का ? मला तरी तो अनुभव नाही. 'मूड'चे मी फार कौतुक करत नाही. काही वेळा तो असतो, आणि काही वेळा नसतो, हे मात्र खरे आहे. पण मूड असला तरी मनाला निर्भर वाटेलच असे नाही. कोरा कागद समोर आला की दडपण आलेच. त्या कोऱ्या कागदाइतकाच लेखकही स्तब्ध, निःशब्द होतो. अशा वेळी धीर करून लिहू लागायचे. एक ओळ, मग दुसरी...सायास होतात. तरीही लिहीत राहायचे. कोणत्या तरी क्षणी वारे अनुकूल वाहू लागतात आणि मग आपल्याला काही करावेच लागत नाही. होडी आपोआपच किनाऱ्याच्या दिशेने जाऊ लागते. तो विहार सुखावह असतो ! त्या वेळी शब्द कुठून येतात कोणास ठाऊक ! सुरवातीचे सगळे कष्ट निचरून जात असतात. फार हलके वाटत असते....या अवस्थेसाठी फार मोठी किंमत द्यावी लागते हे खरे. पण लेखक ती का देतो ? त्याला ते वर्थव्हाइल वाटते म्हणून !

आज असे काही होणार आहे का ? नुकतेच असे घडले होते. पाचसहा महिन्यापूर्वीच. मन सुन्न होते. निर्धाराने लिहायला बसले होते. एक ठेवणीतला अनुभव बाहेर काढला होता. धाडसच

होते ते. त्याची माती झाली असती तर? पण अनुकूल वारा वाहू लागला. होडी इतक्या वेगाने जाऊ लागली की मलाच तो वेग झेपेना! तंद्रीत लिहीत राहिले. लेख लिहून संपल्यानंतरही ती तंद्री उतरेना! त्या सुंदर तंद्रीसाठी दिली ती किंमत थोडीच असे वाटले. त्या लेखाला मी नाव दिले होते, 'हिरवेगार'. नंतर काही काळ माझे मनही हिरवेगार होते. नवी पालवी फुटली होती. कितीतरी दिवसांनी! आज असे काही होणार आहे का?

त्या हिरव्यागार मन:स्थितीतच मी प्रवासाला गेले. झाडामाडांचा, देखणा प्रदेश. कितीतरी दिवसांनी मिळालेली मोकळीक. उदंड अगत्य दाखविणारी माणसे. माझी माणूस म्हणून, लेखक म्हणून दखल घेणारी. अहंकार सुखावला. हिरवा रंग ओसंडून वाहू लागला. त्या मूडमध्ये मी काही कविता लिहिल्या होत्या. या डायरीत त्याही आहेत. लिहिल्या आणि बाजूला ठेवून दिल्या आणखीही काही कविता आहेत. वेगवेगळ्या वेळी लिहिलेल्या. फार उत्कट अवस्थेत लिहिलेल्या. त्यातली एखादी अनवधानाने प्रसिद्ध झाली. एखादी माझ्याच लेखात, विशिष्ट संदर्भात उद्धृत केली. पण एरवी त्या वहीतच राहिल्या. मला त्याचे दु:ख नाही. कारण त्या प्रसिद्ध करायच्या नाहीत हा माझाच निर्णय आहे. कविता हा माझा फॉर्म आहे की नाही कोण जाणे! पण मग मी कविता कशा लिहिते? तो एक तात्पुरता झटका असतो का? त्या कवितेत एखादे कथाबीजच लपलेले असते का? मी त्या कविता पुन्हा एकदा वाचते आहे, माझ्या प्रश्नांची उत्तरे शोधते आहे. एखाद्या कवितेमागे कथा आहे, पण एखाद्या कथेमागे कविताही आहे. आणि एखाद्या कवितेमागे फक्त कविताच आहे.

आसमंतात अनावर उत्कंठा
लाट अजून फुटलेली नाही.
तरंग जमू लागले आहेत

एकमेकांत, लाटेत विरण्यासाठी
पाण्याला फक्त चढ आहे ...
ते अजून किनाऱ्याच्या दिशेने
निघालेले नाही.
निघायला नकोच आहे.
मागे परतताना ते कसे गढूळ होते
हे मला ठाऊक आहे.
म्हणून लाट फुटायला नकोच आहे.
आसमंतात,
मनात,
फक्त अनावर उत्कंठा.

या कवितेमागे कथा असणे कसे शक्य आहे? आणि असली तरी कवितेत मिटून गेलेली नाही का?

नंतरचे काही दिवस मनाचे बहरलेले झाड त्या अनावर उत्कंठेने डोलत होते. मधूनच ती वांझ अवस्था आठवायची. वाटायचे, त्या वेळी धाडस केले नसते तर माझ्या हातून 'हिरवेगार' हा लेख लिहून झाला असता का? आणि पुढे मलाच हिरवेगार होता आले असते का? आता पुष्कळ काही लिहू. होडी निघाली आहे, आणि समुद्र शांत आहे. पण हा भ्रम होता. दैव अनपेक्षित सुख पदरात टाकते तसे अनपेक्षित दुःखही. हे मला ठाऊक होते, पण मी गाफील होते. दैव मात्र गाफील नव्हते. त्या समुद्रात अचानक वादळ निर्माण झाले. होडीला कळलेच नाही. प्रचंड लाट आली आणि होडी तळाला गेली. वादळे शांत होतात पण तळाशी गेलेल्या होड्या काही पुन्हा तरंगू लागत नाहीत. त्या तळाशीच राहतात!

त्या होडीप्रमाणे माझ्यातला लेखक सध्या तळाशी आहे. सध्या मी भूतकाळातच आहे. जुनेजुने आठवत राहते. त्या सग-

ळ्यांशी माझ्या आईचा संबंध आहे. तिच्याही काही डायऱ्या आहेत. त्या चाळताना पुसट झालेली पुष्कळ स्मरणे स्वच्छ होऊ लागतात. वाटते, आपल्या डायऱ्या सध्या बाजूला ठेवाव्यात. आईच्याच डायऱ्या पहाव्यात. त्यांत ती आहे, मीही आहे. त्यात लिहिण्याजोगे पुष्कळ आहे. पण ते लिहिणे किती कठीण आहे !

आज कोणती डायरी पाहू ? काय लिहू ? लिहितालिहिता पुन्हा एकदा मी तरू लागेन का ? की बुडलेलीच राहीन ? आज काय होणार आहे ? कोण जाणे. कारण लाट अजून फुटलेली नाही. ती फुटायला हवी आहे की नको आहे कोण जाणे!

अशा संभ्रमात लिहायला बसले आहे. पण खरोखर आज काय होणार आहे ?

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0025441

डिंपल
पब्लिकेशन

सुंदर स्त्रीच्या सौंदर्याचं लक्षण तिच्या गालावर खुलणाऱ्या 'खळीत' असतं...
साहित्याचं सौंदर्य '**डिंपल**' मध्ये लपलेलं!

डिंपल पब्लिकेशनने दर्जेदार व अभिरुचिसंपन्न पुस्तके प्रकाशित करण्याची '**बुनियाद**' सिद्ध केली व '**कथासागर**' मधील असंख्य शिंपले, मोती आपल्यासाठी आणली.

आपल्या घरात '**मनोरंजनाचे**' दीप उजळविण्यास सिद्ध असलेली ही पुस्तके

**भाऊ पाध्ये**/डोंबाऱ्याचा खेळ, वासूनाका सांगोपांग
**नारायण सुर्वे**/सर्व सुर्वे
**मधु मंगेश कर्णिक**/गावाकडच्या गजाली
**विजया काळे**/प्रवाह
**इंद्रायणी सावकार**/व्यभिचारिणी?
**दिलीप पु. चित्रे**/तीन बाय दिलीप चित्रे
**उमाकांत ठोमरे**/चक्रावर्त
**दिवाकर गंधे**/शतऋतु
**बियन चव्हाण**/नराधम
**मोहिनी वर्दे**/पडिले वळण
**विजया राजाध्यक्ष**/स्वच्छंद
**माधव गडकरी**/पाचूचे बेट
**ल. ना. केरकर**/कोंडमारा
**आनंदीबाई विजापुरे**/अजुनी चालतेचि वाट
**अनंत कदम**/मानवी
**सीताराम मेणजोगे**/आम्ही पोष्टातील माणसं, पोष्टाचे अंतरंग
**डॉ. श्रीकांत जोशी**/मनोविकार : शोध आणि बोध
**आकाशानंद**/अनवाणी
**आनंद म्हसवेकर**/आकांत
**शशी भालेकर**/वाट वळणाची
**विजया वाड**/वेगळी
**डॉ. वीरेंद्र ह. धुरी**/चितेवरची फुले
**प्रकाश भातम्ब्रेकर**/सौदे शरीराचे
**य. गो. जोशी**/दोन वजा एक
**अशोक माने**/अजिंक्य
**श्रीधर लोखंडे**/अप्रकाशित
**सुरेश कदम**/अंतरा
**दिवाकर कांबळी**/परळ ६८
**विश्राम शिरवाडकर**/बाहुल्या
**शिरीष पै**/वडिलांच्या सेवेसी
**शरदिनी महाडेश्वर**/पैंजण पाऊल
**आत्माराम सावंत**/चौथा अंक

**वैशिष्ठ्यपूर्ण आगामी प्रकाशने :**
चित्रपटविषयक दोन दर्जेदार पुस्तके—
**सोफिया लॉरेन** : भाऊ पाध्ये
**सेल्युलाईडवरील सुवर्णाक्षरे** : दिवाकर गंधे
**बॅ. अनिरुद्ध धोपेश्वरकर—समग्र**: संपादक- वसंत शिरवाडकर

संपर्क :
**सौ. नम्रता मुळे**, ३, कादंबरी सहवास, नौपाडा, वसई रोड स्टेशन (प. रेल्वे) जि. ठाणे ४०१२०२.
गिरगाव : बी. एम्. पालेकर बुक स्टॉल, संझगिरी सदन, गायवाडीसमोर, मुंबई-४०० ००४.